CMYK

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

लातूर | सोमवार, २३ मार्च २०२६ | वर्ष ४ थे अंक १५ | पाने १२ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. ▌dainiktarunbharat.com ▌epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



धर्म सगळ्या सृष्टीचे अधिष्ठान आहे. नानारूपाने व विविध भावाने नर-नारींनी बनलेला मानव-समाज सुद्धा त्याच अधिष्ठानावर टिकू शकतो. धर्म व्यक्तीपुरता मर्यादित नाही, पारस्परिक आहे, सामूहिक आहे. तो संग्राहक व समावेशक आहे, वैयक्तिक नाही.

**- रंगा हरी**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

# इस्रायलच्या अणुकेंद्रांवर इराणचा भीषण हल्ला

## दीडशे नागरिक जखमी, नतांझवरील हल्ल्याला प्रत्युत्तर



क्षेपणास्त्र हल्ल्यात अणूप्रकल्पाचे झालेले नुकसान

**तेल अवीव, २२ मार्च**

इस्त्रायल आणि अमेरिकेच्या वायुदलाने इराणची मुख्य अणूभट्टी 'नतांझ'वर शुक्रवारी भीषण हवाई हल्ला केला. याला प्रत्युत्तर म्हणून, इराणने शनिवारी मध्यरात्रीनंतर इस्रायलच्या दिमोना आणि अराद येथील अणुकेंद्रांवर क्षेपणास्त्रांचा मारा केला. इराणच्या हल्ल्यात दीडशेपेक्षा अधिक नागरिक जखमी असल्याचे इस्रायलच्या संरक्षण विभागाने म्हटले आहे. दिमोना शहरात मोठ्या संख्येने भारतीय वंशाचे लोक राहतात. बहुतांश नागरिक महाराष्ट्रातील आहेत.

इराणच्या इस्लामिक रिव्हाल्यूशनरी गार्ड कॉर्प्स अर्थात् आयआरजीसीने इस्रायलच्या अणूकेंद्रावर हल्ल्याची पुष्टी करताना म्हटले की, नतांझ अणुकेंद्रावरील हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून इस्रायलच्या अण्वस्त्र केंद्रावर क्षेपणास्त्रांचा मारा करण्यात आला. दोन्ही बाजूंनी एकमेकांच्या सर्वात सुरक्षित अणुकेंद्रांना लक्ष्य केल्याने युद्धाची दाहकता वाढली आहे. दक्षिण इस्रायलमधील दिमोना आणि अराद शहरावर झालेल्या इराणी क्षेपणास्त्र हल्ल्यात १५० पेक्षा अधिक लोक जखमी झाले. पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, बचाव दलाने मदत कार्य सुरू केले आहे आणि हल्ल्यात जखमी झालेल्या नागरिकांना रुग्णालयात हलविण्यात आले. भविष्यातील लढ्यातील हा अत्यंत कठीण काळ असून जगाने इराणविरोधात एकवटण्याची हीच वेळ आहे. इस्रायलच्या संरक्षण विभागाने म्हटले की, अराद शहरात इराणने मारा केलेले क्षेपणास्त्र आदळले. यात काही इमारतींचे नुकसान झाले. क्षेपणास्त्र नष्ट करण्यात हवाई संरक्षण प्रणालीला अपयश आले, याची चौकशी केली जात आहे. ◀(वृत्तसंस्था)

### ४८ तासांत होर्मुझ खुला करा : ट्रम्प



हॉर्मुझची सामुद्रधुनी हा सागरी मार्ग इराणने कोणत्याही अटींशिवाय ४८ तासांच्या आत पूर्णपणे खुला करावा अन्यथा अमेरिका इराणमधील ऊर्जा प्रकल्प, वीज केंद्र आणि पायाभूत सुविधा उद्ध्वस्त करेल असा राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रविवारी दिला. विध्वंस टाळायचा असल्यास तातडीने हा मार्ग सर्वांसाठी खुला करावा असेही त्यांनी म्हटले आहे. ■

### शत्रूंसाठीच होर्मुझ बंद : मौसावी



अमेरिका आणि इस्रायल या शत्रू राष्ट्र वगळता इतर देशांसाठी होर्मुझ जलमार्ग सर्वांसाठी खुला राहील, ज्या जहाजांचा इराणच्या शत्रूंशी संबंध नाही, ती जहाजे तेहरानसोबत सुरक्षा आणि सुरक्षिततेबाबत समन्वय साधून प्रवास करू शकतात असे प्रत्युत्तर इराणच्या सरकारचे प्रतिनिधी अली मौसावी यांनी म्हटले आहे. इराण आखाती क्षेत्रात सागरी सुरक्षा सुधारण्यासाठी संयुक्त राष्ट्रांसोबत सहकार्य करण्यास तयार आहे. ■



# नरेंद्र मोदी सर्वाधिक काळ शासनप्रमुख असलेले नेते

**नवी दिल्ली, २२ मार्च**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आणखी एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. रविवार २२ मार्च, २०२६ पर्यंत, मोदींनी शासनप्रमुख म्हणून एकूण ८,९३१ दिवस सेवा बजावली आहे. याचा अर्थ ते आता भारताचे सर्वाधिक काळ सत्तेवर असलेले नेते झाले आहेत. या कामगिरीसह त्यांनी सिक्किमचे माजी मुख्यमंत्री पवन कुमार चामलिंग यांचा विक्रम मोडला आहे.

१७ सप्टेंबर १९५० रोजी जन्मलेले नरेंद्र मोदी वयाच्या आठव्या वर्षी आरएसएसमध्ये सामील झाले होते. ७ ऑक्टोबर २००१ रोजी ५१ वर्षांचे असताना मोदी गुजरातचे १४ वे मुख्यमंत्री झाले. २४ वर्षांत १४ वर्षे ते गुजरातचे मुख्यमंत्री राहिले आणि आता तिसऱ्यांदा देशाचे पंतप्रधान आहेत.

**इंदिरा गांधींचाही विक्रम मोडला**

नरेंद्र मोदी हे भारताचे सलग सर्वाधिक काळ पंतप्रधान राहिलेले दुसरे पंतप्रधान देखील आहेत. त्यांनी माजी पंतप्रधान इंदिरा गांधींच्या ४०७७ दिवसांचा (२४ जानेवारी १९६६ ते २४ मार्च १९७७) विक्रम मोडला आहे. २२ मार्च २०२६ पर्यंत पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदींनी ४३१८ दिवस पूर्ण केले आहेत. सर्वात जास्त काळ सलग पंतप्रधान राहण्याचा विक्रम पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या नावावर आहे. ते १५ ऑगस्ट १९४७ ते २७ मे १९६४ पर्यंत, म्हणजेच सलग एकूण ६१२६ दिवस या पदावर होते. ◀(वृत्तसंस्था)

# माजी खासदार दत्ता मेघे यांचे निधन

## शेकडो मान्यवरांनी घेतले अन्त्यदर्शन

**नागपूर, २२ मार्च**



विदर्भातील प्रमुख राजकारणी, शिक्षणसम्राट व भाजपा नेते माजी खासदार दत्ता राघोबाजी मेघे यांचे रविवार, २२ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास निधन झाले. मृत्युसमयी ते ८९ वर्षांचे होते.

शैक्षणिक आणि वैद्यकीय क्षेत्रांतील योगदानासाठी दत्ताभाऊ मेघे ओळखले जायचे. त्यांनी दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेससारखी नामांकित संस्था स्थापन केली. यामार्फत शेकडो मुले, मुली वैद्यकीय तज्ज्ञ बनून लोकसेवेत कार्यरत आहेत.

लोकसभेचे दत्ताभाऊ तीन वेळा खासदार राहिले होते. त्यांचा जन्म ११ नोव्हेंबर १९३६ रोजी झाला. अत्यंत खडतर असे आयुष्य जगत त्यांनी यशाची शिखरे गाठली होती. यामुळे त्यांचा जनसामान्यात फार मोठा आदर व्हायचा. त्यांनी काही काळ एलआयसी पॉलिसी काढण्याचेही काम केले होते. त्यानंतर ते सक्रिय

(पान २ वर) ▶

### आज पवनारला होणार अन्त्यसंस्कार

भाजपा नेते दत्ताभाऊ मेघे यांचे पार्थिव सोमवार, २३ मार्च २०२६ रोजी दुपारी १ वाजेपर्यंत खामला पांडे ले-आऊट येथील निवासस्थानी अन्त्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर दुपारी १ वाजता पार्थिव वर्धा जिल्ह्यातील सावंगी मेघे गावाकडे रवाना होईल. तिथे पोहोचल्यावर तेथील बंगल्यात अन्त्यदर्शनासाठी पार्थिव ठेवले जाईल. सायंकाळी ५.३० वाजता पवनार येथील शेतीवर त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अन्त्यसंस्कार केला जाणार आहे. ■

## महत्त्वाचे

### पुरवठा साखळीतील व्यत्यय दूर करा : पंतप्रधान

**नवी दिल्ली :** मध्यपूर्वेतील युद्धाच्या परिस्थितीमुळे इंधन आणि संबंधित क्षेत्राच्या पुरवठा साखळीतील व्यत्यय दूर करून जीवनावश्यक वस्तूंचा देशाला अखंड पुरवठा सुनिश्चित करावा, असे निर्देश रविवारी पंतप्रधान मोदी यांनी मंत्र्यांना दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी बोलावलेल्या मंत्रिस्तरीय बैठकीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, अर्थमंत्री निर्मला सीतारामन, रसायन आणि खते आणि आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी, कामगार आणि रोजगार मंत्री मनसुख मांडविया आणि इतर मंत्री व अधिकारी उपस्थित होते. बैठकीत मध्य पूर्वेतील सध्याच्या परिस्थितीच्या पृष्ठभूमीवर पेट्रोलियम, कच्चे तेल, वायू, ऊर्जा आणि खत क्षेत्रांमधील परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. तेल, वायू आणि खतांसह जीवनावश्यक वस्तूंचा देशाला अखंड पुरवठा सुनिश्चित करण्याच्या सूचना मोदी यांनी दिल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली. होर्मुझ जलमार्गात आलेल्या व्यत्ययामुळे आखाती देशांशिवाय इतर पुरवठादारांकडून आयात वाढवावी, असेही निर्देश देण्यात आले. ■

### महिला बचत गटांच्या उत्पादनांचे प्रदर्शन आजपासून

**सोलापूर :** महिला आर्थिक विकास महामंडळ (मावीम), जिल्हा कार्यालय सोलापूर यांच्या वतीने मावीमच्या ५१ व्या वर्धापन दिनानिमित्त तसेच जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून २३ ते २५ मार्च या कालावधीत यशराज लॉन्स, जुनी मिल कंपाऊंड, मुरारजी पेठ, सोलापूर येथे ''नवतेजस्विनी महोत्सव'' या नावाने महिला बचत गटांच्या उत्पादनांचे जिल्हास्तरीय भव्य प्रदर्शन व विक्री मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवाचे उद्घाटन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते होणार आहे.

# 'गोवर्धन' परिक्रमा करणाऱ्या मुर्मू देशाच्या पहिल्या राष्ट्रपती

**मथुरा, २२ मार्च**

राष्ट्रपती मुर्मू यांनी शनिवारी, उत्तर प्रदेशच्या तीन दिवसीय दौऱ्याच्या शेवटच्या दिवशी, मथुरेतील गोवर्धन येथील गिरिराजजींची भेट घेतली. भक्ती आणि साधेपणाचा मिलाफ साधत राष्ट्रपतींनी केवळ डांगहटी मंदिर आणि मुकुट मुखरविंद मंदिरात विशेष प्रार्थनाच केली नाही, तर २१ किलोमीटर लांबीच्या गोवर्धन पर्वताची प्रदक्षिणा करून इतिहासही रचला. गोवर्धन धामला आणि गिरिराज महाराजांना भेट देणाऱ्या त्या देशाच्या पहिल्या राष्ट्रपती ठरल्या.



शनिवारी सकाळी सुमारे साडेआठ वाजता, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू वृंदावनमधील हॉटेल रॅडिसनमधून थेट गोवर्धन येथील डांगहटी मंदिरात पोहोचल्या. यावेळी उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेलही उपस्थित होत्या. त्यांनी भगवान गिरिराजांना दुधाने अभिषेक केला आणि फळे व मिठाई अर्पण केली. मंदिर रंगीबेरंगी फुले आणि दिव्यांनी विशेषतः सजवण्यात आले होते. प्रार्थना केल्यानंतर, राष्ट्रपतींनी गोवर्धनच्या २१ किलोमीटरच्या प्रदक्षिणेला सुरुवात केली. आपली भक्ती व्यक्त करण्यासाठी, त्या थोड्या अंतरापर्यंत चालत गेल्या, त्यानंतर सुरक्षा आणि वेळेच्या मर्यादेमुळे त्यांनी आपल्या कुटुंबासोबत गोल्फ कार्टचा वापर केला. या प्रदक्षिणेला अंदाजे दीड तास लागला. संपूर्ण प्रवासात, राष्ट्रपतींनी हात जोडून भाविक आणि स्थानिकांच्या शुभेच्छा स्वीकारल्या. स्थानिक खासदार हेमा मालिनीही उपस्थित होत्या. राष्ट्रपती मुर्मू यांचा हा दौरा ऐतिहासिक होता, कारण यापूर्वी कोणत्याही राष्ट्रपतीने गोवर्धनची प्रदक्षिणा केली नव्हती. हा दौरा अविस्मरणीय करण्यासाठी, प्रशासनाने संपूर्ण परिसर 'वधू'प्रमाणे सजवला होता. मुख्य चौकांमध्ये रांगोळी आणि विशेष सजावट करण्यात आली होती.

# नाशिकचा हर्षवर्धन सदगीर दुसऱ्यांदा 'महाराष्ट्र केसरी'

## सोलापूरचा महेंद्र गायकवाड उपविजेता




उपविजेता महेंद्र गायकवाड

**वाघोली, पुणे, २२ मार्च**

नाशिकच्या हर्षवर्धन सदगीरने सोलापूरच्या महेंद्र गायकवाडवर ४-३ अशा एका गुणाच्या फरकाने रोमहर्षक विजय नोंदवून महाराष्ट्र केसरीचा मान मिळविला. हर्षवर्धनने दुसऱ्यांदा हा मान मिळविला. विजेत्या हर्षवर्धनला रामकृष्ण अण्णा सातव यांच्याकडून मानाची चांदीची गदा, ५ लाख रुपये रोख व फॉर्च्युनर गाडी बक्षीस प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने व रामकृष्ण अण्णा सातव पाटील कर्तव्य फाऊंडेशन आयोजित ६८ वी महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद व महाराष्ट्र केसरी किताब कुस्ती स्पर्धा वाघोली, पुणे येथील स्व. अजितदादा पवार क्रीडानगरीत हजारो कुस्ती शौकीनांची उपस्थिती होती.

(पान २ वर) ▶







सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### केसी त्यागी आरएलडीमध्ये सामील



**नवी दिल्ली** : जेडीयूचे माजी नेते केसी त्यागी यांनी राष्ट्रीय लोक दलात प्रवेश केला आहे. रविवारी नवी दिल्लीत आयोजित एका कार्यक्रमात त्यांनी पक्षात प्रवेश केला. याप्रसंगी आरएलडीचे अध्यक्ष जयंत चौधरीही उपस्थित होते. त्यागी म्हणाले की, चौधरी चरण सिंग यांनी त्यांना अगदी लहान वयात हापूरमधून निवडणूक लढवण्यासाठी तिकीट दिले होते. ते खासदार किंवा आमदार होण्यासाठी नव्हे, तर जयंत चौधरी यांना चौधरी चरण सिंग म्हणून पाहण्यासाठी आरएलडीमध्ये सामील झाले आहेत. ५२ वर्षांपूर्वी जेव्हा चौधरी चरण सिंग राष्ट्रीय लोक दलाची स्थापना करत होते, तेव्हा ते मंचावर उपस्थित होते. हे लक्षात घेण्यासारखे आहे की केसी त्यागी यांनी अलीकडेच जेडीयू सोडले होते. मी माझ्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात आरएलडीमधून केली. ही त्याच परंपरेची पुढची पायरी आहे. यात काहीही नवीन नाही. आम्ही चौधरी चरण सिंग यांची राहिलेली स्वप्ने पूर्ण करण्यास मदत करू. जेडीयू आणि आरएलडीमध्ये कोणताही फरक नाही.

### विक्रमशिला पुलावर संरक्षक भिंत कोसळली

**भागलपूर** : भागलपूरमध्ये गंगा नदीवरील विक्रमशिला पुलाच्या एका खांबाजवळील संरक्षक भिंत कोसळली. या घटनेचा तज्ज्ञांचे पथक पाठवून तपास सुरू करण्यात आला आहे. स्थानिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, या पुलाला जोडलेल्या संरक्षक भिंतीचा काही भाग अचानक ढासळला. जिल्हा प्रशासनाने या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून तातडीने चौकशी सुरू केली आहे. कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता आणि तज्ज्ञांच्या पथकाला घटनास्थळी पाठवण्यात आले. तपास अहवाल आल्यानंतर पुढील निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

### 'धुरंधर-२' च्या स्क्रिनिंग दरम्यान राडा

**हैदराबाद.** येथील एका चित्रपटगृहात रविवारी 'धुरंधर-२' हा चित्रपट हिंदीमध्ये दाखवण्यात आल्याने गोंधळ उडाला. चित्रपटगृहात हाणामारी झाली. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. वृत्तानुसार, या चित्रपटगृहात 'धुरंधर-२'च्या हिंदी आणि तेलुगू आवृत्तीची तिकिटे एकाच शोसाठी विकली गेली होती. एका वापरकर्त्याने इन्स्टाग्रामवर एक व्हिडिओ पोस्ट केला आहे. त्यात त्यांनी दावा केला की, त्यांनी हैदराबादच्या पंजागुट्टा येथील पीव्हीआर चित्रपटगृहात तेलुगू आवृत्तीसाठी तिकिटे बुक केली होती, परंतु स्क्रिनिंग हिंदीमध्ये होते. व्हायरल व्हिडिओमध्ये चित्रपटगृहाची स्क्रीन गोठलेली (फ्रोझन) दिसत आहे.

# 'लष्कर' कमांडर बिलालचा खात्मा

## ईदच्या दिवशीच मुख्यालयात घातल्या गोळ्या

◆ **इस्लामाबाद, २२ मार्च**

पाकिस्तानमधील दहशतवादी संघटना लष्कर-ए-तोयबाच्या मुख्यालयात शनिवारी ईदच्या दिवशीच लष्करचा कमांडर बिलाल आरिफ सलाफी याची गोळी झाडून आणि चाकूने भोसकून हत्या करण्यात आली. लाहोरजवळील मुरीदके येथील मरकज तैयबा संकुलात हल्लेखोराने त्याला संपविले.

ईदच्या दिवशी नमाजानंतर बिलाल लाहोरजवळील मुरीदके येथील मरकज तैयबा संकुलात गेला होता. हल्लेखोराने त्याच्यावर गोळ्या झाडल्या आणि त्यानंतर चाकूने पोटावर वार केले. बिलालच्या हत्येची चित्रफीत समाज माध्यमावर प्रसारित झाली आहे. त्यात एक दहशतवादी त्याचा मृतदेह नेताना दिसत आहे. हत्या नेमकी कोणी केली आणि कशामुळे झाले, हे अद्याप समोर आले नाही. शनिवारी ईदच्या नमाजासाठी लष्कर मुख्यालयात संघटनेचे अनेक वरिष्ठ सदस्य उपस्थित होते. यामध्ये मौलाना अबू जर आणि मौलाना अब्दुल रहमान आबिद याचाही समावेश होता. नमाज संपल्यानंतर बिलाल आरिफ सलाफी प्रार्थना स्थळाबाहेर पडत असताना दोन हल्लेखोरांनी त्याच्यावर हल्ला केला. एका व्यक्तीने जवळून गोळीबार केला, तर एका महिलेने चाकूने वार करून त्याची हत्या केली. हा हल्ला अत्यंत नियोजित होता, ज्यात त्याचा मृत्यू झाल्याची माहिती पाकिस्तानातील एका अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला दिली. ◂(वृत्तसंस्था)




### २००५ पासून लष्करशी संबंध

बिलाल आरिफ सलाफी २००५ पासून लष्कर-ए-तैयबाशी संबंधित होता. तो संघटनेसाठी निधी गोळा करण्याचे काम करत होता. या निधीचा वापर शस्त्रे खरेदी आणि दहशतवादी कारवायांसाठी केला जात असल्याचा त्याच्यावर आरोप आहे.

### संघटनेतील गटबाजीचा संशय

**या घटनेनंतर समोर आलेल्या चित्रफितीत सलाफी रक्ताच्या थारोळ्यात पडलेला दिसतो. तर दुसरीकडे लष्करचा प्रशिक्षण प्रमुख मौलाना अबू जर याला दुसऱ्या व्यक्तीने पकडून ठेवलेले दिसते. हत्येमागे लष्कर-ए-तोयबातील अंतर्गत गटबाजी असल्याचे सांगितले जात आहे. हल्ल्यात एका महिलेचा सहभाग असल्याने हा बाहेरील हल्ला नसून संघटनेतील नियोजित अंतर्गत कारवाई असू शकते, असा अंदाज वर्तवला जात आहे.**



# एलपीजी, कच्चे तेल घेऊन दोन जहाजे भारतात दाखल

## संकटाच्या काळात अमेरिका, रशियाची मदत

◆ **नवी दिल्ली, २२ मार्च**

अमेरिकेच्या टेक्सास येथून लिक्विफाइड पेट्रोलियम गॅस अर्थात् एलपीजी घेऊन एक मालवाहू जहाज रविवारी मंगळुरू बंदरात पोहोचले तर, रशियातून एक जहाज कच्चे तेल घेऊन भारतात आल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाने दिली आहे. गेल्या ७ दिवसांत सुमारे पाच जहाजे गॅस-कच्चे तेल घेऊन समुद्राच्या मार्गाने भारतात पोहोचली.

तेल आणि वायूचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आखाताशिवाय इतर देशांकडून आयात वाढवली आहे. अमेरिकेतून एलपीजी आणि रशियातून कच्च्या तेलाचा पुरवठा वाढविण्यात आला. रविवारी एलपीजी आणि तेल घेऊन दोन जहाजे सुरक्षित भारतात पोहोचली असे परराष्ट्र मंत्रायलयाने निवेदनात म्हटले आहे. यापूर्वी १८ मार्च रोजी जग लाडकी हा क्रूड ऑइल टँकर गुजरातमधील अदानी पोर्ट्सवर आला तर, एमटी शिवालिक आणि एमटी नंदा देवी हे इतर दोन एलपीजी वाहक सुमारे ९२,७१२ मेट्रिक टन गॅस घेऊन १६ आणि १७ मार्च रोजी भारतात आले होते. ?

तथापि, ही तिन्ही जहाजे होर्मुझच्या मार्गाने भारतात आली. होर्मुझ जलमार्गात सुमारे २२ भारतीय जहाजे अडकलेली आहेत. तथापि, ती सर्व सुरक्षित आहेत. ◂(वृत्तसंस्था)

# खरातला अज्ञातस्थळी हलवले

## मंदिरातील पुजाऱ्यालाही घेतले ताब्यात



◆ **नाशिक, २२ मार्च**

राज्यात गाजत असलेल्या नाशिकमधील भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणात एसआयटी विचारपूर्वक पावले टाकत आहे. विशेष तपास पथकाने (एसआयटी) चौकशीचे ठिकाण अचानक बदलत खरातला अज्ञातस्थळी हलवले आहे. या कारवाईदरम्यान प्रचंड गोपनीयता आणि खबरदारी घेतल्याची माहिती समोर येत आहे.

गत तीन दिवसांपासून गुन्हे शाखा कार्यालय आणि पोलिस क्लब येथे सुरू असलेली चौकशी आता नव्या ठिकाणी हलवण्यात आली आहे. या चौकशीला एसआयटी प्रमुख आयपीएस अधिकारी तेजस्विनी सातपुते स्वतः उपस्थित राहून तपासावर बारकाईने लक्ष ठेवत आहेत. दरम्यान, ईशान्येश्वर मंदिरातील पुजाऱ्यालाही चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे.

एसआयटीने तपासाचा विस्तार करत खरातच्या 'ईशान्येश्वर' मंदिरातील पुजारी आणि काही कर्मचाऱ्यांना ताब्यात घेऊन चौकशीसाठी नेले आहे. या चौकशीमधून मंदिर आणि खरातच्या फार्महाऊसवर नेमक्या कोणते प्रकार सुरू होते, याचा उलगडा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

शनिवारी खरात आणि त्याचा निकटवर्तीय नीरज जाधवची समोरासमोर चौकशी करण्यात आली. त्यावेळी दोघांमध्ये पोलिसांसमोरच जोरदार शाब्दिक खडाजंगी झाल्याची माहिती आहे. तसेच, नीरज जाधवच्या कॉल डिटेल रेकॉर्ड तपासात ३० ते ४० महिलांचे संपर्क क्रमांक आहे. ◂(वृत्तसंस्था)

### आयकर विभागाकडूनही चौकशी

**अशोक खरात प्रकरणात आता आयकर विभागाचीही एन्ट्री झाली असून त्याच्या मालमत्ता, आर्थिक व्यवहार आणि उत्पन्नाचे स्रोत यांची सखोल चौकशी सुरू होणार आहे. देणगीदार, भागीदार आणि संबंधित आर्थिक व्यवहारांची पडताळणी करण्यात येणार असल्याने या प्रकरणातून मोठा आर्थिक घोटाळाही समोर येण्याची शक्यता आहे. तपासात अशोक खरात काही धक्कादायक खुलासे करू शकतो, असे बोलले जात आहे.**

# नांदेडमध्ये महाराजाचा महिलेवर बलात्कार

◆ **नांदेड, २२ मार्च**

लग्नाचे आमिष दाखवून मठाधिपती असलेल्या महाराजाने एका विधवा महिलेवर बलात्कार केल्याची घटना नांदेडमध्ये समोर आली आहे. वर्षभर लैंगिक संबंध ठेवून लग्नास नकार दिल्यामुळे हा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी पीडित महिलेल्या तक्रारीवरुन नांदेड पोलिसांनी आरोपी महाराजाला अटक केली आहे. हरिगिरी महाराज, असे आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित विधवा महिला मे २०२५ मध्ये नांदेड शहरातील गाडीपुरा भागातील एका मठात गेली होती. तिथे तिची ओळख हरिगिरी महाराजाशी झाली. पीडिता दर गुरूवारी मोठ्या श्रद्धेने या मठात दर्शनासाठी येत होती. तिने हरिगिरी महाराजांना आपले गुरू मानले होते. पण या भोंदू महाराजाची तिच्यावर वाईट नजर होती. तो सतत तिला फोन करून आपल्या जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न करत होता. अखेर त्यात त्याला यश आले. आपल्या वाढदिवसाचे निमित्त साधून १४ जुलै २०२५ रोजी हरिगिरी महाराज पीडित महिलेच्या घरी गेला. तिथेच त्याने पहिल्यांदा महिलेवर लैंगिक अत्याचार केला. त्यानंतर ही बाब कुणालाही न सांगण्यासाठी त्याने महिलेला लग्नाचे आमिष दाखवले. ◂(वृत्तसंस्था)

### लग्न करण्यास नकार

**लग्नाचे आमिष दाखवत त्याने अनेकदा तिच्यावर बलात्कार केला. त्यानंतर महिलेने लग्नाचा तगादा लावताच तो तिला टाळू लागला. मी संन्यासी असल्यामुळे लग्न करू शकत नाही, असे म्हणत हात वर केले. यामुळे आपली फसवणूक झाल्याची बाब लक्षात येताच पीडितेने पोलिसात तक्रार दाखल केली. या प्रकरणी भाग्यनगर पोलिसांनी हरिगिरी दत्तगिरी महाराजाविरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल करुन अटक केली.**

# नाशिकचा हर्षवर्धन सदगीर दुसऱ्यांदा 'महाराष्ट्र केसरी'

(पान १ वरून) ▸

माती विभागाच्या अंतिम फेरीत महेंद्र गायकवाडने हिंगोलीच्या सिकंदर शेखवर सरळ ३-० ने विजय नोंदविला आणि या विभागाचे विजेतेपद पटकावले आणि महाराष्ट्र केसरीच्या अंतिम फेरीसाठी आपली पात्रता सिद्ध केली.

गादी विभागाच्या अंतिम फेरीत नाशिकच्या हर्षवर्धन सदगीरने सोलापूरच्या जय पाटीलचा सरळ १०-० गुणांनी पराभव करून या विभागाचे विजेतेपद पटकावले आणि महाराष्ट्र केसरीच्या अंतिम फेरीसाठी आपले स्थान निश्चित केले.

शनिवारी रात्री उशिरा झालेल्या उपांत्य फेरीच्या लढतीत गादी विभागात हर्षवर्धन सदगीरने कोल्हापूरच्या पृथ्वीराज पाटीलचा ६-२ अशा फरकाने पराभव केला व अंतिम फेरी गाठली, तर जय पाटीलने पुण्याच्या पृथ्वीराज मोहोळला चितपट करीत दणक्यात अंतिम फेरी गाठली. माती विभागात महेंद्र गायकवाडने सोलापूरच्या रविराज चव्हाणवर १०-० असा एकतर्फी विजय मिळविला. दुसऱ्या उपांत्य लढतीत हिंगोलीच्या सिंकदर शेखने अहिल्यानगरच्या सुदर्शन कोतकर याच्यावर ४-३ अशा एका गुणाच्या फरकाने रोमहर्षक विजय मिळविला व अंतिम फेरी गाठली. ◂(वृत्तसंस्था)

# माजी खासदार दत्ता मेघे यांचे निधन

(पान १ वरून) ▸

राजकारणात आले आणि मग त्यांनी कधीच मागे वळून पाहिले नाही. दातृत्व भाव जपणारा लोकनेता अशीच त्यांची प्रतिमा होती. अनेक लोकांना, गरीब, गरजवंतांना सढळ हाताने मदत करण्यात दत्ताभाऊ नेहमीच अग्रेसर राहायचे. दत्ता मेघे राज्यसभा आणि विधान परिषदेचेही सदस्य राहिले होते. रविवारी त्यांनी पांडे ले-आऊटस्थित आपल्या निवासस्थानी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या पश्चात आमदार समीर मेघे, माजी आमदार सागर मेघे आणि दोन मुली तसेच बराच मोठा आप्तपरिवार आहे.

मनमिळाऊ स्वभावाचे दत्ता मेघे यांचा राजकीय जीवनात फार मोठा दबदबा होता. म्हणूनच की काय, सन १९७८ मध्ये ते आमदार नसतानाही दत्ता मेघे महाराष्ट्र शासनात मंत्री झाले होते. असा प्रसंग त्यांच्या राजकीय जीवनात दोन वेळा घडला, हे विशेष.

दत्ता मेघे एकूण ५ वेळा खासदार राहिले, तर चार वेळा मंत्रिपदी विराजमान झाले होते. त्यांचे प्राथमिक शिक्षण वर्धा जिल्ह्यातील पवनार गावात झाले. त्यानंतर पुढील शिक्षणासाठी नागपुरातील तुळशीबाग महाल येथील सी. पी. ॲण्ड बेरार येथे शिकले. त्यांचे शिक्षण बी. ए.पर्यंत झाले होते. रविवार, २२ मार्च रोजी नेहमीप्रमाणे सायंकाळी ६.३० च्या सुमारास त्यांनी नारळपाणी घेतले. पण अचानक ठसका लागला आणि हृदयविकाराने दत्ता मेघे यांची प्राणज्योत मालवली. दत्ताभाऊ यांच्या निधनाचे वृत्त कानी पडताच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी तातडीने त्यांच्या निवासस्थानी जाऊन अन्त्यदर्शन घेत कुटुंबीयांचे सांत्वन केले. ◂(तभा वृत्तसेवा)



उत्तराखंडमध्ये गेल्या दोन दिवसांपासून जोरदार बर्फवृष्टी सुरू आहे. चमोली जिल्ह्यात असलेले बद्रीनाथ धाम परिसरात बर्फाची चादर पसरली आहे

### हे तर माझे छोटे बंधू...

**महाराष्ट्राचे** माजी मुख्यमंत्री आणि विद्यमान उपमुख्यमंत्री तसेच शिवसेना नेते एकनाथ शिंदे महिन्यातून एखादवेळा राजधानी दिल्लीत येत असतात. राजधानीत आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांची सदिच्छा भेट ते घेत असतात. यावेळीही मागील आठवड्यात शिंदे राजधानीत आले आणि त्यांनी नेहमीप्रमाणे पंतप्रधान मोदी यांची भेट घेतली. यावेळी ते गृहमंत्री अमित शाह यांना भेटू शकले नाही. सध्या संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा सुरू आहे. त्यामुळे शिंदे यांनी आपल्या गटाच्या खासदारांची दिल्लीत बैठकही घेतली. यावेळच्या शिंदे यांच्या दिल्ली भेटीचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी नवीन संसदभवनाला भेट दिली. नवीन संसदभवनाच्या मकरद्वारावर संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी, नवीन संसदभवनात तुमचे स्वागत आहे, असे म्हणत शिंदे यांचे अतिशय आत्मियतेने स्वागत केले. शिंदे यांच्यासोबत त्यांचे पुत्र आणि शिवसेना संसदीय पक्षनेते डॉ. श्रीकांत शिंदे आणि अन्य खासदारही होते. रिजिजू यांनी शिंदे यांचे स्वागत करताच शिंदे यांनी आपला मुलगा डॉ. श्रीकांत शिंदेला आवाज देत पुढे बोलावले. श्रीकांत शिंदे पुढे येताच रिजिजू यांनी, हे तर माझे छोटे भाऊ आहेत, असे म्हणत त्यांचेही अतिशय उत्साहाने स्वागत केले. त्यामुळे काही क्षण एकनाथ शिंदेही भारावले, त्यांनी रिजिजू यांना धन्यवाद दिले. यामुळे आपल्या मुलाचे रालोआतील भविष्य उज्ज्वल असल्याची शिंदे यांची खात्री पटली. नंतर संसदभवनातील कार्यालयातील शिंदे यांनी पंतप्रधान मोदी यांची भेट घेतली. डॉ. श्रीकांत शिंदे यांचे वक्तृत्व अतिशय चांगले आहे, अनेक विधेयकावर आणि विषयावर डॉ. शिंदे यांची अभ्यासपूर्ण भाषणे होतात. डॉक्टर असल्यामुळे आपल्या गटातील खासदारांची तसेच जनमानसाची नाडीही त्यांना चांगल्या प्रकारे पकडता येते.

●● ●●

### जॉन ब्रिटास यांनी घेतली सुरेश गोपी यांची फिरकी

**इराण** आणि अमेरिका-इस्रायल युद्धामुळे जगातील ऊर्जा पुरवठ्याची साखळी प्रभवित झाली आहे. देशभरात स्वयंपाकाच्या गॅसचा तुटवडा निर्माण झाला आहे. याचे पडसाद संसदभवनात उमटणे स्वाभाविक आहे. राज्यसभेत विनियोजन विधेयकावरील चर्चेत सहभागी होताना माकपचे जॉन ब्रिटास यांनी देशभरातील गॅस सिलेंडरच्या तुटवड्याचा उल्लेख केला. देशभरात स्वयंपाकाच्या सिलेंडरचा किती तुटवडा आहे आणि लोकांना त्याचा किती त्रास होत आहे, याची पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीपसिंग पुरी तसेच राज्यमंत्री सुरेश गोपी यांनी विशेष विमानाने देशभरात फिरत पाहणी करावी, असा सल्ला ब्रिटास यांनी दिला. राज्यमंत्री सुरेश गोपी आपल्या बेधडक विधानांसाठी ओळखले जातात, त्यामुळे अनेकदा त्यातून वादही निर्माण होतात आणि गोपी स्वत: अडचणीत येतात. अनेकवेळा त्यांच्यामुळे पक्ष आणि सरकारचीही अडचण होते, याचा उल्लेख करीत ब्रिटास म्हणाले की, पुरी यांनी आपल्यासोबत गोपी यांना अवश्य न्यावे, पण ते कुठेही वादग्रस्त विधान करणार नाही, याची काळजी घ्यावी. यावर पुरी यांना काय प्रतिक्रिया द्यावी, ते सुचले नाही. तर गोपी यांचा चेहरा उतरला. मात्र सभागृहात ब्रिटास यांच्या या सल्ल्यामुळे हास्य निर्माण झाले. जॉन ब्रिटास आणि सुरेश गोपी हे दोघेही केरळचे आहेत.

●● ●●

### टीबीमुक्त भारतासाठी क्रिकेटचा सामना




**सध्या** क्रिकेटचा काळ सुरू आहे. काही दिवसांपूर्वी विश्वचषक क्रिकेट स्पर्धा भारताने जिंकली आणि आता काही दिवसांत आयपीएल स्पर्धा सुरू होत आहे. टीबीमुक्त भारत या अभियानांतर्गत राजधानी दिल्लीत नुकतीच खासदार एलेव्हन विरुद्ध दिल्ली पोलिस यांच्यात २०-२० षटकांचा क्रिकेटचा सामना झाला. मेजर ध्यानचंद स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात दिल्ली पोलिसांनी खासदारांच्या संघाचा पराभव केला. खासदारांच्या संघाचे नेतृत्व माजी केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी केले. अनुराग ठाकूर यांचा क्रिकेटशी जवळचा संबंध राहिला आहे. हिमाचलप्रदेश क्रिकेट असोसिएशनचे ते अध्यक्ष होते आणि भारतीय क्रिकट नियामक मंडळाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषवले आहे. मनोज तिवारी, डॉ. श्रीकांत शिंदे खासदारांच्या संघात होते. या सामन्यात फलंदाजी करताना धाव घेण्यासाठी धावताना मनोज तिवारी जखमी झाले. डॉक्टरांनी त्यांना काही दिवस विश्रांतीचा सल्लाही दिला. या सामन्यात दिल्ली पोलिसांनी २२४ धावा काढल्या. खासदारांचा संघ मात्र २१२ धावात गारद झाला, त्याचा १२ धावांनी पराभव झाला. अनुराग ठाकूर यांनी कर्णधाराला साजेशी फलंदाजी करताना ५२ धावा काढल्या. दिल्ली पोलिसांकडून पोलिस उपायुक्त रोहित राजबीरसिंह यांनी सर्वाधिक म्हणजे पाच बळी घेतले. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांच्या हस्ते पुरस्कार वितरित करण्यात आले. खासदार एलेव्हन आणि दिल्ली पोलिस यांच्यातील सामन्यात कोण जिंकले, हे महत्त्वाचे नाही, तर टीबीला हरवणे, हे आमचे मुख्य लक्ष्य आहे, असे भाजपाचे अनुराग ठाकूर म्हणाले.

●● ●●

### राज्यसभेत निवृत्त सदस्यांचा निरोप समारंभ

**राज्यसभेतील** निवृत्त होणाऱ्या ३७ सदस्यांना बुधवारी निरोप देण्यात आला. यावेळी पंतप्रधान मोदी, विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांच्यासह निवृत्त होणाऱ्या सदस्यांची भावपूर्ण भाषणं झाली. निवृत्त होणाऱ्या राज्यसभा सदस्यांच्या पहिल्या तुकडीत खडगे यांचा समावेश नसला तरी दुसऱ्या वा तिसऱ्या तुकडीत ते राहणार आहेत. म्हणजे खडगे सध्या जात्यात नसले तरी सुपात आहेत. राजकारणात कधीच पूर्णविराम नसतो, असे मोदी यांनी आपल्या भाषणात म्हणत निवृत्त होणाऱ्या सदस्यांना दिलासा दिला. सदनात परत येण्याच्या त्यांच्या आशा जिवंत ठेवल्या. शिवसेनेच्या प्रियांका चतुर्वेदी यांचेही यावेळी भाषण झाले. शिवसेनेजवळ पुरेसे संख्याबळ नसल्यामुळे राज्यसभेत परत येण्याची त्यांची इच्छा अपूर्ण राहिली. शिवसेनेमधील काही नेत्यांनीच प्रियांका चतुर्वेदी यांच्या परत येण्याच्या मार्गात अडथळे उभे केले, अशी चर्चा आहे. मात्र निरोपाच्या भाषणात मी परत या सभागृहात येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. हा विश्वास त्यांनी कशाच्या आधारावर व्यक्त केला, हे कळायला मार्ग नसला तरी आपण अजूनही आशा सोडली नसल्याचे त्यांच्या या विधानातून जाणवले. निरोप घेणाऱ्यांमधून फार मोजके सदस्य परत येणार आहेत. यात राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार आणि काँग्रेसचे अभिषेक मनू सिंघवी यांच्यासह काही सदस्यांचा समावेश आहे.

● **दिल्लीवाला**

# पृथ्वीवर कोसळली सात टनांची उल्का

## ७२ हजार किलोमीटर वेगाने आदळली

◆ **वॉशिंग्टन, २२ मार्च**

अमेरिकेतील ओहायो राज्यातील क्लीव्हलँडमध्ये नुकतीच एक उल्का कोसळली. या घटनेने सर्वांनाच सर्वांनाच आश्चर्यचकित केले. सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास झालेल्या एका प्रचंड मोठ्या आवाजाने लोक हादरून गेले.

हा आवाज एखाद्या शक्तिशाली बॉम्बस्फोटासारखा होता. विशेष म्हणजे हा उल्कापिंड भरदिवसा आकाशात दिसून आला. हे अत्यंत दुर्मीळ मानले जाते. नासाच्या 'मेटरॉयड एन्व्हायर्नमेंट ऑफिस'ने दिलेल्या माहितीनुसार, या उल्कापिंडाचा व्यास सुमारे सहा फूट आणि वजन तब्बल सात टन होते. हा दगड ताशी ७२,४०० किलोमीटर या वेगाने पृथ्वीच्या वातावरणात शिरला. हा अग्निगोळा सर्वप्रथम लेक एरीच्या ८० किमी वर दिसला आणि दक्षिण पूर्वेकडे सरकत ओहायोच्या ४८ किमीवर असताना त्याचे तुकडे झाले. नासाच्या अंदाजानुसार, हवेत जेव्हा हा उल्कापिंड फुटला, तेव्हा त्यातून २५० टन टीएनटी स्फोटकांमधून निघणाऱ्या ऊर्जेइतका मोठा स्फोट झाला. हा स्फोट एखाद्या मोठ्या 'मिलिटरी ग्रेड' सारखा होता. याची चमक वॉशिंग्टन डीसीसह अमेरिकेतील १० राज्ये आणि कॅनडातील ओंटारियो प्रांतातूनही लोकांनी दिसली. हा खरोखरच एका विशाल अग्निगोळ्यासारखा दिसत होता, असे अमेरिकन मेटिओर सोसायटीचे कार्यकारी संचालक कार्ल हर्गेनरोथन यांनी सांगितले. क्लीव्हलँडमधील हवामान विभागाच्या कर्मचाऱ्यांनीही या स्फोटाचे कंपन अनुभवले. या घटनेतील सर्वात भीतीदायक बाब म्हणजे, इतका मोठा दगड पृथ्वीच्या इतक्या जवळ येईपर्यंत कोणत्याही एजन्सीला त्याची साधी चाहूलही लागली नाही. ◂(वृत्तसंस्था)



### लोकवस्तीत कोसळला दगड

नासा आणि इतर संस्था पृथ्वीच्या जवळून जाणाऱ्या प्रत्येक वस्तूंवर लक्ष ठेवतात. मात्र हा लघुग्रह 'प्लॅनेटरी डिफेन्स सिस्टीम'ला चकवा देऊन थेट वातावरणात शिरला. कोणत्याही पूर्वसूचना किंवा इशाऱ्याशिवाय २५० टन टीएनटी क्षमतेचा धमाका करणारा एखादा दगड लोकवस्ती असलेल्या भागात कोसळला असता, तर मोठी जीवितहानी झाली असती. यामुळे भविष्यातील सुरक्षेबाबत संशोधकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# अमेरिकेच्या २१ लष्करी तळांवर हल्ले

## ड्रोन, क्षेपणास्त्राचा मारा, आयआरजीसी-आयआरएची संयुक्त कारवाई



◆ **बगदाद, २२ मार्च**

इराणच्या 'इस्लामिक रिव्हाल्यूशनरी गार्डस्' आणि 'इस्लामिक रेझिस्टन्स इन इराक' या संघटनेने इराकमधील अमेरिकेच्या २१ लष्करी, हवाई तळावर संयुक्त हल्ले चढविले. या हल्ल्यात अनेक ड्रोन आणि क्षेपणास्त्राचा वापर करण्यात आला. अमेरिकेच्या तळाचे मोठे नुकसान झाल्याचा दावा आयआरजीसीने निवेदनातून केला आहे. अमेरिकेकडून यावर अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही.

इराकमधील अमेरिकेची हवाई आणि लष्करी तळांवर रविवारी पहाटे जोरदार हल्ले चढविले. यात त्यांच्या २१ तळांचे नुकसान झाल्याचे आयआरजीने म्हटले आहे. कारवाईसाठी आयआरएने मदत केली. एका इराकी सुरक्षा अधिकाऱ्याने हल्ल्याची पुष्टी केली आहे. त्यांनी वृत्तसंस्थेला सांगितले की, हवाई संरक्षण यंत्रणेने बगदाद आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळील एका अमेरिकी लष्करी तळाच्या दिशेने आलेले अनेक ड्रोन नष्ट केले. याशिवाय इराकमधील अमेरिकेची इतर लष्करी आणि हवाई तळावर अनेक स्फोट झाले. यात झालेल्या नुकसानीचा तपशील समोर आलेला नाही. दुसरीकडे इराणने इस्रायलच्या अनेक भागात क्षेपणास्त्रांचा मारा केला. इस्रायलने प्रतिहल्ला करीत इराणची राजधानी तेहरानवर ड्रोनचा मारा केला. अमेरिका-इस्रायलचे ड्रोन हवेतच नष्ट झाल्याचा दावा केला. इराणी लष्कराने म्हटले की, त्यांच्या हवाई संरक्षण प्रणालीने १२७ अत्याधुनिक ड्रोन नष्ट केले आहे. (वृत्तसंस्था)

### इस्रायलचा लेबनॉनवर तोफगोळ्यांचा मारा

**इस्रायलच्या संरक्षण दलाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, दक्षिण लेबनॉनमध्ये हिजबुल्लाहच्या अड्ड्यांना लक्ष्य करून तोफगोळ्यांचा मारा केला. इस्रायली लष्कर जमिनी मार्गाने लेबनॉनमध्ये हल्ले करीत आहे. त्यांनी हिजबुल्लाच्या अनेक अड्डे उद्ध्वस्त केले, रविवारीच्या कारवाईत हिजबुल्लाहचे १० दहशतवादी ठार झाले. खियाम आणि तैबेह या शहरात संघर्ष सुरू आहे.**

### सौदीने इराणचा हल्ला उधळला

**सौदी अरबच्या संरक्षण मंत्रालयाने सांगितले की, रविवारी पहाटे इराणने रियाधसह अनेक शहरात ड्रोनचा मारा केला. हवाई संरक्षण प्रणालीने त्यांचे सर्व ड्रोन नष्ट केले. संपूर्ण प्रदेशात सुरक्षा वाढवण्यात आली आहे. देशाची सुरक्षा पूर्णपणे मजबूत आहे आणि सैन्य कोणत्याही धोक्याचा सामना करण्यास सज्ज आहे.**

## ...तर मुंबई, दिल्लीवर हल्ला करणार : बासित

◆ **इस्लामाबाद, २२ मार्च**

अमेरिकेने पाकिस्तानवर हल्ला केल्यास आम्ही कोणताही विचार न करता भारताची आर्थिक राजधानी मुंबई आणि दिल्लीवर हल्ला करू. आम्ही त्यांना सोडणार नाही, पुढे काय होईल ते नंतर पाहू, अशा शब्दांमध्ये पाकिस्तानचे माजी उच्चायुक्त अब्दुल बासित यांनी एका कार्यक्रमात गरळ ओकली.

बासित म्हणाले, अमेरिकेने आमच्या अणुशस्त्रांना लक्ष्य केल्यास, आम्ही दिल्ली आणि मुंबईवर मोठा हल्ला करू, जर कोणी आमच्याकडे वाकड्या नजरेने पाहिले, तर पाकिस्तानकडे भारतावर जिथे हवे तिथे हल्ला करण्याशिवाय दुसरा पर्याय उरणार नाही. अब्दुल बासित यांनी २०१४ ते २०१७ या काळात नवी दिल्लीत पाकिस्तानचे उच्चायुक्त म्हणून काम केले आहे. हा काळ दोन्ही देशांमधील संबंधांच्या दृष्टीने अत्यंत क्लिष्ट होता. (वृत्तसंस्था)



इस्रायली लढाऊ विमानांनी रविवारी लेबनॉनच्या तेरे शहराला लक्ष्य केले. शहराला जोडणारा कासमियाह पूल उडवून लावल्याने संपर्क तुटला आहे.

# समानता कागदावर नव्हे, प्रत्यक्ष दिसायला हवी

## सरन्यायाधीश सूर्य कांत यांचे प्रतिपादन

◆ **बंगळूरू, २२ मार्च**



विधी व्यवसायात महिलांसाठी समानता केवळ कागदावर नव्हे, तर प्रत्यक्षात दिसली पाहिजे. महिलांचा निरंतर सहभाग आणि प्रगती सुनिश्चित करण्यासाठी संरचनात्मक सुधारणा आणि संस्थात्मक पाठिंबा आवश्यक असल्याचे सरन्याधीश सूर्य कांत एका कार्यक्रमात म्हणाले.

सर्वोच्च न्यायालयाच्या बार असोसिएशनने बंगळूरू येथे आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात विधी व्यवसायातील महिलांसाठी औपचारिक समानतेचे प्रत्यक्ष अनुभवात रूपांतर करण्याच्या गरजेवर भर देताना सरन्यायाधीश म्हणाले, वकिली व्यवसायात महिलांना भेडसावणारी आव्हाने आणि त्यावर उपाययोजना करण्यासाठी प्रणालीगत उपायांची गरज आहे. माझा वैयक्तिक विश्वास आहे की, जेव्हा आपण आपल्या घटनात्मक चौकटीत समानतेबद्दल बोलतो, तेव्हा ती केवळ कागदावरच नसावी. त्यामुळे, समानतेला प्रत्यक्ष अनुभवात उतरवणे महत्त्वाचे आहे. सततच्या प्रयत्नांतून लिंग-आधारित भेदभाव कमी केला जाऊ शकतो आणि घटनात्मक समानतेचे वचन पूर्ण केले जाऊ शकते. कायद्याचा अभ्यास करणाऱ्या एकूण विद्यार्थ्यांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त महिला आहेत. वकिली व्यवसायात प्रवेश करणाऱ्या नवीन वकिलांमध्येही महिलांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. (वृत्तसंस्था)

# अमेरिकेचे ८०० दशलक्ष डॉलर्सचे नुकसान

## आखाती देशातील लष्करी तळाची पुनर्बांधणी करण्याचे आव्हान

◆ **वॉशिंग्टन, २२ मार्च**

अमेरिका आणि इस्रायलने इराणविरुद्ध लष्करी कारवाई सुरू केल्यापासून तीन आठवड्यात अमेरिकेचे ८०० दशलक्ष डॉलर्सचे नुकसान झाले. आखाती देशातील लष्करी आणि हवाई तळाचे मोठे नुकसान झाले असून या तळाची पुनर्बांधणी करण्याचे अमेरिकेसमोर आव्हान असल्याची माहिती एका अहवालातून समोर आली.

'सेंटर फॉर स्ट्रॅटेजिक अँड इंटरनॅशनल स्टडीज' अर्थात् सीएसआयएसच्या अहवालवानुसार इराणच्या क्षेपणास्त्रांनी आखाती देशातील अमेरिकेच्या तळांना मोठे नुकसान झाले. युद्धाच्या दोन आठवड्यांत इराणच्या हल्ल्यांमुळे अमेरिकेच्या लष्करी तळांचे अंदाजे ८०० दशलक्ष डॉलर्सचे नुकसान झाले आहे. अमेरिकेसाठी युद्धाची किंमत सातत्याने वाढत आहे. सीएसआयएसचे सल्लागार आणि अहवाल प्रकाशित करणारे मार्क कॅन्सियन यांच्या मते, या प्रदेशातील अमेरिकी तळांवरील नुकसानीचा अंदाज कमी लावला गेला आहे आणि ते प्रत्यक्षात जास्त असू शकते. इराणने युद्धाच्या सुरुवातीपासूनच रडार प्रणालींना लक्ष्य केले. (वृत्तसंस्था)

### रशियाच्या मदतीने अचूक लक्ष्य गाठले

कुवैतमधील आरिफजान आणि सौदी अरबमधील प्रिन्स सुलतान हवाई तळावरील रडार प्रणाली उद्ध्वस्त झाली आहे. याशिवाय आखाती देशातील इमारती, पायाभूत सुविधा आणि इतर लष्करी सुविधांच्या नुकसानीचा आकडा ३१० दशलक्ष डॉलर्स आहे. उपग्रह प्रतिमांच्या विश्लेषणातून असेही उघड झाले आहे की, इराणने कुवैतमधील अली अल-सलीम तळ, कतारमधील अल-उदैद हवाई तळ तळावर अनेक हल्ले केले, जे अमेरिकेच्या विशिष्ट लष्करी मालमत्तांना पद्धतशीरपणे लक्ष्य केल्याचे दर्शवते. रशियाने अमेरिकेच्या लष्करी हालचालींविषयीची गुप्त माहिती इराणला दिली, ज्यामुळे या हल्ल्यांची अचूकता वाढली.

# अंतिम मतदारयादी जाहीर होण्यापूर्वी सतर्कता बाळगा

◆ **कोलकाता, २२ मार्च**

पश्चिम बंगाल सरकारने राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी विशेष सूचना जारी केल्या आहेत. पुरवणी मतदार यादी २३ मार्चला जाहीर होणार आहे. या काळात कोणताही गोंधळ टाळण्यासाठी खबरदारी घेण्यास त्यांना सांगण्यात आले आहे. राज्य सचिवालयातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने आणि गृह व डोंगराळ व्यवहार विभागाने हा आदेश जारी केला आहे. ही यादी सोमवारी जाहीर होण्याची शक्यता आहे.

जिल्हाधिकाऱ्यांना पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे की, ज्या भागात गर्दी जमण्याची शक्यता आहे तेथे गर्दी नियंत्रणासाठी कडक व्यवस्था करावी. संवेदनशील भागांवर बारकाईने लक्ष ठेवावे आणि शांतता राखण्यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना कराव्यात. शासनाच्या वरिष्ठ विशेष सचिवांनी या सूचना जारी केल्या आहेत. त्यांनी जिल्हा अधिकाऱ्यांना आवश्यक पायाभूत सुविधा तयार करण्यास आणि पोलिसांना संपूर्ण माहिती देण्यास सांगितले आहे. हा आदेश पोलिस महासंचालक (डीजीपी), पोलिस महानिरीक्षक (आयजीपी) आणि कोलकाता पोलिस आयुक्त यांनाही कळवण्यात आला आहे, जेणेकरून ते सुरक्षेची व्यवस्था करू शकतील.

**पहिली पुरवणी यादी आज जाहीर होणार**

निवडणूक आयोगाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, पहिली पुरवणी मतदार यादी २३ मार्चला जाहीर होण्याची शक्यता आहे. राज्यभरातील सुमारे ८०,००० मतदान केंद्रांवर ही अद्ययावत यादी प्रदर्शित करण्याची तयारी सुरू आहे. सोमवारपर्यंत ती अंतिम केली जाईल. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही मतदार यादी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. (वृत्तसंस्था)



काश्मीर खोऱ्यातील कुलगाम जिल्ह्यात २३ मार्च २००३ मध्ये लष्कर-ए-तोयबाच्या दहशतवाद्यांनी मध्यरात्री ११ वाजताच्या सुमारास नंदीमार्ग या गावात २४ काश्मिरी पंडितांची गोळ्या घालून अमानुष हत्या केली होती. या घटनेला २३ वर्षे झाली. ११ महिला, ११ पुरुष आणि दोन लहान मुलांना घराबाहेर काढून रांगेत उभे केले आणि गोळ्या झाडल्या. घटनेच्या ठिकाणी लष्करी जवान तैनात करण्यात आले आहेत

## चित्रपट वार्ता

### 'धुरंधर-२'चा दक्षिणेत जलवा

**मुंबई** : बॉलीवूड अभिनेता रणवीर सिंग याच्या 'धुरंधर-२' या चित्रपटाने प्रदर्शित झाल्यापासून बॉक्स ऑफिसवर अभूतपूर्व यश मिळवत सर्व विक्रम मोडले आहेत. अल्पावधीतच ५०० कोटींचा टप्पा पार करत या चित्रपटाने देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरही प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. चित्रपटाची वाढती लोकप्रियता पाहता चित्रपटसृष्टीतील दिग्गज कलाकार आणि दिग्दर्शकांकडूनही कौतुक होत आहे. प्रसिद्ध दिग्दर्शक एस. एस. राजामौली यांनी दिग्दर्शक आदित्य धर यांच्या या चित्रपटाचे विशेष कौतुक केले आहे. सामाजिक माध्यमांवर प्रतिक्रिया देताना राजामौली यांनी नमूद केले की, 'धुरंधर-१' आवडला होता, मात्र 'धुरंधर-२ : द रिव्हेंज'ने त्या चित्रपटालाही मागे टाकत अधिक उंची गाठली आहे. लेखन, कलाकारांची निवड, तांत्रिक बाबी, संगीत आणि दिग्दर्शन या सर्व घटकांचा उत्कृष्ट संगम या चित्रपटात दिसून येतो. चित्रपटातील भावनिक प्रसंगांमध्ये रणवीरने साकारलेली भूमिका अत्यंत प्रभावी आहे. सुरुवातीपासून ते क्लायमॅक्सपर्यंत त्याने साकारलेले विविध पैलू प्रेक्षकांच्या मनाला भिडतात. तसेच सहकलाकार आर. माधवन यांच्या अभिनयालाही त्यांनी दाद दिली.

### 'झिम्मा ३'चे पोस्टर रिलीज!



**मुंबई** : मराठी चित्रपटसृष्टीतील गाजलेल्या 'झिम्मा' मालिकेचा तिसरा भाग आता प्रेक्षकांच्या भेटीस येणार असून, 'झिम्मा-३'चे पहिले पोस्टर नुकतेच प्रदर्शित करण्यात आले आहे. दिग्दर्शक हेमंत ढोमे यांच्या वाढदिवसानिमित्त हे पोस्टर सादर केले असून, सामाजिक माध्यमांवर त्याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. 'क्रांतीज्योती विद्यालय मराठी माध्यम' या चित्रपटाच्या यशानंतर हेमंत ढोमे आणि निर्माती क्षिती जोग यांनी 'झिम्मा ३'ची घोषणा केली होती. या घोषणेनंतर चाहत्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. आता पहिल्या देखाव्याच्या प्रसिद्धीनंतर या उत्सुकतेत आणखी भर पडली आहे.

### अक्षय कुमार-राजपाल यादव 'नागिन- ७'च्या सेटवर



**मुंबई** : बहुप्रतीक्षित 'भूत बंगला' या चित्रपटाबाबत प्रेक्षकांमध्ये दिवसेंदिवस उत्साह वाढताना दिसत आहे. चित्रपटाचे गाणे आणि झलक प्रसिद्ध झाल्यानंतर या कौटुंबिक विनोदी चित्रपटाबद्दल प्रेक्षकांची उत्सुकता अधिकच वाढली आहे. याच पार्श्वभूमीवर अभिनेता अक्षय कुमार आणि राजपाल यादव यांनी लोकप्रिय मालिका 'नागिन-७'च्या सेटला भेट देत चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले. मालिकेच्या सध्या सुरू असलेल्या भागात अक्षय कुमार यांनी 'महानाग'ही विशेष भूमिका साकारत नागिनला मार्गदर्शन करताना दिसले. हा प्रसंग पाहण्यासाठी चाहत्यांमध्येही मोठी उत्सुकता होती. सध्या 'नागिन-७' ही मालिका कथानकाच्या महत्त्वाच्या टप्प्यावर असून प्रेक्षकांकडून तिला मोठा प्रतिसाद मिळत आहे. निर्माती एकता कपूर यांच्या या लोकप्रिय मालिकेच्या सातव्या भागात अभिनेत्री प्रियंका चहर चौधरी प्रमुख भूमिकेत झळकत आहे. दरम्यान, 'भूत बंगला' या चित्रपटातून अक्षय कुमार आणि दिग्दर्शक प्रियदर्शन यांची बहुचर्चित जोडी पुन्हा एकत्र येत आहे. या जोडीने यापूर्वी अनेक गाजलेले विनोदी चित्रपट दिले असून, त्यांच्या खास शैलीमुळे प्रेक्षकांना या नव्या चित्रपटाकडूनही मोठ्या अपेक्षा आहेत.

# कर्मचाऱ्यांच्या पगारात कपात; अर्थव्यवस्थेची पीछेहाट

**मॉडर्न डिप्लोमसीच्या अहवालातील माहिती**

## अमेरिका-इराण युद्धाचा चीनला फटका




◆ **बीजिंग, २२ मार्च**

अमेरिका आणि इराणमधील वाढत्या युद्धजन्य तणावाचा सर्वाधिक तडाखा आता जगाचे उत्पादन केंद्र असलेल्या चीनला बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मॉडर्न डिप्लोमसीच्या ताज्या अहवालानुसार, कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती आणि कच्च्या मालाची टंचाई यामुळे चीनच्या उत्पादन क्षेत्रात मोठी घसरण नोंदविण्यात आली. वाढत्या खर्चामुळे अनेक कंपन्यांनी कर्मचाऱ्यांच्या पगारात कपात करायला सुरुवात केली, तर दुसरीकडे अर्थव्यवस्थेतही घसरण नोंदविण्यात आली.

चीन गेल्या अनेक महिन्यांपासून डिफ्लेशन (किमती कमी होणे आणि मंदीसदृश स्थिती) या संकटाशी झुंजत आहे. कंपन्यांचा उत्पादन खर्च वाढला असला तरी, ग्राहकांकडे खरेदीची शक्ती नसल्यामुळे कंपन्या हा भार त्यांच्यावर टाकू शकत नाहीत. परिणामी, कंपन्यांचा नफा संपुष्टात येत आहे. नफा घटल्यामुळे कंपन्यांनी नवीन भरती थांबवली असून, अनेक ठिकाणी कर्मचाऱ्यांच्या वेतनात कपात केली जात आहे. चीनमधील उत्पादन क्षेत्रातील सुमारे २५ टक्के कंपन्या सध्या तोट्यात आहेत. अतिउत्पादन क्षमता आणि तीव्र स्पर्धेमुळे कंपन्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. गेल्या वर्षभरात अर्ध्याहून अधिक कर्मचाऱ्यांना कोणतीही पगारवाढ मिळालेली नाही. दुसरीकडे मध्य आशियातील संघर्षामुळे कंपन्यांचा नफा घटल्याने त्यांनी कर्मचाऱ्यांच्या पगारात कपात करण्यास सुरुवात केली. (वृत्तसंस्था)

### बेरोजगारीचे प्रमाण चिंताजनक

चीनमधील तरुणांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण चिंताजनक आहे. शेकडो अर्ज करूनही नोकरी मिळत नसल्याने तरुणांमध्ये असंतोष वाढत आहे. उत्पन्न थांबल्यामुळे चिनी नागरिकांनी आपला खर्च मर्यादित केला आहे, ज्याचा थेट परिणाम देशांतर्गत मागणीवर झाला आहे. चीनची अर्थव्यवस्था प्रामुख्याने निर्यातीवर अवलंबून आहे. मात्र, जागतिक स्तरावर ऊर्जा महागल्याने इतर देशांची खरेदी क्षमताही कमी झाली आहे.

### निर्यातीत घसरण

ऊर्जेच्या किमती वाढल्यामुळे चीनच्या वस्तू महाग होत आहेत, ज्यामुळे जागतिक बाजारात त्यांच्या निर्यातीला फटका बसत आहे. अर्थशास्त्रज्ञांच्या मते, जर कच्च्या तेलाच्या किमती अशाच वाढत राहिल्या, तर चीनच्या जीडीपी विकासदरात मोठी घट होऊ शकते. खर्च-आधारित महागाई चीनच्या उत्पादक कंपन्यांना दिवाळखोरीकडे नेऊ शकते. याचा परिणाम केवळ चीनवरच नाही, तर जागतिक पुरवठा साखळीवरही होणार आहे.

# सरकारने देशांतर्गत विमान भाड्यांवरील मर्यादा हटवली

## भाडेवाढीची शक्यता बळावली

◆ **नवी दिल्ली, २२ मार्च**

नागरी हवाई वाहतूक मंत्रालयाने २३ मार्चपासून देशांतर्गत विमान भाड्यांवरील तात्पुरती मर्यादा हटवली आहे. विमानसेवा स्थिर झाल्यानंतर आणि क्षमता पूर्ववत झाल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. हे निर्बंध मूळतः डिसेंबर २०२५ मध्ये लागू करण्यात आले होते. इंडिगोने मोठ्या प्रमाणावर उड्डाणे रद्द केल्यामुळे जागांची तीव्र टंचाई निर्माण झाली होती आणि प्रमुख देशांतर्गत मार्गांवरील विमान भाडे गगनाला भिडले होते. त्यानंतर हे निर्बंध लागू करण्यात आले होते.



सूत्रांनी सांगितले की, हे निर्बंध हटवल्यामुळे भाडे पुन्हा बाजार-आधारित मॉडेलवर परत येईल. भाड्यावरील मर्यादा हटवताना, मंत्रालयाने विमान कंपन्यांना वाजवी आणि पारदर्शक भाडे दर राखण्याचा आणि अवाजवी भाडेवाढ झाल्यास नियामक हस्तक्षेपाचा इशारा दिला आहे. नागरी हवाई वाहतूक महासंचालनालय भाड्यांवर रिअल-टाइममध्ये सतत देखरेख ठेवणार आहे. (वृत्तसंस्था)

### नियामक अधिकारांचा वापर

यापूर्वी, ६ डिसेंबर २०२५ रोजी, नागरी हवाई वाहतूक मंत्रालयाने सध्याच्या संकटकाळात काही विमान कंपन्यांकडून आकारल्या जाणाऱ्या अवाजवी भाड्यांबद्दलच्या चिंतांची गंभीर दखल घेतली होती. प्रवाशांना कोणत्याही मनमानी दरांपासून वाचवण्यासाठी, मंत्रालयाने आपल्या नियामक अधिकारांचा वापर करून सर्व प्रभावित मार्गांवरील भाडे दर योग्य आणि वाजवी असल्याची खात्री केली आहे. सर्व विमान कंपन्यांना एक अधिकृत निर्देश जारी करण्यात आला, ज्यात त्यांना आता निश्चित केलेल्या भाडे मर्यादेचे काटेकोरपणे पालन करण्याचे आदेश देण्यात आले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# विनाशाच्या दिशेने...

लष्करी उद्दिष्टे साध्य झाली की युद्ध अथवा संघर्ष थांबविणे हे शहाणपणाचे लक्षण असते. 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान दहशतवादी तळ नष्ट केल्यानंतर भारताने लगेच कारवाई थांबविली. पाकिस्तानात घुसून हवाई  हल्ले करण्यात आले होते. भारतीय लष्कराने जे लक्ष्य निश्चित केले होते, ते साध्य केल्यानंतर संघर्ष वाढणार नाही याची काळजी घेतली गेली होती. मात्र, पाकिस्तानने मागचा पुढचा विचार न करता भारताच्या दिशेने शेकडो क्षेपणास्त्रे आणि ड्रोन्स पाठविली. काही तासांच्या या छोटेखानी संघर्षात पाकिस्तानला ११ हवाई तळांचे नुकसान सहन करावे लागले. सुदैवाने दोन दिवसांतच हा संघर्ष शमला. खरे तर युद्धबंदीची याचना केली नसती तर त्याचे परिणाम काय होतील, याची जाणीव पाकिस्तानला झाली होती. त्यामुळे युद्ध थांबविण्याची विनंती करीत पाकिस्तानने होणारे नुकसान टाळले. असे आखातात घडताना दिसत नाही; संघर्ष लांबत आणि वाढत चालला आहे. इराण आणि इस्रायल-अमेरिकेला अद्याप परिपक्वता दाखविता आली नाही, असेच सध्याच्या संघर्षाबाबत म्हणावे लागेल. मध्यपूर्वेतील संघर्ष दिवसेंदिवस भीषण रूप धारण करीत आहे. ना इराण मागे हटायला तयार आहे, ना इस्रायल-अमेरिका. इराण जास्तीत जास्त एक आठवडा युद्ध करू शकेल, असा अंदाज डोनाल्ड ट्रम्प यांनी बांधला असावा. तथापि, रविवारी युद्धाने २३ व्या दिवसांत प्रवेश केला आहे. इराणच्या लष्करी शक्तीबाबत इस्रायल-अमेरिकेने बांधलेले अंदाज पूर्णपणे चुकले आहेत.

अमेरिकेसारख्या शक्तिशाली आणि तंत्रज्ञानाने युक्त इस्रायलच्या तोंडाला इराणने फेस आणला आहे. तेहरानपासून इस्रायल जवळपास दोन हजार किलोमीटर दूर आहे; पण हा देशही क्षेपणास्त्रांच्या माऱ्याने घायाळ झाला. इराण ज्या प्रकारे लढतो आहे, ते पाहून जग स्तिमित झाले आहे. इस्रायल-अमेरिकेच्या हवाई हल्ल्यांपुढे इराण झुकलेला नाही. सर्वोच्च नेत्यांपासून तर अगदी गुप्तचर संस्थेच्या प्रमुखापर्यंत धार्मिक, राजकीय आणि लष्करी नेते युद्धात मारले गेले असले तरी इराणी सेना लढतेच आहे. तिन्ही देशांसाठी हे युद्ध आता आत्मसन्मानापर्यंत पोहोचले आहे. इराण बेचिराख होण्याच्या अवस्थेपर्यंत पोहचला तरी रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत लढण्याची भाषा करतो आहे. दुसरीकडे अमेरिका आपले नाक कापले जाणार नाही यासाठी लढतो आहे. इराणची अण्वस्त्रनिर्मिती क्षमता नष्ट करणे आणि त्यासाठी आण्विक प्रकल्प आणि लष्करी क्षमता नष्ट करणे ही अमेरिका-इस्रायलची उद्दिष्टे असावीत असा अंदाज दिसून येतो. असे असले तरी वास्तविकता वेगळी आहे. आजच्या जगात कुणालाही कमजोर समजण्याची चूक करता येणार नाही. बलाढ्य रशियासोबत युक्रेन अजूनही झुंजतो आहे. इराणचा प्रश्न हा युद्धाने सुटणारा नसल्याचे सांगत आंतरराष्ट्रीय अणुसंस्थेचे महासंचालक रफायल ग्रोसी यांनी अमेरिका आणि इस्रायलला आरसा दाखविला. साधने नष्ट करता येतात; पायाभूत सुविधा जमीनदोस्त केल्या जाऊ शकतात, पण एखाद्या देशाची महत्त्वाकांक्षा नष्ट केली जाऊ शकत नाही. आण्विक अस्त्रे तयार करणे ही इराणची महत्त्वाकांक्षा राहिली आहे. ग्रोसी यांनी इशारा देताना एकप्रकारे अमेरिकेला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे. अणुबॉम्ब तयार करण्याच्या लक्ष्यापासून इराणला युद्धाच्या माध्यमातून दूर करता येणार नाही. लढाईत आतापर्यंत इराणच्या आण्विक प्रकल्पांची किती हानी झाली हे मोजता येणार नाही. अणुप्रकल्प आणि उपकरणे नष्ट झाली तरी ती पुन्हा प्राप्त केली जाऊ शकतात. ग्रोसी यांनी खरा प्रश्न उपस्थित केला तो इराणकडे असलेल्या जवळपास ४०० किलो युरेनियमचा. युद्ध संपले तरी हे युरेनियम इराणकडेच राहणार आहे. या युरेनियमची समृद्धता साठ टक्क्यांच्या आसपास आहे, जी अणुबॉम्ब तयार करण्याच्या पातळीजवळ आहे. अणुबॉम्ब तयार करण्याचे ज्ञान इराणी शास्त्रज्ञांनी मिळविले आहे. हे ज्ञान कसे हिसकावून घेणार, असा  प्रश्न ग्रोसी यांनी उपस्थित केला आहे. त्यामुळे इराणच्या आण्विक क्षमतेवर युद्ध हा पर्याय होऊच शकत नाही. चर्चा आणि वाटाघाटी हाच एकमेव मार्ग असल्याचे ग्रोसी यांनी म्हटले आहे.

तेहरानला आण्विक तंत्रज्ञान आणि उपकरणांची मदत कुणी केली हे उघड आहे. चीन, पाकिस्तान आणि रशिया आजही ठामपणे इराणच्या पाठीमागे उभे आहेत. या देशांना इराणशी काही देणेघेणे नसले तरी अमेरिकेची जगात होत असलेली फजिती त्यांच्यासाठी महत्त्वाची आहे. स्वतःला जगाचा पोलिस समजणारा अमेरिका किती पाण्यात आहे हे जगाला दिसून आले आहे. अण्वस्त्रे धारण करण्याची इच्छा बाळगण्यामागे केवळ पाश्चिमात्य देशांची भीती एवढे कारण नाही. खरे कारण आहे ते सुन्नीपंथीय देशांचे. शियाबहुल इराणला सातत्याने सुन्नी बहुसंख्यक असलेल्या अरब देशांची भीती वाटत आली आहे. तेहरानच्या मनातून अजूनही करबला गेलेले नाही. आजच्या काळात करबला घडण्याची सुतराम शक्यता नसली तरी या भीतीमागे धार्मिक विचारधारेचा आधार आहे. ज्याप्रमाणे पाकिस्तान आणि भारतातील काही गद्दार कट्टरपंथीय एक ना एक दिवस 'गजवा-ए-हिंद' होईलच या आशेवर जीवन कंठत आहेत, तशीच विचारधारा  करबला संदर्भात आहे. पण, अमेरिका आणि पाश्चिमात्य देशांना यामध्ये पडण्याचे कारण काय, तर मध्यपूर्वेत असलेले लष्करी तळ होय. या लष्करी तळांमुळेच आज मध्यपूर्वेतील देशांना इराणच्या हल्ल्यांचा सामना करावा लागत आहे. कतार, सौदी अरब, संयुक्त अरब अमिरात, बहरीन, कुवेत या देशांना इराणमुळे मोठे नुकसान सहन करावे लागत आहे. तेल आणि गॅसच्या बळावर एवढी वर्षे समृद्धीत लोळणाऱ्या या देशांना इराणच्या रूपाने मोठे संकट सीमेवर उभे असल्याची जाणीव झाली आहे. युद्धाचा निकाल काय लागेल, हे कुणीही ठामपणे सांगू शकणार नाही. हवाई हल्ल्यांनी जमिनीवरील नुकसान होत असले तरी कुणी शरणागती पत्करल्याशिवाय अथवा भूभागावर ताबा मिळविल्याशिवाय युद्धाचा निर्णय लागत नसतो. अमेरिका अथवा इस्रायल इराणमध्ये थेट सैन्य घुसविण्याचा धोका पत्करणार नाहीत एवढे निश्चित दिसते. जमिनीवरील युद्धात इराणी सैन्याला पराभूत करणे कितपत शक्य आहे हा प्रश्नच आहे. त्यामुळे हवाई हल्ले करून इराणला उद्ध्वस्त करणे हाच एकमेव उपाय उरला आहे. हा संघर्ष आता आण्विक तळांवर हल्ले करण्यापर्यंत येऊन पोहोचला आहे. शनिवारी इस्रायलने इराणच्या नतांझ या आण्विक तळाला लक्ष्य केले. याला प्रत्युत्तर म्हणून इराणनेही इस्रायलच्या डिमोना आणि अराद या शहरांवर आंतरखंडीय क्षेपणास्त्र डागले. डिमोना येथे आण्विक प्रकल्प आहे. 'आयर्न डोम' ही यंत्रणाही या क्षेपणास्त्रांना निकामी करू शकली नाही. अराद येथील हल्ल्यात शंभरपेक्षा जास्त नागरिक जखमी झालेत. क्षेपणास्त्रांमुळे नुकसान झाल्याची कबुली बेंजामिन नेत्यान्याहू यांनी दिली आहे. यावरून हे युद्ध आता घातक वळण घेत असल्याचे दिसते आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी होर्मूझ खाडी ४८ तासांत रिकामी करण्याचा इशारा इराणला दिला आहे. तसे न केल्यास वीज प्रकल्पांवर हल्ले करण्याची धमकी दिली आहे. त्यामुळे आगामी आठवडा जगाची कसोटी घेणारा ठरणार आहे. काहीही झाले तरी शत्रूंची जहाजे होर्मूझमधून जाणार नाहीत, असा ठाम पवित्रा इराणने घेतला. एवढेच नव्हे तर होर्मूझच्या आसपास अमेरिकेचे एफ-१५ हे लढाऊ विमान पाडल्याचा दावा करीत इराणने ट्रम्प यांना डिवचले आहे. नतांझ आण्विक प्रकल्पावर हल्ला करूनही इराण मागे हटलेला नाही. जग  आण्विक युद्धाच्या दिशेने तर जात नाही ना, अशी भीती निर्माण झाली आहे. अमेरिकेचे अणुप्रकल्प माऱ्याच्या टप्प्यात नसले तरी इस्रायल-इराण एकमेकांच्या अणुप्रकल्पांवर हल्ले करीत आहेत. जागतिक शांततेसाठी हे धोकादायक असून संयुक्त राष्ट्र संघाने हस्तक्षेप करण्याची गरज निर्माण झाली आहे. अन्यथा दोन महायुद्धांचा अनुभव घेतलेल्या जगाला आणखी महासंहारक स्थितीला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे.

---

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# घायाळ खामेनी अधिक घातक

सत्ता आणि संताप! सत्तेची धुंदी आणि संतापाचा उद्रेक- या दोन मानसिक अवस्थांचे रसायन फार घातक असते. भारताने हे अनुभवले आहे. १९४७ च्या विभाजनानंतर भारतात झालेली सर्वाधिक भयावह दंगल होती- दिल्लीची. १९८४ मध्ये इंदिरा गांधींची हत्या झाली, राजीव गांधी पंतप्रधान झाले. नव्याने मिळालेली सत्ता आणि आपल्या आईच्या हत्येचा स्वाभाविक संताप या रसायनातून दिल्लीत तीन दिवस दंगल सुरू होती. दिल्लीचा सारा आसमंत मानवी मांसाच्या जळक्या वासाने कुंद झाला होता. चार हजारांवर लोक तीन दिवसांत ठार झाले होते. इराणचे नवे सर्वोच्च नेते मोताबा खामेनी यांचे आई-वडील, पत्नी, एक मुलगा असे चार जवळचे नागरिक पहिल्या दिवशीच्या हल्ल्यात ठार झाले. आता हेच खामेनी इराणचे नेते झाले आहेत. त्यांना अगोदरच कट्टरपंथी मानले जाते. आपल्या कुटुंबातील चार सदस्य गमावल्यानंतर त्यांच्याजवळ आणखी गमावण्यासारखे काही नाही. आपल्याला केव्हाही ठार केले जाऊ शकते याची पूर्ण कल्पना त्यांना आहे. सत्ता, संताप आणि कोणत्याही दिवशी येऊ शकणारा संभाव्य मृत्यू याचे प्रतिबिंब त्यांच्या बेदरकार निर्णयात दिसत आहे. आणि याने सारे मध्यपूर्व आगीच्या ज्वाळांमध्ये धुमसू लागले आहे.

**दोघेही बेदरकार :** इराणचे सर्वेसर्वा मोताबा खामेनी बेदरकारपणे वागत असताना, जगातील सर्वांत शक्तिशाली देशाचे नेतेही बेदरकार वागत आहेत. इराणचे युद्ध सुरू झाले ते त्याच्या आण्विक प्रकल्पावरून आणि आता ते स्थिरावले आहे- इराणच्या हार्मूझ खाडीवर. इराणने ही खाडी बंद केली आहे. ती पुन्हा जहाजांसाठी सुरू करण्यासाठी अमेरिका प्रयत्न करीत आहे. राष्ट्रपती ट्रम्प यांच्यासाठी तो जणू प्रतिष्ठेचा मुद्दा झाला आहे. इराण ही खाडी बंद करील असे आम्हाला वाटले नव्हते असे अमेरिकन प्रशासनाने सांगितले आहे. अमेरिकन अधिकाऱ्यांचे हे विधान बालिशच म्हणावे लागेल. इराणवर हल्ला झाल्यास तो जगाची आर्थिक नाकेबंदी करण्यासाठी ही खाडी बंद करील हे अमेरिकेने गृहीत धरावयास हवे होते. त्याचा विचारही अमेरिका व राष्ट्रपती ट्रम्प यांनी केला नव्हता. इराणच्या निर्णयानंतर आता ते जागे झाले आहेत.

**योजनाच नाही :** अमेरिका-इराण युद्धाबाबत माजी राष्ट्रपती बिल क्लिंटन नियमित भाष्य करीत आहेत. हार्मूझ खाडी प्रकरणावर त्यांनी म्हटले आहे, ''मी राष्ट्रपती असताना, इराणच्या विरोधात काही निर्णय घेण्याचा विचार मी निश्चित केला होता. मात्र, ते निर्णय घेण्यापूर्वी, माझ्या निर्णयावर इराणची प्रतिक्रिया काय असेल याचा अंदाज घेण्यास मी सीआयएला सांगितले होते आणि प्रत्येक वेळी सीआयएने मला, इराण हार्मूझची खाडी बंद करण्याचा निर्णय घेईल असे सांगितले होते.'' इराणचे युद्ध सुरू करण्यापूर्वी अमेरिकन प्रशासनाने याचा अंदाज घेतला नव्हता काय, असा भेदक प्रश्न क्लिंटन यांनी विचारला आहे. विशेष म्हणजे क्लिंटन यांनी एकदाही राष्ट्रपती ट्रम्प यांचे नाव घेतलेले नाही. अमेरिकेने हे युद्ध सुरू तर केले, पण कोणतीही व्यूहरचना न करता. आपल्या मित्रराष्ट्रांना विश्वासात न घेता आणि घटनात्मकदृष्ट्या आवश्यक असणाऱ्या अमेरिकन काँग्रेसची मंजुरी न घेता.

**जनसमर्थन :** अमेरिकेने इराणवर हल्ला केल्यानंतर तेथील जनता आपल्या सरकारच्या विरोधात रस्त्यावर येईल आणि आपण या देशात सत्ताबदल घडवून आणू असा अमेरिकेचा अंदाज होता. तसे काहीही झालेले नाही. इराणची जनता रस्त्यावर उतरत आहे. पण, आपल्या सरकारच्या विरोधात नाही तर अमेरिकेच्या विरोधात. अमेरिकेला नाही तर आपल्या सरकारला पाठिंबा देण्यासाठी.

**अधिक हिंसाचाराकडे? :** राष्ट्रपती ट्रम्प आता याला आवर घालण्याची तयारी करीत आहेत काय? त्यांच्या एका निर्णयावरून तो निष्कर्ष काढला जात आहे. यूएसएस ट्रिपोली ही अमेरिकेची युद्धनौका जपानच्या बंदरावर तैनात होती. तिला इराणकडे जाण्यास सांगण्यात आले आहे. या नौकेवर २५०० अमेरिकन सैन्य असून, समुद्र किनाऱ्यावर उतरण्याची व्यवस्था या जहाजावर आहे. म्हणजे आजवर केवळ हवाई हल्ले करणारी अमेरिका, आता इराणमध्ये आपले सैन्य उतरवून तेथे सत्ता काबीज करण्याचा प्रयत्न करणार काय, असा प्रश्न विचारला जाऊ लागला आहे. तसा प्रयत्न झाल्यास त्याला स्थानिक इराणी नागरिक जोरदार प्रतिकार करतील असे मानले जाते. कारण, एका घटनेने इराणी जनमत अमेरिकेच्या विरोधात गेले आहे.

**निर्णायक वळण :** इराण विरोधातील हे युद्ध अमेरिकेच्या विरोधात जाणारे निर्णायक वळण होते एका शाळेवर झालेला हल्ला व त्यात १७० विद्यार्थिनींचे ठार होणे. प्रथम तर अमेरिकेने या हल्ल्यासाठी इराणला जबाबदार ठरविले होते. पण, ज्या तोमाहॉक प्रक्षेपणास्त्राने हा हल्ला करण्यात आला, ते तोमाहॉक प्रक्षेपणास्त्र अमेरिकेत तयार होते. त्यामुळे इराणच्या या आरोपाचा अमेरिकेला फार प्रतिवाद करता आला नाही. आता समोर आलेल्या नव्या माहितीनुसार, ज्या शाळेवर हा हल्ला करण्यात आला, ती शाळा पूर्वी इराणी लष्कराचे एक केंद्र होती. तशी नोंद अमेरिकेजवळ होती. नंतर इराणने हे केंद्र बंद करून, लष्कराची ही इमारत शाळा सुरू करण्यासाठी दिली. मात्र हा नवा बदल अमेरिकन लष्कराजवळ नव्हता. त्यांनी त्या इमारतीला लष्करी केंद्र समजून त्यावर हल्ला चढविला आणि त्यात १७० विद्यार्थिनी ठार झाल्या. हा या युद्धातील एक निर्णायक टप्पा ठरला व इराणी जनमत अमेरिकेच्या विरोधात गेले.

**नवा भडका :** इराणने हार्मूझची खाडी बंद केल्यापासून  जगात कच्च्या तेलाच्या किमती अपेक्षितपणे वाढल्या आहेत. आता ही खाडी खुली करण्यासाठी चीन, फ्रान्स, ब्रिटन यांनी आपापल्या युद्धनौका पाठवाव्यात असे ट्रम्प यांनी म्हटले आहे. इराणने ही खाडी बंद करण्याचा निर्णय घेतला, तोच मुळी चीनच्या सांगण्यावरून आणि ट्रम्प चीनने ही खाडी मोकळी करण्यासाठी आपल्या युद्धनौका पाठवाव्यात असे म्हणत आहेत. ही खाडी बंद झाल्याने चीनचे काहीही बिघडणारे नाही. त्याला तर जगात हाहाकार हवा आहे. जगात आर्थिक हाहाकार झाल्यास, आपल्या अर्थव्यवस्थेला उठाव मिळेल असे त्याचे आकलन आहे. इराण आता अमेरिकन बँकांना लक्ष्य करीत आहे, जे चीनला हवे आहे.

अमेरिकेने लष्करी ताकदीच्या बळावर ही खाडी खुली करण्याचा प्रयत्न केल्यास, इराण अधिक संतप्त होत, आखाती देशांत अमेरिकेच्या प्रतिष्ठानांवर तसेच अमेरिकेच्या मित्रराष्ट्रांच्या महत्त्वाच्या प्रतिष्ठानांवर हल्ले चढवीत आहे. याने हा संघर्ष अधिक भीषण होईल, अशी शक्यता आताच वर्तविली जात आहे.

**जागतिक परिणाम :** रशिया-युक्रेन यांच्यात सुरू असलेल्या युद्धाचा जागतिक बाजारपेठेवर परिणाम झाला, पण तो मर्यादित होता. या युद्धाची किंमत प्रामुख्याने रशिया व युक्रेन यांना मोजावी लागत आहे. पण, मध्यपूर्वेत सुरू असलेल्या या युद्धाचे मात्र तसे होणार नाही. युद्ध सुरू होण्यापूर्वी आंतरराष्ट्रीय बाजारात कच्चे तेल ७३ डॉलर प्रति बॅरल या दराने मिळत होते. आता ते ११० डॉलरपर्यंत पोहोचले आहे. याचा अर्थ युद्धाचा परिणाम साऱ्या जगावर होणार आहे. या स्थितीचा फायदा उठवीत रशियानेही आपल्या तेलाची किंमत वाढविली असल्याचे समजते. आता त्याने भारताला स्वस्त दरात तेल देण्यास नकार दिला आहे. भारताने अमेरिकेच्या आग्रहाखातर आपल्याकडून तेल घेणे बंद केले होते ही बाब रशियाला पटलेली नाही. खाडी युद्धात जुनी जागतिक समीकरणे कोलमडून पडणार आणि नवी समीकरणे आकार घेणार. युद्धानंतरचे नवे जग कसे असेल? नवी समीकरणे कशी असतील? जगाच्या बदलणाऱ्या चेहऱ्यामोहऱ्याची कल्पना सध्या मात्र कुणालाही करता येणार नाही.

---

## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# समाजद्रोही साम्यवादाचे हजारो बळी

सहा दशकांपासून नक्षल्यांच्या हिंसक कारवायांमुळे भयभीत आदिवासी जीवन आता मोकळा श्वास घेऊ लागले आहे. ३१ मार्च २०२६ पर्यंत देशातून सशस्त्र नक्षलवाद पूर्णतः नष्ट करण्याचा संकल्प केंद्र सरकारचा आहे. आता यासाठी मोजकेच दिवस उरल्याने नक्षलवाद खरोखरच पूर्णतः समाप्त होईल का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. बहुतांश नक्षल्यांनी आत्मसमर्पण केले असून उर्वरित नक्षल्यांना निष्क्रिय करण्यात आले आहे. तरीही मिसिर बेसरा, पापाराव आणि असिम मंडलसारख्या नक्षलवाद्यांचे आव्हान कायम आहे. शासकीय माहितीनुसार, देशात फक्त १९६ नक्षलवादी उरले असून यातील केवळ २५ ते ३० टक्केच नक्षल्यांकडे शस्त्रे आहेत. उर्वरित नक्षली शस्त्रधारी नक्षल्यांच्या दबावाखाली जंगलात जीव वाचविण्यासाठी भटकत आहेत. पापाराव नावाचा उग्र नक्षली १०० साथीदारांसह छत्तीसगडमध्ये तर मिसिर बेसरा हा झारखंडमध्ये ७० नक्षल्यांसह सक्रिय आहे. तेलंगणामध्ये २० आणि महाराष्ट्राच्या जंगलात अवघे ६ नक्षलवादी उरले आहेत. यातील फक्त एक भामरागडचा असून उर्वरित पाच छत्तीसगडचे आहेत. ११ नक्षल्यांनी नुकतेच गडचिरोली पोलिसांपुढे आत्मसमर्पण केले.

नक्षली नेते आपल्या नावापुढे कॉम्रेड हा शब्द लावतात. डाव्या विचारसरणीच्या दृष्टीने कॉम्रेड म्हणजे साम्यवादी होय. हजारो आदिवासींच्या हत्या करून या लोकांना नेमका कोणता साम्यवाद अपेक्षित होता, हे एकदा नक्षल्यांच्या समर्थकांनी समजावून सांगितले पाहिले. या चळवळीने हजारो निष्पाप नागरिकांच्या हत्या घडवून आणल्या. कित्येकांचे गळे कापले तर कित्येकांना गोळ्या घातल्या. नक्षल्यांच्या हल्ल्यात हजारो जवानांनी प्राणाची आहुती दिली. नक्षल्यांचा तथाकथित महासचिव देवजी तसेच रूपेश, रामधेर, भूपती, बारसे देवा, प्रवक्ता अनंत आणि मोहन कडतीसारख्या नक्षलवादी नेत्यांनी आपल्या हजारो साथीदारांसह शस्त्रे खाली टाकली. परंतु, देवजी आणि बारसे देवासारखे कट्टर माओवादी शरणागती पत्करली नसल्याचेच सांगत आहेत. भविष्यात निवडणुका लढविण्याचा संकल्पही देवजीने एका मुलाखतीत बोलून दाखविला.



एकूणच सशस्त्र माओवादी चळवळ नष्ट झाली तरी तिला नवे स्वरूप देण्याचा माओवाद्यांचा मानस लपून राहिलेला नाही. समाजात साम्यवाद रुजविण्यासाठी प्रेम, समर्पण आणि त्यागाची गरज असते. परंतु, माओवाद्यांनी शस्त्रांच्या धाकावर गोरगरिबांचे गळे कापले. ही चळवळ कुठल्या कारणांसाठी सुरू झाली, याची कारणमीमांसा शोधण्यापेक्षा या चळवळीमुळे देश आणि जनतेची किती हानी झाली, याचा विचार प्राधान्याने होणे गरजेचे आहे. २०१८ पर्यंत गणपती माओवाद्यांचा महासचिव होता. नंतर वय आणि प्रकृतीच्या कारणांमुळे गणपतीने रक्तपात घडविण्यासाठी या संघटनेची सूत्रे नंबाला केशवराव ऊर्फ बसवा राजू याच्या हाती सोपविली. कट्टर डाव्या विचारसरणीच्या बसवा राजूने चंद्राबाबू नायडूंसारख्या नेत्यावर प्राणघातक हल्ला केला होता. हे कटकारस्थान गणपतीच्याच संमतीने रचले गेले होते. सध्या गणपतीला नेपाळमध्ये अटक झाल्याच्या वावड्या उठत असल्या तरी अद्याप ही बाब स्पष्ट झालेली नाही. बसवा राजू याने अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केले होते. तो डाव्या विचारसरणीचा कट्टर समर्थक होता. एका प्रकरणात अटक भोगल्यानंतर तो भूमिगत झाला आणि त्याने घनदाट जंगलाचा मार्ग पत्करला. बसवा राजूने हिडमासारखे कितीतरी जहाल माओवादी निर्माण केले. अखेर बसवा राजूला सैनिकांनी कंठस्नान घातले.

माओवाद्यांनी कंत्राटदारांसह अन्य नागरिकांकडून खंडणीच्या रूपात मोठ्या प्रमाणात पैसा उभा केला. नोटबंदीच्या काळात भूपतीच्या चमूला २० कोटी रुपये फेकून द्यावे लागले होते. यावरून नक्षल्यांकडे किती पैसा होता, याचा क्यास लावता येतो. तरीही जंगलात सक्रिय असणाऱ्या सामान्य नक्षलवाद्यांना आठवडी बाजारात मिळणाऱ्या ५० ते ६० रुपयांच्या चपला घालून जंगलात भटकावे लागत होते. रामधेरसारख्या केंद्रीय समिती सदस्याच्या पायात १०० ते १५० रुपयांचा बूट एका मुलाखतीत दिसून आला. करोडोंची वसुली करूनही हा पैसा नेमका कुठे जात होता? हा पैसा अर्बन नक्षल्यांकडे तर वळता होत नव्हता ना? अर्बन नक्षल्यांची मुले देश-विदेशात उच्च शिक्षण घेत असताना या लोकांनी केवळ आपल्या विचारसरणीसाठी गोरगरीब आदिवासी मुला-मुलींच्या हाती शस्त्रे सोपवून देशाच्या विरोधात युद्ध पुकारले होते. आदिवासी समाज नक्षल्यांच्या या रक्तपाताला कंटाळल्याने अखेर दुर्गम भागातील जनताच या चळवळीविरोधात उभी राहिली. परिणामी, सरकारला नक्षल्यांचा बीमोड करणे शक्य होऊ शकले. लवकरच नक्षलवाद नष्ट होऊन दुर्गम भागही विकासाच्या प्रवाहात यावा, अशीच अपेक्षा देशवासीयांची आहे.

९८८१७१६०२७

---

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# रामायणाचा सद्य:स्थितीत संदेश

आज शेकडो वर्षांनंतर सुद्धा रामायणाची समाजमनावरची मोहिनी कायम आहे. जगातल्या जवळपास सर्वच भाषांमध्ये रामायणाचे भाषांतर झालेले आहे. रामलीलांच्या माध्यमातून सुद्धा रामकथेतील पात्रांना जिवंत करण्याचा प्रयत्न अनेक ठिकाणी केला जात असतो.

विश्वामित्रांच्या यज्ञाचा विध्वंस करणाऱ्या त्राटिका व सुबाहू या राक्षसांचा रामाने वध केलेला आहे. म्हणजे रामाचे सामर्थ्य त्यांनी योग्य वयातच प्रकट केलेले होते. आपणही आपल्या मुलांना केवळ सोयीसुविधा न पुरविता त्यांना त्यांच्या वयाला साजेशी आव्हानात्मक कामे देऊन त्यांना कर्तृत्ववान बनविण्यासाठी प्रयास केले पाहिजे. विविध प्रशिक्षण शिबिरांना त्यांना पाठवून त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक कसदार बनविले पाहिजे. आजकालच्या तरुण पिढीला आपण 'जेन जी' असे म्हणतो. जगाच्या पाठीवर विविध देशांमध्ये या जेन जी ने विविध आंदोलने निर्माण केलेली आहेत. त्यासाठी ते सरकारी व सार्वजनिक संपत्तीचा विध्वंस करणारे आंदोलने सुद्धा करतात. परंतु तरुण वयामध्ये आपला पराक्रम दाखविणारे राम या 'जेन जी'करिता सुद्धा आदर्श आहेत. मोबाईलमध्ये हरवून बसलेल्या आपल्या तरुण पिढीने रामाकडे बघितले पाहिजे की त्यांच्याच वयामध्ये रामामध्ये किती समजदारी होती. कैकेयीच्या हट्टामुळे दशरथ रामाला १४ वर्ष वनवास मान्य करतो. राम त्यावेळेस दशरथाला कैदेत टाकून अयोध्येचे राज्य घेऊ शकला असता. परंतु रामाने पितृआज्ञेला प्राधान्य दिले व तो वनामध्ये जाण्यासाठी सिद्ध झाला. वनामध्ये जाताना राम सीतेला म्हणतो की, वनामध्ये जंगली प्राणी आहेत. नरभक्षक राक्षस आहेत. तुला तेथे भीती वाटेल. त्यामुळे तू वनामध्ये येऊ नको. मी व लक्ष्मण आम्ही दोघेच वनवासात जातो. त्यावेळेस सीता फार सुंदर उत्तर देते. सीता म्हणते, ज्याने शिवधनुष्य तोडले होते अशा पराक्रमी माणसाला माझ्या वडिलांनी आपली कन्या दिलेली आहे. तो पराक्रमी अयोध्येचा युवराज आपल्या पत्नीचे नरभक्षक राक्षसांपासून व प्राण्यांपासून रक्षण करू शकत नाही का? सीतेच्या या प्रश्नावर राम निरुत्तर होतात व सीतेला सुद्धा वनामध्ये चलण्याची अनुमती देतात. सीता म्हणते जेथे राघव तेथे सीता. वनामध्ये कंदमुळे फळे खाऊन आपल्याला राहावे लागले तरी चालेल, संकटांचा सामना करावा लागला तरी चालेल, परंतु माझा पती जिथे आहे तिथेच मी राहील. अशा पद्धतीचा निश्चय सीता बोलून दाखवते. यावरून आजच्या तरुणींनी सुद्धा खूप मोठा संदेश ग्रहण करण्याची आवश्यकता आहे. आजकाल सगळीकडे खाजगी नोकऱ्या तरुणांना कराव्या लागतात. कमी पगार ज्यांना आहे त्यांना मुली मिळत नाही व मिळाल्या तरी सुद्धा कमी पगारात त्यांचे भागत नाही. अनेक वेळा असे विवाह टिकत सुद्धा नाही. अशा वेळेस तरुणींना सीतेचे वचन जेथे राघव तेथे सीता हे खूपच मार्गदर्शक आहे. राम जेव्हा वनवासात जायला निघाले त्यावेळेला अयोध्येतील सर्व नागरिक त्यांच्या रथाच्या मागोमाग चालू लागले. रामाने त्यांना पुष्कळ समजावले की तुम्ही अयोध्याला परत जा. परंतु लोक रामाला म्हणाले की, तुम्ही जर वनवासात राहणार असाल तर आम्ही पण वनवासात राहू. तुम्ही जेथे राहाल तेथे अयोध्या निर्माण होईल. म्हणजे योग्य नेतृत्व आणि राज्यकर्ते जर असेल तर प्रजा त्यांना कशा पद्धतीने समर्थन करू शकते याचे हे उदाहरण आहे. आजच्या राजकारणी लोकांकरिता हे एक मार्गदर्शक उदाहरण आहे.

राम हा अयोध्येचा भावी राजा होता. पण एका क्षणात त्याला राज्य न मिळता वनवास मिळाला. राम, लक्ष्मण व  सीता हे वनवासात राहिले. त्यांनी कंदमुळे फळे खाल्ली. तिथल्या सर्व अडीअडचणींचा व संकटांचा स्वीकार केला. यावरून आपण लक्षात घेतले पाहिजे की आज जी परिस्थिती आहे ती उद्या राहीलच असे नाही. आपल्या दैवाला दोष न देता माणसाने आलेल्या परिस्थितीचा स्वीकार करून त्यातून मार्ग काढला पाहिजे व आपले जीवन आनंदाने जगले पाहिजे. हे रामाच्या वनवासावरून आपल्या लक्षात येते. भरत ज्यावेळेस रामचंद्रांना वनवासातून पुन्हा परत नेण्यासाठी येतो त्यावेळेस राम वडिलांच्या आज्ञेसाठी मी अयोध्येस परत येऊ शकत नाही असे सांगतात. त्यावेळेस भरत म्हणतो की, चौदा वर्ष पूर्ण झाल्यावर पंधराव्या वर्षीचा पहिला  सूर्यास्त होण्यापूर्वी जर रामा, तू अयोध्येत परत आला नाहीस तर मी अग्निकाष्ठ खाऊन आत्महत्या करील. राम आणि भरताचे प्रेम हे आजच्या काळातील भावा-भावांसाठी सुद्धा खूप आदर्श आहे. कारण एका फुटाच्या जागेकरिता किंवा शेतीच्या एखाद्या तुकड्याकरिता आज आपण भावा-भावांमध्ये अबोलपणा किंवा मारामाऱ्या बघतो. आजच्या युगातील भावांकरिता राम आणि भरताचे प्रेम हे आदर्श ठरू शकते.

राम-रावण युद्धामध्ये रावण हा पहिल्या दिवसापासूनच त्याच्या अस्त्रशस्त्रांनी युक्त अशा रथावर चढून युद्ध करीत होता तर राम हे जमिनीवर उभे राहून युद्ध करीत होते. रावणाकडे अत्यंत शक्तिशाली व मायावी राक्षस सैन्य होते तर रामाकडे केवळ दगड आणि झाडांचा शस्त्र म्हणून उपयोग करणारे वानर होते. तरीही रामांनी परिस्थितीचा बाऊ न करता आपले सर्वोच्च प्रयत्न व उत्तम अस्त्रशस्त्रांचा वापर करून रावणाला पराभूत केले. त्याचप्रमाणे आपण सुद्धा परिस्थितीचा बाऊ न करता उत्तम प्रयत्नांनी यश मिळविले पाहिजे हा संदेश आपण रामापासून घेतला पाहिजे.

राम-रावण युद्ध ८५ दिवस चालले. शेवटी ८६ व्या दिवशी जेव्हा आता रावण मरणार हे जवळपास निश्चित झाले होते, त्याचे सर्व पराक्रमी वीर व बंधू मारले गेले होते, त्यावेळेस शेवटच्या दिवशी इंद्राने आपला दिव्य रथ रामाला दिला. यावरून आपल्या असे लक्षात येते की देव सुद्धा तुमचे सर्वोच्च प्रयत्न बघूनच तुम्हाला मदत करतो. रावणाला मारण्याकरिता प्रभू रामचंद्रांनी त्याच्या एकेक शिरांना बाण मारून त्याला मारण्याचा प्रयत्न केला. परंतु नंतर बिभीषणाने त्यांना सांगितले की, रावणाचे प्राण हे त्याच्या नाभीमध्ये आहेत. त्यामुळे प्रभू रामचंद्रांनी त्यानंतर रावणाच्या बरोबर नाभीवर बाण मारून त्याचे प्राण हरण केले. यावरून आपण संदेश घेतला पाहिजे की एखाद्या समस्येचे मूळ कारण काय आहे समजून घेतले पाहिजे व त्याच्यावरच प्रहार केला पाहिजे व त्यानुसार आपण आपली समस्या सोडविली पाहिजे. रावणाच्या वधानंतर विभीषण रामाला लंकेमध्येच राहण्याचा आग्रह करतात. त्यावेळेस राम विभीषणाला लंकेचे राज्य देतात व त्याला म्हणतात, ही लंका सोन्याची जरी असली तरीही मला हिच्यापेक्षा माझी माता व माझी जन्मभूमी अयोध्या हीच अधिक प्रिय आहे. आज भारतातील अनेक तरुण विदेशामध्ये शिक्षण घ्यायला जातात व तिकडेच रमून जातात. तिकडलेच होऊन जातात. अशा तरुणांनी रामाचा हा संदेश लक्षात घेतला पाहिजे की अमेरिका कितीही वैभवसंपन्न असली तरीही सुद्धा जन्मभूमी भारत व आपली माता हेच श्रेष्ठ आहे आणि यांच्यासाठी कार्य केले पाहिजे.

रामायणातील प्रत्येक प्रसंग हे आपल्याला संदेश देणारे आहेत. जीवनामध्ये पथप्रदर्शक आहेत. म्हणून हजारो वर्षांनंतर सुद्धा रामायण आजही वाचले जाते. केवळ पुण्यप्राप्तीकरिता रामायण वाचू नये तर जीवनामध्ये त्याचे अनुसरण करण्यासाठी रामायणाचा उपयोग व्हावा असा प्रयास करणे गरजेचे आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

---

## वाचक पत्रे

### श्रीरामनवमीचे विशेष महत्त्व

रामनवमी या सणाला हिंदू धर्मात अनन्यसाधारण महत्त्व आहे. या दिवशी जे भक्त मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम यांची पूर्ण भक्तिभावाने व नियमाने पूजा करतात त्यांच्या जीवनात सुख, समृद्धी आणि शांती येते. हिंदू धर्मात, दोन गुप्त नवरात्रींव्यतिरिक्त, चैत्र आणि शारदीय नवरात्र मोठ्या थाटामाटात साजरे केले जातात. या दोन्ही नवरात्रीत माँ दुर्गेची पूजा करण्याचा विधी आहे. पण चैत्र आणि शारदीय नवरात्रीच्या नवमी आणि दशमी या दोन्ही तिथीही भगवान रामाशी संबंधित आहेत. शारदीय नवरात्रीच्या दहाव्या दिवशी भगवान रामाने रावणाचा वध केला आणि भगवान रामाचा जन्म चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या नवमी तिथीला झाला. त्या दिवशी रामनवमी साजरी केली जाते.

पंचांगानुसार भगवान रामाचा जन्म चैत्र नवरात्रीत नवमी तिथीला झाला होता. हिंदू धर्मात असे मानले जाते की चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या नवव्या दिवशी भगवान विष्णूने श्री रामाच्या रूपात पृथ्वीवर सातवा अवतार घेतला. तेव्हापासून हा सण मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. रामनवमीच्या दिवशी मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीराम यांचा जन्मदिवस देशभरात उत्साहात साजरा केला जातो. अयोध्येत रामनवमीनिमित्त भव्य कार्यक्रम आणि जत्रेचे आयोजन केले जाते. रामनवमीच्या दिवशी श्रीरामाची पूजा विधिपूर्वक करणाऱ्या भक्तांना अपेक्षित फळ मिळते, अशी श्रद्धा आहे. यासोबतच त्यांच्या जीवनातील सर्व दुःखे नाहीशी होतात. म्हणून अनेक जण या दिवशी आपल्या महत्त्वाच्या कार्याला सुरुवात करतात.



**शंकर कुळकर्णी**/९७६४४६५५७०

### पश्चिम बंगालमध्ये सत्ता परिवर्तन?

पश्चिम बंगालमध्ये मागील दहा वर्षांपासून ममता बॅनर्जी सरकारची अराजकता चालू आहे. ज्या बंगालमध्ये रामकृष्ण परमहंस, रवींद्रनाथ टागोर, स्वामी विवेकानंदांनी हिंदू धर्माला एकत्र करण्याची सुरुवात केली नव्हे हिंदू कट्टरतेचे बीजामृत रोवले त्याच बंगालमध्ये हिंदूंना निर्वासितासारखी राहण्याची वेळ आलेली आहे. नवरात्रात दुर्गा पूजेच्या मिरवणुकीत बंधने आणली जात आहेत तर मुस्लिम समाजाला त्यांचे सण कोणतेही बंधने न ठेवता खुलेआम साजरे करण्याची मुभा देण्यात आलेली आहे. यावरून १९९० च्या दशकातील जम्मू-काश्मीरची आठवण येते. पश्चिम बंगाल भारतापासून वेगळे करण्याचे षडयंत्र तर चालू नाही अशी शंका मनात उत्पन्न होते. परंतु केंद्रातील राष्ट्रवादी विचारांचे सरकार तसे होऊ देणार नाही याची खात्री वाटते. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी संवैधानिक कोणत्याही यंत्रणेला जुमानत नाही. निवडणूक आयोग असो किंवा केंद्रातील आरोग्य योजना असो प्रत्येक यंत्रणेवर आक्षेप घेऊन कार्यवाहीपासून रोखण्याचा कसोशीने प्रयत्न करीत आहे. नुकतेच महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या सभेचे स्थान बदलण्यापासून तर त्यांना विमानतळावर दिल्या जाणाऱ्या राजशिष्टाचाराला देखील उपस्थित न राहता आपल्या राष्ट्रविरोधी मानसिकतेचे दर्शन घडवले आहे. काही दिवसांत होऊ घातलेल्या प. बंगाल विधानसभेच्या निवडणुकी अगोदर निवडणूक आयोगाच्या विरोधात न्यायालयात जाऊन त्यांचे अधिकार मर्यादित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु न्यायालयाने न्यायाची बाजू लावून धरून निवडणूक आयोगाचे अधिकार अबाधित ठेवलेले आहेत. मुख्य निवडणूक आयुक्तांनी आपल्या अधिकाराचा वापर करून २०२१ च्या विधानसभा आणि २०२४ च्या निवडणुकी दरम्यान झालेला हिंसाचार, जाळपोळ, बलात्कार, खून व मतदान केंद्र काबीज करणाऱ्यांविरुद्ध तेथील पोलिस प्रशाशनाने व सरकारने कोणती कारवाई केली याचा खुलासा मागितला आहे. तसेच मतदान केंद्र व मतदान यंत्र ज्या ठिकाणी ठेवले जाणार आहे अशा ठिकाणी स्थानिक पोलिस प्रशासनाला न ठेवता त्याची जबाबदारी केंद्रीय सुरक्षा बलाकडे सोपविण्यात आलेली आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या या निर्णयाने माजी निवडणूक आयुक्त टी. एन. शेषन यांची आठवण येते. थोडक्यात, ज्या महासभेत द्रौपदीचा अपमान होतो तेथे महाभारत घडणारच व सत्ता परिवर्तन होणार असे वाटते.

**शशिकांत दंडे**/नागपूर

### दरवाढीचा गॅस ग्राहकांना फटका

अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष हा दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. यांच्यातील युद्धजन्य परिस्थितीचे गडद सावट आता आपल्या देशातील सर्वसामान्यांच्या ताटावर पडू लागले आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत वाढ झाल्याने इंधन कंपन्यांनी घरगुती वापराच्या एलपीजी सिलेंडरच्या दरात ६० रुपयांची भरीव वाढ केली आहे. गेले काही महिने गॅसचे दर स्थिर होते, पण या दरवाढीने एका झटक्यात सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री लावली आहे. मध्यपूर्व आशियातील या युद्धामुळे द्रवरूपच्या गॅस आयातीत अडथळे येत असून पुरवठ्यावर परिणाम होत असल्याच्या पृष्ठभूमीवर शनिवार ७ मार्चपासून घरगुती गॅस सिलेंडरच्या दरात  ६० रुपयांची वाढ करण्यात आली आहे. तर १९ किलोचा व्यावसायिक सिलेंडर आता ११५ रुपयांनी वाढणार आहे. हे नवे दर लागू झाल्याने देशभरातील सामान्य नागरिकांना मोठा फटका बसणार असून हॉटेलिंग, बाहरेचं खाण-पिण हेही महाग होऊ शकतं.

**ॲड. रुपाली हिरवे**/पुणे.९७६६४०५१२५

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...

### भांबुर्डी येथे जबरी चोरी, चार तोळे सोन्यासह चार हजाराची रोकड लंपास

**माळशिरस, दि. २२ मार्च-**

तालुक्यातील भांबुर्डी येथे मध्य रात्री भांबुर्डी नजिक मोटेवस्ती येथे अज्ञात चोरट्यांनी घरात घुसून चार तोळे सोन्यासह सह चार हजार रोख रक्कम चोरून नेल्याची घटना घडली आहे. याबाबत फिर्यादी अशोक सदाशिव शेंडगे यांनी माळशिरस फिर्याद दाखल केली. याबाबत मिळालेली माहिती अशी की भांबुर्डी नजीक मोटे वस्ती येथे अशोक सदाशिव शेंडगे, संतोष सदाशिव शेंडगे यांच्या कुटुंबातील सर्व झोपेत असताना मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी घर फोडून चार तोळे सोन्याचे दागिने, चांदीच्या दोन पैंजणासह चार हजार रोख रक्कम लंपास केले असून रात्री पोलीस पाटील रावसाहेब वाघमोडे यांनी ग्राम सुरक्षा यंत्रणेचा वापर करून साठ, पासष्ठ ग्रामस्थांच्या मदतीने चोरांचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला, परंतु रात्री अंधाराचा फायदा घेऊन चोर पसार झाले. पोलिसांनी तातडीने श्वान पथक मागवले. परंतु श्वानपथक थोड्याच अंतरावर जाऊन गुठमळत राहिले. या घटनेचा तपास पोलिस निरीक्षक विकास दिंडुरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार एस.आर. निकम करीत आहेत.




## निधन वृत्त...

### जयकुमार रणदिवे



**सोलापूर, दि. २२ मार्च-**

जुना पुना नाका येथील नाकोडा सोसायटीतील रहिवाशी जयकुमार शंकरराव रणदिवे ( वय ९५) यांचे शुक्रवार २० मार्च रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, चार मुली, नातू, परतवंडे असा परिवार आहे. ते जीवराज जैन ग्रंथमालेचे संतोषकुमार शहा यांचे ते सासरे होत.

### सुधीर ढवळे



**माळशिरस, दि. २२ मार्च-**

येथील सागर प्रिंटिंग प्रेसचे मालक सुधीर ढवळे (वय ७३ वर्षे) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे.

### महेबूब साब इनामदार



**सोलापूर, दि. २२ मार्च-**

येथील महेबूबसाब महमदसाब इनामदार ( वय ७४) यांचे शुक्रवार रात्री ९.३० वाजता हृदय विकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्च्यात १ मुलगा, सून व दोन नातू असा परीवार आहे.

### अर्जुन कदम



**सोलापूर, दि. २२ मार्च-**

मार्डी (ता. उत्तर सोलापूर) येथील अर्जुन ज्ञानोबा कदम (वय ६५) यांचे रविवार दुपारी निधन झाले. त्यांच्यावर सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, मुलगी, जावई असा परिवार आहे.

**जाहीर नोटीस**

**१)** तमाम लोकांस विशेषतः बार्शी शहर व तालुका परिसरातील लॉकास कळविण्यात येते की,

**अ) मिळकतीचे वर्णन :** जि. सोलापूर सब. जि. व पोट ता. बार्शी पैकी बार्शी शहर म्यु.पल हदीतील सि.स.नं. ४१६२/३ क्षेत्रफळ १९.00 चौ.मी.. सि.स.नं. ४१६२/५ क्षेत्रफळ ९.५ चौ.मी., सि.स.नं. ४१६२/६ क्षेत्रफळ ६.४ चौ.मी., या तिन्ही जागा एकासएक लगत असल्याने याचे एकुण क्षेत्रफळ ३४.९ चौ. मी. असून याचे एकत्रीत मोजमाप पूर्व बाजु फुट १३.८ याचे मी.४-१६. दक्षीण बाजु फुट ३७.३ याचे मी. ११-३६, पश्चिम बाजु फुट १३.११याचे मी. ४-२४. उत्तर बाजु फुट ३६.५ याचे मी. ११-१० आहे, याचे वागणुक व पाणी पश्चिम बाजुस जाते व आहे. यासी एकत्रीत चतुःसिमा :- पुर्वेस - सि.स.नं. ४२२०/अ पै य ४२२०/ब ची मिळकत, दक्षीणेस - सि.स.नं. ४१६१/अ व ४१६१/ब ची मिळकत, पश्चिमेस - रस्ता व उत्तरेस - सि.स.नं. ४१६२/१ ची मिळकत, येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक बांधीव जागा/मिळकत आतील सर्व बांधकाम इ. तदंगभुत वस्तु हक्कासह संपूर्ण जागा.

**ब) मिळकतीचे वर्णन :-** जि. सोलापूर सब. जि. व पोट ता. बार्शी पैकी बार्शी शहर म्यु. पल हदीतील सि.स.नं. ४१६४ क्षेत्रफळ ४९.00 चौ.मी., याचे मोजमाप पूर्व बाजु फुट १८.३. दक्षिण बाजु फुट ३१.८, पश्चिम बाजू - फुट १७. उत्तर बाजू फुट ३१.१० आहे, याचे वागणूक व पाणी पुर्व बाजूने जाते व आहे, यासी चतुःसिमा - पुर्वेस - रस्ता, दक्षिणेस - सि.स.नं. ४१६५ ची मिळकत, पश्चिमेस - सि.स.नं. ४२१५ ची मिळकत व उत्तरेस - सि.स.नं. ४१६३ ची मिळकत, येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक बांधीव जागा/मिळकत आतील सर्व बांधकाम इ. तदंगभुत वस्तु हक्कासह संपूर्ण जागा.

**२)** उपरोक्त क. १अ) मधील नमुद वर्णनाची मिळकती मंगल लक्ष्मण वडतिले व क. २ब) मधील नमुद वर्णनाची मिळकत मंगल लक्ष्मण वडतिले, विनोद लक्ष्मण वडतिले, विशाल लक्ष्मण वडतिले, विक्रम लक्ष्मण वडतिले, अभिजीत लक्ष्मण वडतिले यांनी आमचे अशिलास कायम व खुष, निर्वेध व निजोखमी, बिन बोजाची अशी खरेदी देण्याचे ठरवून व सदर कराराचे अंमलबजावणीचा एक भाग म्हणून खरेदी किंमती पोटी इसारादाखल रक्कम घेउन/स्वीकारुन व सदर मिळकत/जागा निर्वेध व निजोखमी असलेचा भरवसा/विश्वास/खात्री दिलेली आहे. आमचे अशिल ठरलेप्रमाणे खरेदीखत दस्त/व्यवहार पूर्ण करणेस केव्हांहि तयार होते व आहे.

**३)** याउपरहि, वरील क.१ मधील मिळकती संबंधीत कोणाचा पोटगी, कसलीही वहिवाट, लिज, बक्षिस, साठेखत, हिस्सा, वारसा, मालकी, कुळ, भाडेपटटा, गहाण/तारण इ. कसल्याही स्वरपाचा हक्क हित संबंध, बोजा असल्यास अशा व्यक्तिनी संबंधीत कागदपत्रे पुराव्यानिशी खात्री, ही नोटीस प्रसिध्द झालेपासून (७) सात दिवसांत देवयावी, अन्यथा कोणचा कसलाही हक्क हितसंबंध नसल्याचे ग्राहय समजुन आमचे अशिल टरलेप्रमाणे खरेदीखताचा दस्त/व्यवहार पूण करतील. तदनंतर कोणाचीही कसलिही तक्रार / हरकत चालणार नाही. कळावे. सबब, कोणाचीही फसवणुक होऊ नये म्हणन ही जाहीर नोटीस दिली. ता. २२/०३/२०२६.

**सही/-**
**ॲड. आनंद चि. ठोकडे**
**(श्री. कॉम., एलएल.बी., डी.टी.एल., जी.डी.सी. ॲन्ड ए.)**
**रा. १७५०, आझाद चौक, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर.**
**(अशिलातर्फे ॲडव्होकेट)**

# हिंदू तरुणींनी फसवणूकीपासून सावध व्हावे

## राजे शिवराय प्रतिष्ठान संस्थापक महेश पवळे

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. २२ मार्च-**

''प्रेमाचे नाटक करून तरुणींना लग्नाचे आमिष दाखवत लव्ह जिहादमध्ये अडकविले जात असल्याने त्यापासून सावध होण्याचे आवाहन ''राजे शिवराय प्रतिष्ठान''चे संस्थापक महेश पवळे यांनी केले.

कर्वेनगर येथील नटराज व गिरिजा शंकर वस्ती मधील नागरिकांसाठी स्वस्तिश्री सोसायटी द्वारा आयोजित सोसायटीच्या मैदानावर विराट हिंदू संमेलन आयोजित केले होते त्यावेळी महेश पवळे प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. ते पुढे म्हणाले की,''हा एक सापळा असतो त्यात युवतींनी अडकता कामा नये त्यासाठी युवतींनी स्वसंरक्षणाचे धडे घेतले पाहिजे.सकल हिंदू समाज सशक्त व साम र्थ्यवान बनविण्यासाठी सर्वांनी प्रयत्नशील रहावे.हिंदू परंपरा,संस्कृती आणि मूल्यांचे संरक्षण,संवर्धन करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे राहून कार्य करावे.''असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.




पुणे : पंच परिवर्तन या विषयावर आधारित भारुड सादर करतांना सोलापूरच्या अपर्णा सहस्त्रबुद्धे व त्यांचा महिला संघ.

यावेळी सुप्रसिद्ध लेखिका व इतिहासकार सायली गोडबोले-जोशी यांनी पंच परिवर्तन संदर्भात मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सुवर्णा बोडस यांनी केले. सोसायटीचे अध्यक्ष अॅड धनंजय खुर्जेकर यांनी प्रमुख पाहुण्याचा सत्कार केला. किरण कुलकर्णी यांनी आभार मानले.पुष्कराज सप्रे ह्यांनी गायिलेल्या वंदेमातरम ने कार्यक्रमाची सांगता झाली. या विराट हिंदू संमेलनास कर्वेनगर मधील गिरिजा शंकर,नटराज सोसायटी मधील नागरिक,महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### सोलापूरच्या महिलांचे भारुड व विद्यार्थ्यांचे पथनाट्य

यावेळी पुणे स्पोर्ट्स अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी मल्लखांब व योगासनाचे बहारदार प्रात्यक्षिके यावेळी करून दाखविली. कुटुंब प्रबोधन या विषयाला अनुसरुन सादर करण्यात आलेल्या सोलापूर येथील अपर्णा सहस्त्रबुद्धे संचलित भारुड आणि विद्यार्थांनी सदर केलेल्या पथनाट्याला उपस्थितांनी दाद दिली.

# शेळगाव (आर) एकता महिला मंच प्रथम

## जलसाक्षरतेचा जागर अभिनव बक्षिस वितरण मोठ्या जल्लोषात

**तभा वृत्तसेवा**
**वैराग, दि. २२ मार्च-**

गुढीपाडव्याचे औचित्य साधून सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील विविध गावांमध्ये जलसाक्षरतेची गुढी उभारून पाणी बचतीचा वज्रनिर्धार करण्यात आला. या अभिनव उपक्रमात शेळगावच्या (आर) एकता महिला मंच प्रथम क्रमांक पटकाविला,

याच बक्षीस वितरण आणि गौरव सोहळा बार्शी येथील श्री गणेश वस्त्रदालन येथे बार्शीच्या नगराध्यक्षा तेजस्विनीताई कथले, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सिंधू देशमुख, श्री गणेश वस्त्र दालन प्रमुख मीनाक्षी यादव, शितल सुरवसे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. एकता महिला मंचचे प्रमुख प्रभाकर क्षीरसागर यांच्या कल्पक संकल्पनेतून आणि सातत्यपूर्ण पुढाकारातून गेल्या तीन वर्षांपासून हा स्तुत्य उपक्रम राबवला जात आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शितल सुरवसे यांनी केले.



### एकता महिला मंचचा उपक्रम कौतुकास्पद

नगराध्यक्षा तेजस्विनीताई कथले म्हणाल्या, ''एकता महिला मंचच्या माध्यमातून पहिल्यांदाच असा आगळावेगळा आणि काळाची गरज असलेला उपक्रम पाहायला मिळाला. जलसाक्षरतेसारखा गंभीर विषय महिलांनी हाताळणे ही अतिशय कौतुकास्पद बाब आहे. स्त्रिया जेव्हा एखाद्या चळवळीत सहभागी होतात, तेव्हा समाजात मोठी जनजागृती होते. भविष्यातही अशा विधायक उपक्रमांना माझे पूर्ण सहकार्य राहील.''

**सकारात्मक बदलाची नांदी**

सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सिंधू देशमुख यांनीही ग्रामीण भागातील महिलांच्या वाढत्या सहभागाचे विशेष कौतुक केले. त्या म्हणाल्या की, ''ग्रामीण महिला सामाजिक प्रश्नांवर अशा उपक्रमांतून एकत्र येत आहेत, ही सकारात्मक बदलाची नांदी असून यामुळे कौटुंबिक आणि सामाजिक स्थैर्य निर्माण होण्यास मदत होईल.''

**प्रथम तीन विजेते :** एकता महिला मंच शेळगाव (आर), एकता महिला मंच मानेगाव, एकता महिला मंच, जामगाव (आ).

# आंतरराष्ट्रीय यंग ऑलिम्पिक ॲम्बेसेडर सत्रासाठी अहिल्यानगरचा राष्ट्रीय खेळाडू संकल्प थोरात याची निवड

**अहिल्यानगर, दि. २२ मार्च -**

अथेन्स (ग्रीस) येथे जूनमध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय यंग ऑलिम्पिक ॲम्बेसेडर सत्रासाठी नगरचा राष्ट्रीय खेळाडू संकल्प निर्मलचंद्र थोरात याची निवड झाली आहे. आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती व इंटरनॅशनल ऑलिम्पिक अकॅडमी ह्यांच्या सहकार्याने दोन आठवड्यांचा हा कार्यक्रम ६ ते १८ जुन पर्यंत होईल. त्यात संकल्प भारतीय ऑलिम्पिक संघटनेचा प्रतिनिधी म्हणून सहभागी होईल. त्याच्या रूपाने नगरला पहिल्यांदाच हा बहुमान मिळाला आहे.



राष्ट्रीय स्तरावरील सायकलपटू व खो-खो स्पर्धेतील पदकविजेता असलेला संकल्प शिवछत्रपती पुरस्कारविजेते निर्मलचंद्र थोरात यांचा मुलगा आहे. संकल्प सध्या टाटा ट्रस्ट्स आणि ज्ञान प्रबोधिनी यांच्या 'ग्रासरूट्स क्रीडाकुल' या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमात कार्यक्रम व्यवस्थापक पदावर काम करतो. ग्रामीण खेळाडूंच्या क्रीडा, आरोग्य आणि जीवनकौशल्यांचा सर्वांगीण विकास करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सुरू आहे.

### शैक्षणिक आणि नेतृत्व विकास कार्यक्रम

यंग ऑलिम्पिक ॲम्बेसेडर कार्यक्रम हा जागतिक स्तरावरील प्रतिष्ठित शैक्षणिक आणि नेतृत्व विकास कार्यक्रम आहे. त्यांच्यामार्फत त्यांच्या देशात ऑलिम्पिक मूल्यांचा प्रसार करणे हा उपक्रमाचा उद्देश आहे. त्यात विविध देशांचे क्रीडा क्षेत्रातील युवा प्रतिनिधी सहभागी होतात. त्यांना दोन आठवड्यांच्या सत्रामध्ये ऑलिम्पिकची मूल्ये, क्रीडा क्षेत्रातील नीतिमत्ता आणि नेतृत्व, जागतिक क्रीडा व्यवस्थापन, खेळाच्या माध्यमातून विकास याबाबत मार्गदर्शन केले जाते.

संकल्पचे शालेय शिक्षण सावेडीच्या श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेत व महाविद्यालयीन शिक्षण पेमराज सारडा महाविद्यालयात झाले. रोहटक येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट संस्थेतून त्याने 'स्पोर्ट्स मॅनेजमेंट'ची पदवी मिळविली आहे. मैदानावरचे धडे त्याने निर्मलनगरच्या एकलव्य क्रीडा मंडळाच्या मैदानावर गिरविले. त्याच्या निवडीने नगरच्या क्रीडा क्षेत्राला आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली आहे.

# कोट्यवधींचा परतावा मिळवून देतो म्हणत १ कोटी १२ लाखांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २२ मार्च-**

कॉलेज पुन्हा चालू करून, संस्थेमध्ये बोर्ड ऑफ डायरेक्टर बॉडीमध्ये घेण्यासाठी एक कोटींची गुंतवणूक करावी लागेल व त्या मोबदल्यात दीड कोटींचा परतावा मिळवून देतो, असे सांगून १ कोटी १२ लाखांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार सोलापुरात उघड झाला आहे.

याबाबतची हकीकत अशी, १५ फेब्रुवारी २०२१ ते १६ मार्च २०२५ या कालावधीत माधव यदुनाथ जोशी (रा. मु.पो. गलगली ता. बेळगी, जि बागलकोट) हे राघवेंद्र विजयकुमार ज्योती (वय ४८, रा. ११५ साखर पेठ, सोलापूर) यांचे ओळखीचे असल्याने माधव यांनी राघवेंद्र व त्यांचा मित्र अनुप माळवदकर यांना धारवाड येथील वेलूर इंडस्ट्रियल एरियामध्ये आयटीआय कॉलेज आहे. त्या कॉलेजमध्ये स्किल डेव्हलपमेंट कोर्स चालत होते. हे कॉलेज एक संस्था चालवीत होती. परंतु काही कारणास्तव कॉलेज बंद झाले. त्या कॉलेजचे ट्रस्टी हे राघवेंद्र यांच्या ओळखीचे होते. कॉलेज सुरू करण्याकरिता सेंट्रल मिनिस्ट्री ऑफ लेबर दिल्ली येथून केंद्र शासनाची परवानगीची आवश्यकता आहे. तेथे राघवेंद्र यांची चांगली ओळख होती. या ठिकाणाहून कॉलेज पुन्हा चालू करण्याची परवानगी मिळाल्यानंतर आपल्याला केंद्र शासनाकडून १० कोटीचे अनुदान मिळेल. त्यानंतर एक नवीन ट्रस्टची स्थापना करून व संस्थेमध्ये बोर्ड ऑफ डायरेक्टर म्हणून बॉडीमध्ये घेऊ, संस्थेच्या बॉडी मध्ये घेण्यासाठी एक कोटी इतकी गुंतवणूक करावी लागेल. या मोबदल्यात सहा महिन्यात दीड कोटी परतावा मिळवून देतो असे आमिष दाखवल्याने माधव जोशी यांच्या सांगण्यावरून राघवेंद्र ज्योती व त्यांची पत्नीने मिळून चेकद्वारे, बँकद्वारे ४८ लाख व मित्र अनुप यांनी रोखीने व चेकद्वारे ६४ लाख रुपये असे एकूण एक कोटी बारा लाख रुपये केलेली गुंतवणूक माधव जोशी यांनी स्वीकारून, ही रक्कम स्वतःच्या फायद्या करता वापरून दीड कोटी इतकी रक्कम परत दिली नाही. यामुळे फसवणुकीबाबत माधव जोशी यांच्या विरोधात फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दि. २१ मार्च रोजी गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास ढेरे करत आहेत.

# ओम महिला मंडळाचा 'आम्ही मैतरणी मैतरणी नारी सन्मान' पुरस्कार जाहीर
















**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि. २२ मार्च-**

ओम महिला कला क्रीडा सांस्कृतिक सामाजिक व शैक्षणिक प्रसारक मंडळ करमाळा आयोजित आम्ही मैतरणी मैतरणी नारी सन्मान पुरस्कार सुनिताताई अनिल वाशिंबेकर (राजकीय), निलिमा अनिल पुंडे (आदर्श गुरुवर्य), सतिश शिंगाडे व सुवर्णा शिंगाडे (संघर्ष सन्मान) आणि होमगाड सरोज जयसिंग परदेशी (सशक्त महिला) यांना देण्यात येणार असल्याची माहिती मंडळाच्या अध्यक्षा प्रा.अंजली श्रीवास्तव यांनी दिली.

विविध क्षेत्रात आपल्या कामाचा ठसा आज ही समाज मनावर आहे. अशा महिलांना पुरस्कार देऊन गौरव करणे ही सामाजिक जबाबदारी व कर्तव्य समजून मान्यवर महिलांचा यथोचित सन्मान हा खरा महिला दिन आहे म्हणून गेल्या वर्षापासून ओम महिला मंडळ हे महिलांना पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करत आहे. नगराध्यक्षा मोहिनी सावंत, सभापती महिला व बालकल्याण समिती करमाळा निर्मला गायकवाड, डॉ.वर्षा करंजकर, डॉ.कविता कांबळे वडॉ. अपर्णा भोसले या मान्यवरांच्या हस्ते २९ मार्च रविवार रोजी दु.४ वा.केमिस्ट भवन येथे हा पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. यावेळी वैक्सीन गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग निर्बंध जनजागृती मार्गदर्शन नामांकित डॉ.कविता कांबळे करणार आहेत.

# कर्तृत्वाचा गौरव: सेवा आणि प्रेरणेचा त्रिवेणी संगम

## जिल्हा प्रांतपाल सुधीर लातूरे; रोटरी क्लब अकलूजचा व्यवसाय सेवा पुरस्कार प्रदान सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २२ मार्च-**

रोटरी सदस्य क्लबच्या माध्यमातून सेवाभावी वृत्तीने हे कार्य करताना या कार्याबरोबरच समाजात प्रामाणिक कर्तृत्वाने काम करत आणि सेवाभावी वृत्तीने प्रेरणा देणाऱ्या व्यक्तींची दखल घेऊन रोटरी क्लबच्या वतीने त्यांना व्यवसाय सेवा पुरस्कार तसेच रोटरी सक्षम पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते व हा केवळ पुरस्कार नसून सेवा, सन्मान आणि प्रेरणा याचा त्रिवेणी संगम असून तो इतरांसमोर आदर्शवत व दिशादर्शक ठरतो, असे मत सुधीर लातूरे यांनी व्यक्त केले.

संग्रामनगर येथील कृष्णप्रिया मल्टी फंक्शनल हॉल, येथे रोटरी क्लब अकलूज वतीने व्यवसाय सेवा पुरस्कार तसेच रोटरी सक्षम पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.




यावेळी व्यासपीठावर डिस्ट्रिक्ट सेक्रेटरी रो. डॉ. राजगोपाल तापडिया सर तसेच सहाय्यक प्रांतपाल रो. डॉ. कैलास करांडे उपस्थित होते.

समाजात कर्तृत्वाने आणि सेवाभावी वृत्तीने प्रेरणा देणाऱ्या व्यक्तींची दखल घेत यंदाचा रोटरी क्लब अकलूजचा प्रतिष्ठेचा व्यवसाय सेवा पुरस्कार हा वीरेंद्र विठ्ठल पतकी, आशा एकनाथ ढोले-तांदुळकर, गोरख डांगे, आगतराव ज्ञानोबा गायकवाड यांना डिस्ट्रिक्ट गव्हर्नर सुधीर लातूरे व डिस्ट्रिक्ट सचिव डॉ. राजगोपाल तापडिया यांच्या हस्ते सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. तर याच अनुषंगाने प्रतिकूल परिस्थिती स्वतःला सिद्ध करत रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ तर्फे देण्यात येणारा रोटरी सक्षम पुरस्कार हा विशेष पुरस्कार महिलांमधून शुभांगी भगवान देशमुख आणि दिव्यांगांमधून प्रशांत पंडित खरात यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी अध्यक्ष केतन बोरावके, सचिव अजिंक्य जाधव, खजिनदार सीए शशील गांधी, सहसचिव कल्पेश पांढरे, डॉ. मनीष गायकवाड, अभिषेक टेके, सीए नितीन कुदळे, गोमटेश दोशी, नवनाथ नागणे, दीपक फडे, डॉ. अभिजीत मगर, अजित वीर, पोपट पाटील, राजीव बनकर, ॲड. प्रवीण कारंडे, गजानन जवंजाळ, बबनराव शेंडगे, आशिष गांधी, मकरंद जामदार, ओजस दोभाडा, विक्रम कोतमिरे, संदीप साळुंखे, संदीप लोणकर, याबाजी, राजीव देवकर, तृप्ती कुदळे, तेजस्विनी बोरावके, संगिता लातुरे, रोटरी कम्युनिटी कॉप्सचे अध्यक्ष घनश्याम जाधव, सदस्य डॉ. अविनाश जाधव, रोहित गिरमे, एस. आर. कुलकर्णी, राजिव लोहकरे, नमिता जाधव, विजयकुमार जाधव उपस्थित होते. प्रास्ताविक ॲड. प्रवीण कारंडे यांनी केले. अध्यक्ष केतन बोरावके यांनी मान्यवरांचे व उपस्थितितांचे स्वागत केले.

सचिव अजिंक्य जाधव यांनी आभार मानले. सूत्रसंचालन ॲड. प्रवीण कारंडे व गजानन जवंजाळ यांनी केले. या सोहळ्याला जोडूनच रोटरी ऑफिसमध्ये जिल्हा प्रांतपाल रो. सुधीर लातूरे यांच्या प्रमुख उपस्थितीत डिस्ट्रिक्ट गव्हर्नर ऑफिशियल क्लब व्हिजिट उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

## महत्त्वाचे

### साजन प्रकाशला रौप्यपदक; राष्ट्रकुलची पात्रताही गाठली



**सिंगापूर** : भारतीय जलतरणपटू साजन प्रकाशने रविवारी सिंगापूर नॅशनल एज ग्रुप जलतरण स्पर्धेत पुरुषांच्या २०० मीटर बटरफ्लाय प्रकारात दमदार कामगिरी करत रौप्यपदकावर नाव कोरले. अंतिम फेरीत साजनने १:५७.०९ सेकंदांची वेळ नोंदविली आणि तो दुसऱ्या स्थानी राहिला. या शर्यतीत चीन तैपेईच्या कुआन हंग-वांगने १:५६.१८ सेकंदांची वेळ नोंदवित सुवर्णपदक पटकावले. केवळ पदकाची कमाईच नव्हे, तर साजनने या स्पर्धेत १:५७.१२ सेकंदांच्या निर्धारित वेळेपेक्षा कमी वेळ नोंदवित, स्विमिंग फेडरेशन ऑफ इंडियाने राष्ट्रकुल स्पर्धेसाठी निश्चित केलेला पात्रतेचा निकषही पूर्ण केला. दोन वेळा ऑलिम्पिकमध्ये सहभागी झालेला साजन, २०२० टोकियो ऑलिम्पिकसाठी पात्र ठरला तेव्हा, दर्जाच्या निकषाद्वारे ऑलिम्पिकसाठी पात्र ठरणारा पहिला भारतीय जलतरणपटू बनला होता. याशिवाय तो दक्षिण आशियाई क्रीडा स्पर्धेत अनेकदा पदके जिंकणारा खेळाडू असून, २०० मीटर बटरफ्लाय प्रकारात (१:५६.३८) राष्ट्रीय विक्रमाचा मानकरीही आहे. ■

### कोको गॉफ मियामी ओपनच्या चौथ्या फेरीत

**मियामी** : अमेरिकेच्या कोको गॉफने आपल्याच देशाची खेळाडू असलेल्या ॲलिसिया पार्क्सवर तीन सेट्समध्ये मात करत जोरदार पुनरागमन केले आणि मियामी ओपनच्या चौथ्या फेरीत प्रवेश केला. २२ वर्षीय कोका गॉफने १ तास ५० मिनिटांत ॲलिसिया पार्क्सवर २-६, ६-०, ६-१ असा विजय निश्चित केला.



सामन्याच्या सुरुवातीला काही अडचणींचा सामना करावा लागला असला तरी, गॉफने नंतर सामन्यावर पूर्ण वर्चस्व गाजवले आणि प्रतिस्पर्ध्याचे अनेक ब्रेक पॉइंट्स वाचवले. मियामी स्पर्धेच्या अंतिम १६ फेरीत पोहोचण्याची ही तिची चौथी वेळ आहे. आता ती या डब्ल्यूटीए १००० दर्जाच्या स्पर्धेत आपल्या पहिल्या उपांत्यपूर्व फेरीच्या प्रवेशासाठी प्रयत्नशील आहे. पुढील फेरीत आता तिचा सामना सोराना सिर्स्टियाशी होईल. रोमानियाची अनुभवी खेळाडू सिर्स्टियाने २१ वी मानांकित खेळाडू एलिस मर्टेन्सचा ६-३, ६-२ असा पराभव केला. सोराना सध्या आपल्या कारकिर्दीतील शेवटचा हंगाम खेळत आहे. हा सामना खरोखरच कठीण होता. ती खूपच चांगला खेळ करत होती. तिचा खेळ कधीकधी अत्यंत उत्कृष्ट होता, त्यामुळे आक्रमक खेळायचे की केवळ तिला खेळायला लावून चुका करण्यास भाग पाडायचे, या दुविधापूर्ण विचारात मी होती, मी प्रतिहल्ला करण्याच्या पद्धतीत काही बदल केले व त्यामुळेच सामन्यात फरक पडला, असे गॉफने विजयानंतर सांगितले.

### दक्षिण आफ्रिकेचा न्यूझीलंडवर विजय

**वेलिंग्टन** : दक्षिण आफ्रिकेच्या फिरकीपटूंनी निर्णायक भूमिका बजावत, रविवारी न्यूझीलंडविरुद्धचा चौथा टी-२० सामना १९ धावांनी जिंकला आणि पाच सामन्यांची ही मालिका २-२ अशी बरोबरीत आणली. दक्षिण आफ्रिका संघाने ५ बाद १६४ धावा उभारल्यानंतर, धावांचा पाठलाग करताना न्यूझीलंड संघाला १८.५ षटकांत १४५ धावांतच गुंडाळले. १० षटकांच्या अखेरीस ३ बाद ८८ अशा स्थितीत असतान न्यूझीलंडने एकापाठोपाठ एक अशा वेगाने गडी गमावले. दोन्ही देशांच्या दुय्यम फळीतील (कमकुवत) संघांमध्ये खेळल्या जाणाऱ्या या मालिकेचा निकाल आता बुधवारी ख्राईस्टचर्च येथे होणाऱ्या निर्णायक सामन्यावर अवलंबून असेल. धावांचा पाठलाग सुरू असताना सामन्याच्या मधल्या टप्प्यात फिरकीपटू केशव महाराज व प्रिनेलन सुब्रायेनने प्रतिस्पर्ध्यांवर कडक अंकुश ठेवला; याच वेळी सामन्याचे पारडे दक्षिण आफ्रिकेच्या बाजूने झुकले. ■

# पृथ्वी परतला, दिल्ली जिंकेल

◆ **नवी दिल्ली, २२ मार्च**

२८ मार्च रोजी सुरू होणाऱ्या इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) आगामी हंगामासाठी सलामीवीर पृथ्वी शॉ आपल्या दिल्ली कॅपिटल्समध्ये पुन्हा परतला आहे. त्यामुळे संघात चैतन्य निर्माण झाले आहे, त्यामुळे यंदा तरी दिल्ली कॅपिटल्स आयपीएल ट्रॉफी जिंकेल काय असा प्रश्न चाहत्यांना पडला आहे.

दिल्ली कॅपिटल्स संघाने रविवारी पृथ्वी शॉच्या घरवापसीचा एक व्हिडीओ शेअर केला. आमचा मुलगा घरी परतला आहे, असे या व्हिडीओला शीर्षक दिले होते.

आयपीएल २०२५ च्या लिलावापूर्वी दिल्ली कॅपिटल्स संघाने पृथ्वी शॉला करारमुक्त केल्यानंतर, दिल्लीशी असलेला त्याचा सात हंगामांचा दीर्घ प्रवास संपुष्टात आला होता. त्यानंतर या २६ वर्षीय खेळाडूसाठी लिलावाचा अनुभव निराशाजनक ठरला; त्याला कोणत्याही संघाने विकत घेतले नाही. दिल्ली संघानेही आता महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या फलंदाजाला पुन्हा संघात घेण्याचा निर्णय घेतला नाही.



पृथ्वी शॉला आणखी एका संधीची वाट पाहावी लागली. २०२६ च्या लिलावाच्या मुख्य फेऱ्यांमध्ये त्याचे नाव आले नाही. अखेर ॲक्सलरेटेड फेज (जलद फेरी) दरम्यान त्याचे नशीब उजळले; या अंतिम फेरीत निवडल्या गेलेल्या ११ खेळाडूंपैकी तो एक होता आणि त्याला त्याच्याच जुन्या संघाने (फ्रॅन्चायझीने) ७५ लाख रुपयांचे कंत्राट देऊन पुन्हा संघात घेतले.

पृथ्वी दिल्ली कॅपिटल्सच्या शिबिरात सहभागी होण्यासाठी अरुण जेटली स्टेडियमवर परतलास, तेव्हा त्यानेही आपल्या चाहत्यांसाठी एक संदेश पाठविला.

'कोटलासारखे ठिकाण कधीच विसरत नाही. या ठिकाणाने मला जे घडवले आहे. काही कथा कधीच संपत नाहीत. त्या पुन्हा परत येतात. दिल्ली, तुमचा मुलगा घरी परतला आहे, असे पृथ्वी शॉने व्हिडीओमध्ये म्हटले आहे.

२०१८ मध्ये भारताने १९ वर्षांखालील विश्वचषक जिंकल्यानंतर झालेल्या लिलावात, दिल्ली संघाने पृथ्वी शॉला १.२ कोटी रुपयांना विकत घेतले होते; त्या विश्वचषकात त्याने कर्णधार म्हणून संघाचे नेतृत्व केले होते. पृथ्वी शॉने सोबत एकूण सात हंगाम घालवले. या काळात त्याने एकूण ७९ सामने खेळले आणि २३.५ च्या सरासरीने १८९२ धावा केल्या. आपल्या या कार्यकाळात त्याने १४ अर्धशतकेही झळकावली.

गत हंगामात दिल्ली कॅपिटल्सचा संघ प्ले-ऑफमध्ये स्थान मिळवण्यापासून थोडक्यात मुकला होता. १४ सामन्यांपैकी सात सामन्यांत विजय मिळवून ते गुणतालिकेत पाचव्या स्थानावर राहिले होते. या संघाने अद्याप एकदाही आयपीएल विजेतेपद पटकावलेले नाही; त्यामुळे या १९ व्या हंगामात विजेतेपदाचा दुष्काळ संपवण्याचा त्यांचा प्रयत्न असेल आणि दिल्ली संघाला पृथ्वी शॉकडून खूप आशा आहे. ◀(वृत्तसंस्था)

### दिल्ली कॅपिटल्सने ट्रॉफी जिंकावी : चोप्रा

दिल्ली कॅपिटल्स (डीसी) संघाने आयपीएल विजेतेपदासाठीची आपली दीर्घ प्रतीक्षा संपुष्टात आणावी आणि या वर्षी त्यांनी ही ट्रॉफी जिंकावी, असा आशावाद भारताचा माजी सलामीवीर आकाश चोप्रा याने व्यक्त केला. अक्षर आणि कुलदीप वगळता दिल्ली कॅपिटल्सकडे प्रत्येक स्थानासाठी पुरेसे पर्यायी खेळाडू आहेत आणि संघ अत्यंत मजबूत दिसत आहे, असे म्हणत चोप्राने डीसी संघाला आपला पाठिंबा दर्शवला आहे. २००८ मध्ये आयपीएल लीगची सुरुवात झाल्यापासून प्रत्येक हंगामात सहभागी होऊनही, आयपीएल विजेतेपद कधीही न जिंकणाऱ्या केवळ दोन फ्रॅन्चायझींपैकी दिल्ली कॅपिटल्स ही एक आहे. ■

# पंजाब किंग्सची योग्य दिशेने वाटचाल : पठाण



◆ **नवी दिल्ली, २२ मार्च**

लिलावात हुशारीने व धाडसी निर्णय घेतल्यानंतर पंजाब किंग्स अखेर योग्य दिशेने वाटचाल करत आहे, त्यामुळे इंडियन प्रीमियर लीगच्या विजेतेपदासाठीची त्यांची प्रदीर्घ प्रतीक्षा संपण्याची आशा निर्माण झाली आहे, असा विश्वास भारताचा माजी अष्टपैलू खेळाडू इरफान पठाणने व्यक्त केले आहे.

गत आयपीएल हंगामात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुविरुद्ध अटीतटीच्या अंतिम सामन्यात पराभव पत्करून पंजाब उपविजेता ठरला होता. प्रभ ावी नेतृत्व उत्तम संघबांधणीमुळे पंजाब किंग्सला हे यश मिळाले.

पंजाब किंग्स निम्मी आयपीएल लिलावातच जिंकतो. मोठी रक्कम मिळाली म्हणजे तुम्हाला हवे ते मिळेलच असे नाही, पण त्यांना ते मिळाले व ते अंतिम फेरीत पोहोचले, असे पठाण म्हणाला.

फ्रॅन्चायझीने ग्लेन मॅक्सवेलसारख्या वाईट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना संघातून काढून टाकण्यासह, तसेच राखीव खेळाडूंची फळी मजबूत करण्यासारखे कठीण निर्णय घेण्यास मागेपुढे पाहिले नाही. त्यांनी धाडसी पण महत्त्वाचे निर्णय घेतले. त्यामुळेच अझमतुल्ला ओमरझाई, मार्को जानसेन व मार्कस स्टोइनिससारखे अष्टपैलू खेळाडू, तसेच तरुण भारतीय फलंदाजीचा गाभा दिसतो. श्रेयस अय्यरला कर्णधारपदी नियुक्त करण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्यांनी त्याच्यासाठीही सर्वतोपरी प्रयत्न केले. विचारांमध्ये स्पष्टता आहे व त्यामुळे पंजाबने योग्य दिशेने वाटचाल सुरू केली आहे, असे तो म्हणाला.

**शून्यातून सुरुवात सोपे नसते**

जेव्हा तुम्ही एबी डिव्हिलियर्ससारख्या खेळाडूंना जाऊ देता, तेव्हा तुमच्याकडे आंद्रे रसेल होता, तेव्हा शून्यातून सुरुवात करणे सोपे नसते. रसेलला अधिक संधी देण्याबद्दल चर्चा झाली होती, पण ते त्याला सातत्याने संघात स्थान देऊ शकले नाहीत. प्रतिभा ओळखणे खूप महत्त्वाचे आहे, असे तो म्हणाला.

**अस्थिरतेमुळे पंजाब, दिल्लीला फटका : आकाश चोप्रा**

अस्थिरतेमुळे ऐतिहासिकदृष्ट्या पंजाब किंग्स आणि दिल्ली कॅपिटल्स या दोन्ही संघांना फटका बसला आहे, असे मत आकाश चोप्राने व्क्त केले.

जिथे यश मिळत नाही, तिथे संघात सतत बदल होत राहतात. एका संघाला १५ कर्णधार लाभले आहेत, तर दुसऱ्या संघाला १७. जर तुम्हाला तुमची सद्यस्थिती बदलायची असेल, तर स्थिरतेशी कोणतीही तडजोड केली जाऊ शकत नाही, असेही तो म्हणाला.

अलिकडच्या वर्षांत दिल्ली कॅपिटल्सने आपल्या कामगिरीत बरीच सुधारणा केली आहे. यंदाच्या आयपीएल हंगामासाठी तो एक अधिक मजबूत संघ असेल असे चोप्रा म्हणाला. ◀(वृत्तसंस्था)

# ऋषभ पंतसमोर 'करा अथवा मरा' स्थिती

◆ **लखनौ, २२ मार्च**

२८ मार्चपासून सुरू होणाऱ्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात लखनौ सुपर जायण्ट्सचा कर्णधार ऋषभ पंतसमोर करा अथवा मरा स्थिती ठरु शकते. पंतचा आयपीएल २०२५ हंगाम अत्यंत निर्णायक ठरणार आहे. या हंगामात तो तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करणार असून, आपला जुना फॉर्म पुन्हा प्राप्त करणे व भारताच्या टी-२० संघातील आपले स्थान पक्के करणे, हे त्याचे मुख्य ध्येय असेल.



आपला फॉर्म सुधारण्याच्या दृष्टीने हे एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. देशाच्या टी-२० संघात पुन्हा स्थान मिळवण्याच्या पंतच्या आशांसाठी आयपीएलमधील त्याची कामगिरी अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

लखनौ सुपर जायण्ट्ससाठी गोलंदाजी ही अजूनही चिंतेची बाब बनली आहे; संघाचे प्रमुख वेगवान गोलंदाज दुखापतींनी त्रस्त असल्याने गोलंदाजी फळीवर परिणाम झाला आहे.

लखनौचा कर्णधार म्हणून आपला दुसरा हंगाम खेळणाऱ्या पंतसमोर यावेळी मोठी आव्हाने आणि जबाबदाऱ्या आहेत. विशेषतः लिलावात या फ्रॅन्चायझीने त्याच्या सेवांसाठी तब्बल २७ कोटी रुपयांची विक्रमी रक्कम मोजली आहे.

गत वर्षीच्या निराशाजनक कामगिरीनंतर, या हंगामात एक यशस्वी कर्णधार व आघाडीचा फलंदाज म्हणून चमकणे पंतसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरेल, कारण या कामगिरीच्या जोरावरच त्याला भविष्यात भारताच्या टी-२० संघात पुन्हा स्थान मिळवता येईल. सध्या पंत केवळ भारताच्या कसोटी संघाचा एक अविभाज्य भाग आहे, तर वन-डे मध्ये तो के.एल. राहुलचा पर्यायी यष्टिरक्षक म्हणून संघात असतो.

२०२४ च्या विश्वचषक विजयानंतर, या २८ वर्षीय खेळाडूने टी-२० संघातील आपले स्थान गमावले होते. आता संघात पुनरागमन करण्यासाठी त्याला काहीतरी असाधारण कामगिरी करावी लागेल; कारण संजू सॅमसन आणि ईशान किशनने आपल्या अलीकडील दमदार कामगिरीच्या जोरावर संघात आपली जागा जवळपास निश्चित केली आहे.

त्यामुळे, आगामी हंगाम हा केवळ आपल्यावर खर्च करण्यात आलेल्या प्रचंड रकमेचे चीज करण्यापुरता मर्यादित नाही, तर क्रिकेटच्या या सर्वात कमी कालावधीच्या प्रकारात आपले अस्तित्व आणि महत्त्व टिकवून ठेवण्याच्या दृष्टीनेही तो अत्यंत महत्त्वाचा आहे.

पंतला तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीची संधी देण्यासाठी निकोलस पूरन फलंदाजीच्या क्रमवारीत खाली सरकेल.

आगामी १ एप्रिल रोजी दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध होणाऱ्या आपल्या पहिल्या सामन्याच्या तयारीसाठी सध्या ते लखनौ येथील आपल्या घरच्या मैदानावर कसून सराव करीत आहेत. ◀(वृत्तसंस्था)

### राजस्थान रॉयल्समध्ये करनच्या जागी दासुन शनाकाचा समावेश

**जयपूर** : दासुन शनाका हा आयपीएल २०२६ साठी राजस्थान रॉयल्स (आरआर) संघात दुखापतग्रस्त सॅम करनची जागा घेण्यास सज्ज झाला असून, त्याने आपल्या पीएसएल संघ- ऽलाहोर कलंदर्सला या निर्णयाची माहिती दिली आहे. या बदलाशी संबंधित आवश्यक औपचारिकता पूर्ण केल्या जात असल्याचे समजते. करन हा चेन्नई सुपर किंग्स व आरआर यांच्यातील लिलावापूर्वी झालेल्या एका खेळाडूंच्या अदलाबदलीचा भाग होता. या व्यवहारात सीएसकेने संजू सॅमसनला आपल्या संघात घेतले होते, तर आरआरला रवींद्र जडेजा मिळाला होता. ■



लंडनमध्ये यूफसी या मिश्र मार्शल आर्ट्स लढतीत महिलांच्या स्ट्रॉ वेट गटाच्या सामन्यादरम्यान शनेल डायर (उजवीकडे) ही रावेना ऑलिव्हेरा हिला लाथ मारताना

### पीएसएल २६ मार्चपासून, पण प्रेक्षकांना प्रवेश नाही

**लाहोर** : इराण-अमेरिका-इस्रायल संघर्षामुळे या प्रदेशात निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीमुळे, पाकिस्तान सुपर लीगचे (पीएसएल) सुरुवातीचे सामने प्रेक्षकांविना खेळवले जातील. पीएसएलची ही नवीन आवृत्ती केवळ दोनच ठिकाणी- कराची आणि लाहोर येथे आयोजित केली जाईल असा निर्णयही घेण्यात आला आहे, असे पाकिस्तान क्रिकेट मंडळाचे अध्यक्ष मोहसिन नक्वी यांनी सांगितले. नक्वी यांनी पाकिस्तानात पीएसएल आयोजित करण्याबाबतच्या कोणत्याही सुरक्षाविषयक चिंतांना फारसे महत्त्व दिले नाही. या प्रदेशातील परिस्थितीमुळे सरकारने जाहीर केलेल्या काटकसरीच्या उपाययोजनांचा एक भाग म्हणून हे निर्णय घेण्यात आले आहेत. ■

# अमेलिया केरचा टी-२० मध्ये विश्वविक्रम

◆ **वेलिंग्टन, २२ मार्च**

न्यूझीलंडच्या महिला संघाने दक्षिण आफ्रिकेच्या महिला संघाचा पराभव करत पाच सामन्यांच्या मालिकेत अभेद्य आघाडी घेतली असतानाच, अमेलिया केरने टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये (पुरुष आणि महिला अशा दोन्ही क्रिकेट प्रकारांत) सलग सर्वाधिक वेळा ३०-हून अधिक धावांची नोंद करून इतिहास रचला आहे. येथे झालेल्या सामन्यात, केरने गोलंदाजीत ४ षटकांत ३२ धावा देऊन १ बळी मिळवला आणि दक्षिण आफ्रिकेला ६ बाद १५९ धावसंख्येवर रोखण्यात मदत केली. त्यानंतर फलंदाजीत २९ चेंडूंत ३१ धावांची खेळी करत तिने आपल्या सातत्यपूर्ण कामगिरीची परंपरा कायम राखली. न्यूझीलंडच्या सहा गडी राखून झालेल्या विजयात तिच्या या अष्टपैलू कामगिरीने महत्त्वाची भूमिका बजावली. त्यामुळे यजमान संघाने मालिकेत ३-१ अशी आघाडी घेतली आहे. या २५ वर्षीय खेळाडूने आता सलग १० टी-२० आंतरराष्ट्रीय डावांमध्ये ३० किंवा त्याहून अधिक धावा केल्या असून, एक नवीन विश्वविक्रम प्रस्थापित केला आहे. तिने यापूर्वीचा ९ डावांचा विक्रम मोडीत काढला आहे. ◀(वृत्तसंस्था)



# १५ वर्षीय फॅनीने घडविला टी- २० शतकाचा विक्रम

◆ **लागोस, २२ मार्च**

लागोस येथे आयोजित नायजेरिया आमंत्रित महिला टी-२० क्रिकेट स्पर्धेत घानावर १२२ धावांनी मिळवलेल्या विजयादरम्यान, रवांडाची फॅनी उटागुशिमानिंदे ही टी-२० आंतरराष्ट्रीय शतकाची नोंद करणारी सर्वात तरुण क्रिकेटपटू ठरली.



१५ वर्षे आणि २२३ दिवस वय असलेल्या उटागुशिमानिंदेने ६५ चेंडूंमध्ये नाबाद १११ धावांची धडाकेबाज खेळी केली. यासह तिने युगांडाच्या प्रॉस्कोव्हिया अलाकोचा आधीचा विक्रम मोडीत काढला. अलाकोने २०१९ मध्ये किगाली येथे मालीविरुद्ध ११६ धावांची खेळी केली होती, तेव्हा तिचे वय १६ वर्षे आणि २३३ दिवस होते.

या रवांडाच्या सलामीच्या फलंदाज महिलेने, या क्रिकेट प्रकारात आपल्या आंतरराष्ट्रीय पदार्पणाच्याच सामन्यात शतक ठोकणारी पहिली महिला होण्याचा मानही मिळविला. पुरुषांच्या गटामध्ये फ्रान्सच्या गुस्ताव मॅककिओनच्या नावावर टी-२० आंतरराष्ट्रीय शतक ठोकणाऱ्या सर्वात तरुण खेळाडूचा विक्रम आहे; त्याने १८ वर्षे आणि २८० दिवस वयात ही कामगिरी साध्य केली होती. ◀(वृत्तसंस्था)

# भारताचा दौरा ऑस्ट्रेलियाची कसोटी पाहणार

◆ **मेलबर्न, २२ मार्च**

क्रिकेट ऑस्ट्रेलियाने रविवारी आपले २०२६-२७ चे आंतरराष्ट्रीय वेळापत्रक जाहीर केले. हे वेळापत्रक अत्यंत व्यस्त असून, जानेवारीच्या मध्यावर किंवा अखेरीस भारतात सुरू होणाऱ्या प्रतिष्ठित बॉर्डर-गावस्कर चषकापूर्वी खेळाडूंना विश्रांतीसाठी (किंवा तयारीसाठी) फारच कमी वेळ मिळणार आहे. पुढच्या वर्षी भारताच्या भूमीवर खेळली जाणारी पाच कसोटी सामन्यांची मालिका, पॅट कमिन्सच्या संघासाठी एका अभूतपूर्व आणि अत्यंत कठीण वेळापत्रकातील एक निर्णायक टप्पा ठरणार आहे.

ऑस्ट्रेलियाचा संघ डिसेंबर ते मार्च या १४ आठवड्यांच्या कालावधीत १० कसोटी सामने खेळणार आहे; त्यांच्या क्रिकेट इतिहासातील हा सर्वात आव्हानात्मक आणि दमवणारा टप्पा ठरणार आहे. ऑस्ट्रेलियाचा घरच्या मैदानांवरील हंगाम ऑगस्ट २०२६ मध्ये बांगलादेशविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांनी सुरू होईल आणि मार्च २०२७ मध्ये मेलबर्न क्रिकेट मैदानावर होणाऱ्या डे-नाईट (दिवस-रात्र) कसोटी सामन्याने संपेल. हा सामना इंग्लंडविरुद्धचा आणि क्रिकेट ऑस्ट्रेलियाच्या १५० व्या वर्धापनदिनानिमित्त खेळला जाणारा विशेष सामना असेल. न्यूझीलंडविरुद्धची घरच्या मैदानांवरील मालिका अवघ्या चार आठवड्यांच्या कालावधीतच उरकली जाणार आहे. दुसरीकडे, या वर्षाच्या अखेरीस होणारा ऑस्ट्रेलियाचा दक्षिण आफ्रिका दौरा ऑक्टोबरच्या अखेरपर्यंत चालेल आणि त्यानंतर नोव्हेंबरमध्ये इंग्लंडविरुद्ध आठ सामन्यांची पांढऱ्या चेंडूची (मर्यादित षटकांची) मालिका खेळली जाईल. ◀(वृत्तसंस्था)

### ऑस्ट्रेलियाचे कसोटी वेळापत्रक

| | |
|---|---|
| **ऑगस्ट:** | बांगलादेशविरुद्ध दोन कसोटी सामने (मायदेशी) |
| **ऑक्टोबर:** | दक्षिण आफ्रिकेविरुद्ध तीन कसोटी सामने (परदेशी) |
| **डिसेंबर-जानेवारी:** | न्यूझीलंडविरुद्ध चार कसोटी सामने (मायदेशी) |
| **जानेवारी-मार्च:** | भारताविरुद्ध पाच कसोटी सामने (परदेशी) |
| **११-१५ मार्च:** | इंग्लंडविरुद्ध १५० व्या वर्धापनदिनानिमित्त विशेष कसोटी सामना (मायदेशी) |
| **जून:** | अंतिम सामना (पात्र ठरल्यास; इंग्लंडमध्ये) |
| **जून-ऑगस्ट:** | इंग्लंडविरुद्ध पाच कसोटी सामने (परदेशी). |

# टेनिस, मातृत्व यांच्यात ओसाका द्विधा मनःस्थितीत

◆ **मियामी, २२ मार्च**

अलीकडेच एका स्पर्धेत झालेल्या पराभवानंतर स्टार टेनिसपटू नाओमी ओसाका आपल्या टेनिस कारकिर्दीचा आणि मातृत्वाच्या जबाबदाऱ्यांचा समतोल कसा साधावा याचा विचार करत आहे. टेनिसमधील विजेतेपदांचा त्याग करावा लागला तरी चालेल, पण एक चांगली आई असण्याला व आपल्या मुली म्हणजे शाई सोबत वेळ घालवण्याला ओसाका प्राधान्य देते.



आपल्या कन्येसोबत नाओमी ओसाका

दुखापतीमुळे तिने ऑस्ट्रेलियन ओपनमधून माघार घेतली व मियामीमध्ये तिला लवकर बाहेर पडावे लागले, त्यामुळे तिच्या वेळापत्रकाच्या निर्णयांवर परिणाम झाला. ओसाका चार्ल्सटन स्पर्धेत सहभागी न होण्याचा विचार करत आहे, परंतु माद्रिद, रोम आणि फ्रेंच ओपनमध्ये सहभागी होण्याची तिला आशा आहे.

सलामीच्या सामन्यात ऑस्ट्रेलियाच्या टॅलिया गिब्सनकडून ७-५, ६-४ ने पराभव झाल्यानंतर माजी प्रथम विश्वमानांकित महिला टेनिसपटू नाओमी ओसाकाने सांगितले की, ती आपल्या टेनिसच्या वेळापत्रकाचा आणि मातृत्वाचा सर्वोत्तम समतोल कसा साधावा याचा विचार करत आहे.

आपल्या मुलीच्या जन्मानंतर १५ महिन्यांच्या विश्रांतीनंतर ओसाका २०२४ मध्ये टूरवर परतली आणि गत वर्षी अमेरिकन ओपनच्या उपांत्य फेरीपर्यंत पोहोचली होती. जानेवारीमध्ये ऑस्ट्रेलियन ओपनमधील तिच्या नियोजित तिसऱ्या फेरीच्या सामन्यापूर्वी पोटाच्या दुखापतीमुळे तिने माघार घेतली होती.

चार वेळची ग्रॅण्ड स्लॅम विजेती या महिन्यात इंडियन वेल्सच्या उपांत्यपूर्व फेरीत बेलारूसची आर्यना सबालेन्काकडून पराभूत झाली आणि त्यानंतर मियामीमध्येही ती स्पर्धेतून लवकर बाहेर पडली.

मी दौऱ्यातील जबाबदाऱ्या आणि घरी घालवू इच्छित असलेला वेळ यांचा ताळमेळ साधत आहे, असे ओसाका म्हणाली. ◀(वृत्तसंस्था)

# २० वर्षांखालील महिला संघाच्या कामगिरीत सुधारणा

◆ **बँकॉक, २२ मार्च**



एएफसी २० वर्षांखालील आशियाई चषक फुटबॉल स्पर्धेसाठी पात्रता मिळवल्यापासून भारताच्या २० वर्षांखालील महिला संघाने लक्षणीय सुधारणा केली आहे. थायलंडमध्ये होणाऱ्या आशियाई चषकात हा संघ आशियातील सर्वोत्तम संघांविरुद्ध जोरदार स्पर्धा करू शकतो, असा विश्वास भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक जोआकिम अलेक्झांडरसन यांनी व्यक्त केला.

स्पर्धेच्या खूप आधीच बँकॉकला दाखल झालेला भारतीय महिला फुटबॉल संघ, २ एप्रिल रोजी जपानविरुद्ध गट क मधील आपल्या मोहिमेची सुरुवात करेल. त्यानंतर त्यांचे सामने ऑस्ट्रेलिया (५ एप्रिल) व चीन तैपेई (८ एप्रिल) विरुद्ध होतील.

प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ, तसेच तिसऱ्या स्थानावरील दोन सर्वोत्तम संघ उपांत्यपूर्व फेरीसाठी पात्र ठरतील. उपांत्य फेरीतील संघ या वर्षाच्या अखेरीस पोलंडमध्ये होणाऱ्या फिफा २० वर्षांखालील महिला विश्वचषक स्पर्धेसाठी पात्रता मिळवतील.

ऑगस्टमधील पात्रता फेरीपासून संघाच्या प्रवासावर भाष्य करताना, अलेक्झांडरसन म्हणाले की संघात सर्वच विभागांमध्ये बदल झाला आहे.

संघात लक्षणीय सुधारणा झाली आहे. मला चेंडूची अधिक चांगली हालचाल, जलद पासिंग व प्रतिस्पर्धी संघाच्या गोलक्षेत्रात अधिक स्पष्टता दिसली आहे. बचावात्मक खेळातही आम्ही अधिक संघटित झालो आहोत, विशेषतः गोलरक्षकांकडून खेळ सुधारला आहे. आम्ही सुधारणेसाठी ओळखलेल्या प्रत्येक क्षेत्रात प्रगती झाली आहे, असे ते म्हणाले.

आव्हानात्मक गटात स्थान मिळाल्याने, अलेक्झांडरसनने प्रतिस्पर्धकांची गुणवत्ता मान्य केली, परंतु आत्मविश्वासाचे महत्त्व अधोरेखित केले. प्रशिक्षक जोआकिम अलेक्झांडरसन यांनी जपान आणि ऑस्ट्रेलियासारख्या बलाढ्य प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध सामरिक शिस्त, बचावात्मक आक्रमकता आणि आत्मविश्वासाच्या महत्त्वावर भर दिला आहे. ◀(वृत्तसंस्था)

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### उमरडमध्ये अज्ञाताने केळीच्या बागेवर फवारले तणनाशक

**साडेतीन एकर केळीचे नुकसान**

**जेऊर दि.२२ मार्च-**

उमरड (ता.करमाळा) येथील नाना गणपत बदे या शेतकऱ्याच्या साडेतीन एकरातील दोन महिन्यांच्या केळी बागेवर अज्ञात व्यक्तीने तनाशकाची फवारणी केली आहे. यामुळे शेतकऱ्याचे लाखोंचे नुकसान झाले आहे. २० मार्चला या रात्री अज्ञात व्यक्तीने रात्री अंधाराचा फायदा घेत खुनशी वृत्तीने या केळी बागेवर केळीची रोपे जळतील अशा औषधांची फवारणी केली आहे. नुकसानग्रस्त शेतकरी नाना बदे यांनी दोन महिन्यांपूर्वी विलियम्स कंपनीची २२ रुपयांप्रमाणे रोपांची खरेदी करून केळीची लागण केली होती. वाटेकरी सोमनाथ बदे यांच्या मार्फत केळी पीक घेतले जाणार होते मात्र अचानक जाणीवपूर्वक नुकसान घडवून आणल्याने शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे. नुकसान करणाऱ्या व्यक्तीचा शोध घेऊन त्याच्यावर तत्काळ कारवाई करण्यात यावी. यासाठी पोलिसात अज्ञाता विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलीस विविध माध्यमातून गुन्ह्याचा तपास लावणार आहेत. कृषी विभागाने ही सदर बाधित क्षेत्राची पाहणी करून रितसर पंचनामा करावा व गुन्हेगाराचा शोध घेऊन शेतकऱ्यांचे होणारे नुकसान थांबवण्याची मागणी केली जात आहे.

> आमचा शेतकऱ्यांचा निम्मा प्रपंच उघड्यावर पडलेला असतो. काही माथेफिरू लोक असे नुकसान घडवून आणत आहेत. या अगोदरही आमच्या विद्युत पंपात बिघाड करण्याचे अनेक प्रकार घडले आहेत. पोलिसांनी आमचे नुकसान करणाऱ्यांचा शेध घेऊन त्याच्यावर कारवाई करावी. व कृषी व महसूल विभागाने आमच्या नुकसानीची पाहणी करून शासनामार्फत आम्हाला नुकसान भरपाई द्यावी.
>
> **नाना बदे** , नुकसानग्रस्त शेतकरी, उमरड

### मंगळवेढामार्गे सोलापूरला जाणाऱ्या एसटी बसचे दरपत्रक पूर्ववत करण्याची मागणी

**सांगोला, दि. २२ मार्च-**



कोल्हापूर ते मंगळवेढा मार्गे सोलापूर या प्रवासाचे दरपत्रक पूर्ववत करावेत अशी मागणी सांगोल्यातील शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेने एसटी प्रशासनाकडे केली आहे. एका वर्षापासून मंगळवेढामार्गे सोलापूरला जाणाऱ्या बसेस या सोलापुरात दमानीनगर रेल्वे पूलाच्या पुनर्बांधणी करिता देगाव मार्गे बंद करण्यात आल्या होत्या. त्यामुळे पर्यायी विजापूर बायपासमार्गे बाळे, सोलापूर असा प्रवास करत होते. त्यामुळे प्रवाशांना ज्यादा तिकिटाचा भार सोसावा लागत होता. पण प्रवाशांनी व इतर संघटनांनी मागणी करून सोलापूर शहरातील दमानीनगर रेल्वे पूलाचे काम होईपर्यंत शहरालगत असणाऱ्या देगाव, अवंती नगर, पुना नाका मार्गे सोलापूर शहरात हा रस्ता १५ दिवसांपासून वाहतुकीसाठी खुला केल्याने प्रवाशांच्या अंतर व वेळ वाचत आहे. परंतु कोल्हापूर, शिराळा व कोकणातून येणाऱ्या एसटी बसेस या पूर्वीप्रमाणे एक टप्पा जादा तिकिटाचे आकारणी करत आहेत. त्यामुळे प्रवाशांना नाहक आर्थिक भुर्दंड बसत आहे. तसेच काही बसेस या मार्गाचा वापर करीत नाहीत तरी सोलापूर विभागीय एसटी महामंडळ कार्यालयाने मंगळवेढा मार्गे जाणाऱ्या-येणाऱ्या एसटी बसना पूर्ववत तिकीट दर ठेवावेत व हा मार्ग वापरण्यास सक्तीचे करावे. एसटी प्रशासनाने याची गांभीर्याने दखल घेऊन सदर सुधारित मार्ग वापरण्यास व तिकीट कपातीस संबंधितांना सूचना, आदेश द्याव्यात अशी मागणी संघटनेने केली आहे.

> शहीद अशोक कामटे संघटनेच्या सूचनेप्रमाणे जिल्हा नियंत्रक विभागाला सदरची बाब कळविणार आहे. अनेक चालक, वाहकांना या पर्यायी मार्गाची माहिती नसल्याने हा मार्ग वापरत नसावेत. सांगोला कंट्रोलरला अंमलबजावणी करण्याकरिता या मार्गावरील संबंधित चालक, वाहकाला सूचना व माहिती देण्यात येईल.
>
> **विकास पोफळे**, आगारप्रमुख, सांगोला

### बोरोटी येथे श्रीकृष्ण गोशाळेचे उद्घाटन उत्साहात

**अक्कलकोट, दि. २२ मार्च-**

तालुक्यातील बोरोटी येथे श्रीकृष्ण गो शाळेचे उद्घाटन मोठ्या उत्साहात करण्यात आले. अक्कलकोट तालुका मध्ये बोरोटी येथे श्री याचे उद्घाटन छत्रपती शिवाजी महाराजांच्या व श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व गो माता गाय पूजा करून करण्यात आले. विश्व हिंदू परिषद मेजर बालाजी राजपूत व गावातील ज्येष्ठ व्यक्ती हस्ते पूजा करण्यात आली. यावेळी सोलापूर जिल्हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघचे ग्राम विकास जिल्हा मंडळ सदस्य संदीप कटकधोंड, बजरंग दल जिल्हा संयोजक अभय कूलथे, प्रविण झिला, शितल परदेशी, पवनकुमार कोमाठी, वीरू मंचाल, आदित्य चिंपा, अक्कलकोट तालुका बजरंग दल प्रमुख मदनकुमर राठोड, दानशूर व्यक्ती संदीप चव्हाण, ऑल इंडिया बंजारा अक्कलकोट तालुका अध्यक्ष बजरंगी, अभि मोरे, रोहन पालकर, सुनील शिंदे, आकाश गडकरी, विशाल लांडगे, बोरोटीचे काशिनाथ पाटील, मल्हारी मुळे, काशिनाथ कल्सगोंड, शिवानंद व्हारकेरी, श्रीमंत पाटील, संतोष कोळी, हुसेनी नंदिवले, बोरोटी सरपंच चंद्रकांत कोळी कुंभार, भिमराव राठोड, टाकसिंघ राठोड, देवीसिंग चव्हाण व रमेश राठोड आदी गोमाताप्रेमी उपस्थित होते.

# आठ हजार विद्यार्थ्यांनी दिली प्रज्ञाशोध परीक्षा

## उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी परीक्षा केंद्रास भेट देत साधला विद्यार्थ्यांशी संवाद



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मार्च-**

जिल्हा परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या प्रज्ञाशोध परीक्षेला यंदा तब्बल आठ हजार विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षांची गोडी लागावी, त्यांचा बौद्धिक विकास व्हावा आणि शिष्यवृत्ती परीक्षांसाठी त्यांची तयारी भक्कम व्हावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणातील सहभाग पाहता या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. परीक्षेदरम्यान जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी विविध परीक्षा केंद्रांना अचानक भेटी देत व्यवस्थेची पाहणी केली. केंद्रांवरील सोयी-सुविधा, परीक्षेचे नियोजन आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती याचा त्यांनी आढावा घेतला. अचानक भेटीमुळे केंद्रांवरील प्रशासन अधिक सतर्क झाल्याचेही पाहायला मिळाले.

केंद्र भेटीदरम्यान पवार यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या मनातील भीती दूर करण्याचा प्रयत्न केला. प्रत्येक विद्यार्थ्याजवळ जाऊन त्यांनी विचारपूस केली आणि आत्मविश्वास वाढवणारे मार्गदर्शन केले.

प्रज्ञाशोध तसेच शिष्यवृत्ती परीक्षेत उत्कृष्ट गुण मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा जिल्हा परिषदेच्या वतीने प्रशस्तीपत्र व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात येणार असल्याची माहितीही पवार यांनी यावेळी दिली. यामुळे विद्यार्थ्यांना अधिक चांगली कामगिरी करण्यासाठी प्रेरणा मिळणार आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी जिल्हा परिषदेचा हा उपक्रम महत्त्वाचा ठरत असून, विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षांसाठी सक्षम करण्याचा प्रयत्न यामधून दिसून येत आहे. शिक्षणाच्या गुणवत्तेत वाढ करून विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक युगात सक्षम बनविण्याच्या दिशेने हा एक सकारात्मक टप्पा मानला जात आहे. यावेळी शिक्षणाधिकारी कादर शेख, उपगटशिक्षणाधिकारी अविचल म हाडिक, विस्तार अधिकारी सुदर्शन राठोड, केंद्रप्रमुख जीवराज खोबरे, मुख्याध्यापक मोहन घोडके तसेच विश्वकृपा विद्या प्रतिष्ठानचे अमोल ढेपे आदी उपस्थित होते.

## ईद-उल-फित्रने रमजानच्या रोजाची सांगता



**तभा वृत्तसेवा**
**पिलीव दि २२ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव व झिंजेवस्ती येथील मुस्लिम समाजबांधवाच्या वतीने महिनाभर चाललेल्या रमजानच्या पवित्र अशा रोजाची सांगता २० मार्च रोजी चंद्र दर्शन झाल्याने २१ मार्च रोजी जामा मशीद पिलीव ट्रस्टच्या वतीने पिलीवच्या ईदगाह मैदानावर पिलीव व झिंजेवस्ती येथील मुस्लिम बांधवांच्या वतीने सामुदायिक नमाज अदा करून रमजानच्या रोजाच्या उपवासाची सांगता करण्यात आली

रमजान ईद निमित्त सर्व जाती-धर्माच्या समाज बांधवांनी जातीय सलोखा राखत एकमेकांच्या हातात हात व आलिंगन देऊन ईद निमित्त शुभेच्छा देण्यात आल्या तसेच ईद निमित्त एकमेकास शुभेच्छा देण्यात आला. रमजान ईद हा सण सर्व जाती-धर्माच्या एकतेचे ऐक्याचे सुलोख्याचे प्रतीक असलेला सण असून या सणानिमित्त गोरगरिबांना कपडे पैसे व अन्नदान अशा स्वरूपात दानधर्म करून सत्य आचरण करण्याचा संदेश देणारा हा पवित्र रमजान महिना असून या महिन्यातच इस्लाम धर्माचे संस्थापक मोहम्मद पैगंबर यांनी प्रकट केलेल्या कुराण ग्रंथाचे महत्त्व व त्यात सुचित केलेले आदर्श व मार्गदर्शक तत्वे नमाज पठनाच्या वेळेला मौलाना राजिब हुसेन यांनी संबोधित करताना व्यक्त केले यावेळी नमाज अदा करताना संयम, श्रद्धा आणि आत्मसूद्दीकरण संदेश देणाऱ्या पवित्र रमजान महिन्याची सांगता आनंदाने साजरी केली जात आहे. यावेळी मौलाना मुजमिल तांबोळी जामा मशिदी ट्रस्टचे अध्यक्ष महिबूब मुलाणी, सचिव नजीर मुलांणी, संचालक सलीम मुलाणी, अजिज मुलांणी, जाफर मुलाणी, हारून मुलांणी मार्गदर्शक आरिफ खान पठाण, सिकंदर मुजावर, मोहसीन शेख, कलीम तांबोळी, ताहीर मुलांणी, आमिनखान पठाण व मुस्लिम समाज तरुण कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी पोलीस निरीक्षक विकास दिंडोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पिलीव पोलीस दुरुक्षेत्राचे हवालदार पंडित मि साळ स्वरूपचंद शिंदे, धनाजी झगडे,इपाच होमगार्ड यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता .



## जैनवाडी जि.प. शाळेत येथे गुढीपाडवा पट वाढवा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २२ मार्च-**

तालुक्यातील जैनवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत गुढीपाडवा, पट वाढवा उपक्रम ाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रा.गणेश जमदाडे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच शोभा गोफणे ह्या होत्या.

गुढीपाडवा, पट वाढवा या अभियानांतर्गत पुढील शैक्षणिक वर्षात इयत्ता पहिलीत दाखल होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना वही, पेन, पेन्सिल व गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. शाळेचा माजी विद्यार्थी स्वस्तिक सागर खाणे हा नवोदय विद्यालयाच्या परीक्षेत पात्र झाल्याबद्दल त्याचा शाळेतर्फे सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविक मुख्याध्यापक महादेव जमदाडे यांनी केले.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रा.गणेश जमदाडे म्हणाले की, शालेय वयात विद्यार्थ्यांना मातृभाषेतून शिक्षण दिले गेले तर त्याचा पाया मजबूत होतो व मुलाच्या सर्वांगीण विकासात शाळा महत्त्वाची भूमिका पार पाडते. आपल्या मराठी शाळेतूनच शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी एमपीएससी सारख्या अवघड असणाऱ्या परीक्षेमध्ये यश मिळवून विविध प्रशासकीय पदावर सेवा बजावीत आहेत. कार्यक्रम ासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी दीपक पवार यांचे मार्गदर्शन लाभले. याप्रसंगी सरपंच शोभा गोफणे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रा. गणेश जमदाडे, उपसरपंच जालिंदर गोफणे, सुभाष पवार, सुहास गोफणे, बिभीषण पवार, अमोल शिंगटे, धनंजय बलदोडे, मुख्याध्यापक महादेव जमदाडे, दीपक कांबळे, सचिन शिंदे, उषा मुंडे, विजय पिसे, अंगणवाडी सेविका सविता कंबीरे, सुलभा लोखंडे, रितु सुतार, लक्ष्मी शिंगटे, लता माने उपस्थित होते.

## श्रीराम जन्मोत्सवानिमित्त सांगोल्यात विविध कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २२ मार्च-**

श्रीराम जन्मोत्सवानिमित्त सांगोल्यातील श्रीराम मंदिर येथे गुरुवार दि.१९ मार्च पासून विविध कार्यक्रमांना सुरुवात झाली असून विविध भजनी मंडळाचे भजन त्याचबरोबर शनिवारी चारुदत्त महाराज देशपांडे यांचे प्रवचन संपन्न झाले. आज सोमवार दि.२३ मार्च रोजी सायं.६ ते ८ वा.च्या दरम्यान गीत रामायणाचा कार्यक्रम होणार आहे. त्याचबरोबर मंगळवार दि.२४ मार्च रोजी सांगोला शहरातील महिलांचा विविध गुणदर्शन कार्यक्रम भारुड, नाट्य, नृत्य, भजन कार्यक्रम होणार आहे. बुधवार दि.२५ मार्च रोजी भजनी मंडळाचा कार्यक्रम होणार आहे. गुरुवार दि.२६ मार्च रोजी स.१० ते १२ वा.जन्मोत्सवाचे कीर्तन हभप.शुभांगी संतोष कवठेकर यांचे होणार असून दु.१२ वा. पुष्पवृष्टी व सायं.५ ते ८ वा. श्रींच्या पालखीची भव्य शोभायात्रा सांगोला शहरातून निघणार आहे. शुक्रवार दि.२७ मार्च रोजी दु.१२ ते २ वा.महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी भाविक भक्तांनी या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा असे आवाहन ड.सारंग वांगीकर, श्रीराम महिला भजनी मंडळ व नामसाधना मंडळ यांच्यावतीने करण्यात आले आहे.



## अर्ध्या चड्डीतला महान लोकनायक दादा कोंडके : सुहास उरवणे

**दादा कोंडके फॅन क्लब अकलूजवतीने सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न**

**तभा वृतसेवा**
**अकलूज दि. २२ मार्च-**

ग्रामीण भागातील अत्यंत सामान्य आणि गरीब कुटुंबातून आलेल्या व चित्रपटातून अर्ध्या चड्डी मध्ये भूमिका साकारत शाहीर दादा कोंडके या महान विभूतीने आपल्या कष्ट, जिद्द आणि अद्वितीय विनोदी शैलीच्या जोरावर मराठी चित्रपटसृष्टीत अढळ स्थान निर्माण केले. त्यांनी आपल्या चित्रपटांमधून केवळ मनोरंजनच केले नाही, तर त्यामध्ये सामाजिक संदेशही प्रभावीपणे मांडले. असे प्रतिपादन प्रसिद्ध निवेदक सुहास उरवणे यांनी केले.

स्माईल ९०.८ एफएम येथील प्रांगणात शाहीर दादा कोंडके यांच्या २८ व्या स्मृतिदिनानिमित्त दादा कोंडके फॅन क्लब, अकलूज आयोजित व स्माईल ९०.८ एफएम, भक्ती कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टिटयूट अकलूज, स्नेही मित्र मंडळ, मॉर्निंग ग्रुप, RVIP टूर्स अँड ट्रॅव्हल्स, गिरीजा ऑटोमोबाईल्स, प्रोफेशनल कूरिअर आणि मलबार हिल प्रस्तुत झाल्या. तिन्ही सांजा हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात दादांच्या प्रतिमा पूजनाने आणि दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी दादा कोंडके यांच्यावर चित्रित झालेले हे अंजनीच्या सुता डॉ. मंगेश शिंदे यांनी सादर केले. कार्यक्रमादरम्यान विधीतज्ञ भारत गोरवे यांनी जीवा शिवाची बैल जोड, आशा हेळकर-राजगुरू यांनी तुम ही मेरे मंदिर तुम ही मेरी पूजा, समाधान देशमुख यांनी चल रं वाघ्या, सोनाली पाटील यांनी झाल्या तिन्ही सांजा व बुगडी माझी सांडली गं ही सुश्राव्य गीते सादर केली. बाळासाहेब माने यांच्या मेंडोलीन वादनाचे. त्यांच्या सुरेल सादरीकरणाने उपस्थित रसिक मंत्रमुग्ध झाले.

याप्रसंगी प्रसिद्ध कवी जयंत बोबडे, साहित्यिक चंद्रशेखर गायकवाड, प्रकाश चोरमागे, सुवर्णा घोरपडे-गोरवे, वीरेंद्र पतकी, धनश्री उरणे-म्हेत्रस, अनिरुद्र शिंदे, समाधान देशमुख, अरुंधती हजारे, रूपाली पाटील या कवींनी काव्य संमेलनातून ग्रामीण जीवन, सामाजिक वास्तव आणि विनोद यांच्या संगमातून दादांच्या कार्याला अभिवादन केले. कार्यक्रम ादरम्यान दीपक एकतपुरे, स्माईल ९०.८ एफएमचे संस्थापक शंकर बागडे, गजानन जवंजाळ, अशोक एकतपुरे, सावळे या मान्यवरांनी आपल्या मनोगत व्यक्त केले. दादा कोंडके क्लबचे संस्थापक व दादांचे फॅन कांतीलाल एकतपुरे प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन सुहास उरवणे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता मराठा तितुका मेळवावा या चित्रपटातील अखेरचा तुला हा दंडवत हे भैवरीपर गीत डॉ. मंगेश शिंदे यांनी सादर केले.

## कवठेकर व द. ह. कवठेकर प्रशालेत पाचवी प्रवेशाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२२ मार्च -**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि शिस्तप्रिय शिक्षणासाठी ओळखल्या जाणाऱ्या पंढरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित कवठेकर व द.ह.कवठेकर प्रशालेत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी इयत्ता ५ वीच्या प्रवेश प्रक्रियेचा अत्यंत उत्साहात शुभारंभ करण्यात आला. पहिल्याच दिवशी पालकांनी आपल्या पाल्यांच्या प्रवेशासाठी शाळेत प्रचंड गर्दी करत उदंड प्रतिसादात प्रवेशअर्ज मागून घेतले.



कार्यक्रमाचा प्रारंभ कवठेकर प्रशालेचे मुख्याध्यापक व्ही.वाय. पाटील व द. ह.कवठेकर प्रशालेचे मुख्याध्यापक व्ही.एम.कुलकर्णी यांच्या प्रास्ताविकाने झाला. त्यांनी आपल्या मनोगतामध्ये प्रशालेमध्ये विद्यार्थ्यांप्रती सुरू असलेल्या विविध उपक्रमांची उपस्थित पालकांना माहिती दिली. त्यानंतर पंढरपूर एज्युकेशन सोसायटीचे मानद सचिव सु.र. पटवर्धन व प्रशालेचे मुख्याध्यापक व्ही.वाय.पाटील यांच्या हस्ते प्रवेश अर्जाच्या वितरणाचा प्रारंभ करण्यात आला. यावेळी त्यांनी शालेय परंपरेचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणे व त्यांचा सर्वांगीण विकास हेच आमचे मुख्य उद्दिष्ट आहे.

या प्रसंगी प्रशालेचे मुख्याध्यापक व्ही.वाय.पाटील, उपमुख्याध्यापिका सौ. विश्वासे, पर्यवेक्षक श्री.गडदे,श्री.शेलार व आर.एस. कुलकर्णी आणि इतर ज्येष्ठ सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन करून प्रवेश प्रक्रियेचा श्रीगणेशा करण्यात आला.

**पालकांचा विश्वास आणि उत्साह**

शाळेचा लौकिक, अनुभवी शिक्षक आणि अद्ययावत शैक्षणिक सुविधांमुळे दरवर्षीप्रमाणे यंदाही प्रवेशासाठी पालकांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळाल्या. आमच्या पाल्याच्या भविष्यासाठी कवठेकर प्रशालेपेक्षा उत्तम पर्याय नाही, अशा भावना अनेक पालकांनी यावेळी व्यक्त केल्या. प्रवेशासाठी आलेल्या प्रत्येक पालकाचे आणि विद्यार्थ्याचे शिक्षकांमार्फत योग्य मार्गदर्शन करण्यात आले. गर्दी असूनही मुख्याध्यापक व्ही.वाय. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकांनी शिस्त आणि नियोजनबद्ध व अत्यंत सुयोग्य पद्धतीने नियोजन केले होते. शहरासह ग्रामीण भागातील पालकांनीही या प्रवेश प्रक्रियेत सहभाग नोंदवला. यावेळी प्रशालेतील ज्येष्ठ शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रवेशासाठी आलेल्या पालकांना फॉर्म वाटप आणि इतर तांत्रिक बाबींमध्ये सहकार्य केले. पालकांच्या या उदंड प्रतिसादामुळे प्रशालेच्या शैक्षणिक गुणवत्तेवर व कार्यक्षमतेवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## थोडक्यात...



### वराह अवतार...

पूर्व विभाग श्रीराम मंदिरच्या वतीने श्रीराम नवमीनिमित्त रविवारी प्रभु श्रीरामास वराह अवताराने अलंकृत करण्यात आले होते.

### 'निवडक स्त्री आत्मकथने : सामाजिक सत्त्व व स्वत्व शोध' या ग्रंथास पुरस्कार

**सोलापूर, दि, २२ मार्च-**

मातोश्री स्व.सूर्यकांतादेवी रामचंद्रजी पोटे ट्रस्ट-अमरावती यांच्यावतीने दिल्या जाणाऱ्या २०२५ च्या उत्कृष्ट वाङ्मय निर्मिती राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहायक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे यांच्या 'निवडक स्त्री आत्मकथने : सामाजिक सत्त्व व स्वत्व शोध' या ग्रंथास हा पुरस्कार जाहीर झाला. तीन हजार रुपये रोख, शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे. सदर पुरस्कारांचे वितरण अमरावती येथे दि. ३० मार्च २०२६ रोजी वितरण करण्यात आहे, असे आमदार प्रवीण पोटे यांनी सांगितले. यावेळी श्रेयस पोटे, प्राचार्य डॉ.शोभा रोकडे, प्राचार्य डॉ.अनुप्रिता देशमुख, प्रा.डॉ.कुमार बोबडे, प्रा.डॉ.पंकज वानखडे, विशाल मोहोड, संदीप देशमुख उपस्थित होते.



### प्रा.डॉ. राहुल पालके यांचे गेट परीक्षेत यश

**बार्शी, दि.२२ मार्च-**

येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील प्रा.डॉ.राहुल भगवान पालके यांनी गेट अर्थात ग्रॅज्युएट ॲप्टिट्यूट टेस्ट इन इंजिनिअरिंगच्या परीक्षेत यश संपादन केले. ह्यूमॅनिटीज ॲन्ड सोशल सायन्सेस विभागातील इंग्लिश या विषयात त्यांनी ४०.६७ गुण मिळवत अखिल भारतीय स्तरावर १२३३ वा क्रमांक पटकावला आहे. राहुल पालके यांनी विविध स्पर्धा परीक्षा आणि अभ्यासक्रमांमध्ये २० वेळा ८ वेगवेगळ्या विषयांत उत्तीर्ण होण्याचा अनोखा विक्रम प्रस्थापित केला आहे. श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ.बी.वाय.यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी.टी. पाटील, सहसचिव ए.पी. देबडवार, खजिनदार बापूसाहेब शितोळे, प्राचार्य डॉ.ए.बी शेख, डॉ.समाधान पवार आदींनी त्यांचे अभिनंदन केले.



### बनावट कुलमुखत्यारपत्र तयार करुन केली फसवणूक

**सोलापूर, दि.२२ मार्च-**

संगनमताने कट रचून दि.२६ फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी दरम्यान कल्याण बाबर (रा.वडशिंगे, ता. माढा), अजय अर्जुन बागल (रा. बासरी, ता.माढा), रविराज सुरेश लेंगरे (रा.लेंगरे वस्ती, कुर्डुवाडी), तानाजी रघुनाथ लेंगरे (रा.कुर्डूवाडी), दयानंद शिवशंकर स्वामी (रा. बार्शी) यांनी अनुपमा निलेश पकाले (वय-४९, रा.फ्लॅट नंबर १८, मंगल टेरेस, जुळे सोलापूर) यांचे पती निलेश पकाले व मयत सासरे वीरभद्र पकाले यांचे बनावट कुलमुखत्यारपत्र तयार करून वडशिंगे गट क्रमांक ५५१/४ व गट क्रमांक ५७३ यामधील एकूण १०.५ एक शेत जमीन दुय्यम निबंधक यांचे दस्त क्रमांक सपउ-३, १६८१/२०२६ अन्वये २६ फेब्रुवारी व १७२८/२०२६ अन्वये विक्री करुन अनुपमा पकाले यांची फसवणूक केली. याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात दि.२१ मार्च रोजी त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.




# विषारी पाणी प्यायल्याने ४० शेळ्यांचा मृत्यू

### दोन कष्टकरी महिलांचे संसार आले उघड्यावर

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.२२ मार्च-**

विहिरीतील विषारी पाणी प्यायल्याने ३० मोठ्या व १० लहान असे एकूण ४० शेळ्यांचा मृत्यू झाल्याची घटना बार्शी तालुक्यातील रुई येथे घडली. या घटनेमुळे सुशाला दत्तात्रय जगताप आणि मालन चंद्रकांत राऊत या दोन महिलांचे संसार उघड्यावर आले आहे.

**पाणी विषारी झाले कसे?**

विहिरीतील पाणी विषारी झाले कसे? याबाबत चर्चांना उधाण आले आहे. पालकमंत्री जयकुमार गोर यांनी या प्रकरणात लक्ष घालून, या गरीब कुटुंबांना शासनाकडून आर्थिक मदत मिळवून द्यावी, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थ, शेतकरी संघटनांकडून केली जात आहे.

बचत गटाच्या माध्यमातून कर्ज काढून त्या दोघी शेळीपालनाचा व्यवसाय सुरु केला होता. रविवार, दि.२२ मार्च २०२६ रोजी दुपारच्या सुमारास त्या आपल्या शेळ्या चरावयास नेल्या होत्या. तेथील एका विहिरीतील पाणी प्यायल्याने ४० शेळ्या जागीच गतप्राण झाले. गौडगाव येथील पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.प्रशांत देशमुख, डॉ.केदार यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मृत जनावरांचा पंचनामा करून त्यांचे शवविच्छेदन केले. मृत्युचे नेमकं कारण समजण्यासाठी नमुने प्रयोगशाळेत पाठविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले

पाणी प्यायल्याने झालेला शेळयांचा मृत्यू तांत्रिकदृष्ट्या नैसर्गिक आपत्तीच्या निकषात बसतो का? हे तपासावे लागेल. याबाबतची माहिती जिल्हा स्तरावर पाठविण्यात येणार आहे, असे पशुसंवर्धन विभागाचे विस्तार अधिकारी डॉ.महेंद्र कोळेकर यांनी सांगितले.

आम्ही मोठ्या आशेने कर्ज काढून शेळीपालनाचा व्यवसाय सुरु केला होता. आता कर्ज कसे फेडायचे आणि संसाराचा गाडा कसा ओढायचा? असा काळजाला पिळ पाडणारा प्रश्न या पीडित महिलांनी विचारला आहे.

## चिमण्यांसाठी सोलापूरात कृत्रिम घरटी कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ मार्च-**

जागतिक चिमणी दिन, वन दिन, जल दिन आणि हवामान दिन यांच्या संयुक्त निमित्ताने रविवारी सोलापुरात पर्यावरणीय मार्गदर्शन शिबीर व चिमण्यांसाठी कृत्रिम घरटी कार्यशाळा पार पडली.

सोलापूर प्रादेशिक वनविभाग, सामाजिक वनीकरण विभाग, सोलापूर महानगरपालिका, माझी वसुंधरा अभियान, वाइल्डलाईफ कॉन्झर्वेशन असोसिएशन यांच्यावतीने उपक्रम राबविण्यात आला.

वाढत्या शहरीकरणामुळे चिमण्यांचा अधिवास धोक्यात येत असताना, त्यांना पुन्हा आपल्या अंगणात बोलावण्यासाठी कृत्रिम घरटी कशी तयार करावीत, याचे प्रात्यक्षिक यावेळी देण्यात आले.

याप्रसंगी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, रोहितकुमार गांगर्डे आणि उद्यान अधीक्षक स्वप्नील सोलनकर, ज्येष्ठ पर्यावरण अभ्यासक निनाद शहा, सिद्राम पुराणिक, मुकुंद शेटे उपस्थित होते.




## 'मानधन'साठी वृध्द कलावंतांची होतेय ससेहोलपाट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ मार्च-**

गेल्या चार वर्षांपासून वृध्द कलावंतांचे मानधन रखडले आहे. निवड समितीचीही बैठक झाली नाही. जिल्ह्यातील अकरा पंचायत समितींमार्फत वृध्द कलावंतांचे अर्ज मागवले जातात. मात्र त्यांना मिळत काहीच नाही. त्यामुळे 'मानधन'साठी वृध्द कलावंतांची ससेहोलपाट होत आहे, असे राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्याकडे देण्यात आलेल्या एका निवेदनात म्हटले आहे.

मानधन मिळविण्याकरिता कलाकारांनी शासनाच्या साईटवर ऑनलाईन अर्ज करावेत, असे सांगितले जाते. मात्र गेल्या अनेक महिन्यापासून ही साईटच बंद आहे. ऑफलाईन अर्ज घेतले जात नाहीत. त्यामुळे वृध्द कलावंत दुहेरी संकटात सापडले आहेत, असेही या निवेदनात म्हटले आहे. मोहोळ तालुक्यातील शिरापूर (सो) येथील कलावंत बाळासाहेब रामचंद्र हारदाडे यांनी हे निवेदन दिले.



## आयटीआयमध्ये जलदिनाविषयी जनजागृती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ मार्च-**

जागतिक जलदिनाचे औचित्य साधून आयटीआय अर्थात महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व ड्रीम फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी जिल्हा कृषी अधीक्षक शुक्राचार्य भोसले, संस्थेचे प्राचार्य मनोज बिडकर, गटनिदेशक सिद्राम गोलेकर, अशोक मिरगणे, ड्रीम फाउंडेशनचे संस्थापक काशिनाथ भतगुणकी यांची उपस्थिती होती.

जिल्हा कृषी अधीक्षक शुक्राचार्य भोसले यांनी पाण्याचे वाढते महत्त्व अधोरेखित करत भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी प्रत्येकाने पाण्याचा काटकसरीने व जबाबदारीपूर्वक वापर करण्याचे आवाहन केले.

'जलसाक्षरता' व 'जलदिंडी' अभियानात सक्रिय सहभाग घेतलेल्या व्यक्तींना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच उपस्थित सर्व प्रशिक्षणार्थी व कर्मचाऱ्यांना जलसंवर्धनाची प्रतिज्ञा देण्यात आली.

## जुन्या वादाबाबत बोलत असताना मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ मार्च-**

शुभम अनिल हिंगमिरे (वय-२६, रा.७५/२४ मानवी नगर, भवानी पेठ, सोलापूर) हा चौपाड येथून राहत्या घरी जात असताना कुंभार वाडा, उत्तर कसबा, सोलापूर येथे ओळखीचा धनराज हिरेमठ हा भेटल्यानंतर जुन्या वादाबाबत बोलत असताना तेथे महांतेश हिरेमठ हा येऊन रस्त्यावर पडलेला दगड उचलून शुभम हिंगमिरे यांच्या डोक्यात मारले. याबाबत दि. २१ मार्च रोजी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

**गाडीला कट मारण्याच्या कारणावरून मारहाण**

गाडीला कट मारण्याच्या कारणावरुन कर्णिक नगर परिसरातील यल्लालिंग मठाजवळ आकाश रवी दयावानपल्ली (वय-२१, रा.प्लॉट नंबर ४२९/२ नवीन विडी घरकुल, कुंभारी, सोलापूर) यांना श्रेयस गाडगे, साहिल काटे, नील अवसारे, प्रज्वल साळुंखे यांनी हाताने, लाथाबुक्क्याने मारहाण केली. याबाबत दि. २१ मार्च रोजी एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.



## मुस्लिम बांधवांनी बाशी खुतबाचा आनंद लुटला

### दर्गाह, बागबगीचे, कंबर तलाव परिसरात गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ मार्च-**

रमजान ईदनंतर दुसऱ्या दिवशी साजरी केली जाणारी बाशी खुतबा सोलापूर शहरात अत्यंत उत्साह, आनंद आणि बंधुभावाच्या वातावरणात रविवारी पार पडली. शहरातील प्रमुख बाग-बगीचे, दर्गे, कबर तलाव परिसरात मुस्लिम बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावत सणाचा आनंद लुटला.

सकाळी १० नंतर नागरिकांनी कुटुंबीयांसह घराबाहेर पडत विविध ठिकाणी जाण्यास सुरुवात केली होती. लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वच जण नव्या आकर्षक पोशाखात सजलेले दिसत होते. विशेषतः बालकांमध्ये या दिवसाबाबत प्रचंड उत्साह पाहायला मिळाला.

कंबर तलाव परिसर हा या दिवशी प्रमुख आकर्षण ठरला. येथे सकाळपासून सायंकाळपर्यंत नागरिकांची सतत ये-जा सुरू होती. कुटुंबीयांनी तलावाच्या परिसरात एकत्र बसून गप्पा, हास्यविनोद करत सणाचा आनंद द्विगुणित केला. आठवणी टिपण्यासाठी छायाचित्रणाचा आनंदही घेतला.बाशी ईदच्या निमित्ताने खाद्यसंस्कृतीचाही खास रंग पाहायला मिळाला. प्रत्येक कुटुंब आपल्या घरातून पारंपरिक पदार्थ घेऊन आले होते. शीरखुर्मा, गुलगुले, भजी, पकोडे, तसेच विविध गोड व तिखट पदार्थांचा आस्वाद घेत सर्वांनी एकत्रितपणे भोजनाचा आनंद घेतला. 'एकत्र खाणे, एकत्र हसणे' ही परंपरा या दिवशी विशेषत्वाने अधोरेखित झाली.

# महिलांवर आली स्टोव्ह शोधण्याची वेळ

### बदलत्या जीवनशैलीत कितपत उपयोगी?

### प्रशासन, दुकानदारांमध्ये संभ्रमावस्था

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मार्च-**

इंधन टंचाईच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने रेशन दुकानांतून रॉकेल वितरणाचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे महिलांवर अडगळीत पडलेले स्टोव्ह शोधण्याची वेळ आल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, बदललेल्या जीवनशैलीत आणि एलपीजीवर अवलंबून असलेल्या शहरी कुटुंबांसाठी शासनाचा हा निर्णय कितपत उपयोगी ठरणार? याबाबत शंका उपस्थित होत आहे.

रॉकेल पुरवठासंदर्भात शासनाकडून राज्यभरातील शिधापत्रिकाधारक व परवानाधारकांची संख्या, परवान्याचे नूतनीकरण, नवे अर्ज आदींविषयीची माहिती मागविण्यात आली आहे. मात्र, हे रॉकेल देण्यासाठी सर्वच दुकानदारांना द्यायचे की, केवळ परवानाधारकांना द्यायचे, अंत्योदय आणि प्राधान्य योजनेतील शिधापत्रिकाधारकांनाच द्यावे यावरुन प्रशासन आणि दुकानदारांमध्ये संभ्रमावस्था आहे.

राज्यात २००५ पासून शिधापत्रिकांवरील रॉकेलच्या वितरणात घट करण्यास सुरुवात झाली. सन २०१५ पासून अनेक जिल्ह्यात रॉकेलचे वितरण पूर्णपणे बंद करण्यात आले. सध्याच्या युध्दजन्य परिस्थितीचा विचार करून राज्य सरकारने पुन्हा एकदा रॉकेलचे वितरण सुरू करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी राज्यात ३ हजार ७४४ किलो लिटर अर्थात ३७ लाख ४४ हजार लिटर रॉकेलचे वितरण करण्यात येणार आहे.



**घराघरात वाढणार धूर**

एकेकाळी स्वयंपाकासाठी रॉकेल हा प्रमुख पर्याय होता. मात्र गेल्या दशकभरात बहुतांश घरांमध्ये एलपीजी गॅसचा वापर वाढला आहे. नवीन पिढीकडे स्टोव्हच उपलब्ध नाहीत. स्टोव्हमुळे घराघरात धुरही तितक्याच प्रमाणात वाढणार असल्याचे महिला वर्गातून सांगण्यात येते.

**रेशन दुकानदारांना अतिरिक्त उत्पन्न**

शासनाच्या या निर्णयामुळे रेशन दुकानदारांना नवीन व्यवसायाची संधी मिळणार असून, अतिरिक्त उत्पन्नही मिळणार आहे. दरम्यान, रॉकेल मिळाल्यावर नागरिकांसमोर स्टोव्हची अनुपलब्धता, स्टोव्ह खरेदी/दुरुस्तीचा अतिरिक्त खर्च यांसारखे प्रश्न भेडसावणार असल्याचेही सांगण्यात येते.

## भटक्या जमातीच्या प्रश्नांसंदर्भात २९ रोजी बहुजन मेळाव्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२२ मार्च-**

भटक्या विमुक्त जातीची परिस्थिती अतिशय हलाखीची असून त्यांना राजकीय व सामाजिक दृष्ट्या एकत्र आणण्याची गरज आहे. यासाठी पंढरपूर येथे दि.२९ मार्च रोजी बहुजन परिवार संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जय मल्हार क्रांती संघटनेचे राज्य अध्यक्ष अंकुश जाधव यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली.

रेल्वे स्थानकाजवळील बिर्ला हाऊस रविवारी सकाळी ११ वाजता सदर मेळावा होणार आहे. भटक्या विमुक्त समाजातील रामोशी, होलार, बेरड, नंदीवाले, वैदू, वडार, कोल्हाटी, गारूडी आदी ४२ जातीचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

राज्यात भटक्या विमुक्त जमातीची लोकसंख्या अडीच ते तीन कोटी असून सर्व समाज एकसंघ नसल्याने अनेक राजकीय व सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत. या बहुजन समाजाला आपल्या मागण्या मांडण्यासाठी हक्काचे व्यासपीठ तयार करणे हे मेळाव्याचे प्रमुख कारण आहे, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी जिल्हाध्यक्ष सुनील जाधव, सागर जाधव, बापूसाहेब जाधव, आदिनाथ खराडे, बाळासाहेब चव्हाण, मोहन घाडगे, सचिन माने, गणेश शिरतोडे, राहुल मदने, मल्हारी शिंदे, महेंद्र चव्हाण, संतोष काळे, सुधीर नाईक आदी उपस्थित होते.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व
बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## मजविप' च्या वतीने पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ मार्च :** मराठवाडा जनता विकास परिषदेच्या वतीने लातूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचा सत्कार करण्यात आला. लातूर येथील जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय येथे हा सत्कार करण्यात आला. यावेळी मराठवाडा जनता विकास परिषदेचे जिल्हाध्यक्ष शिवाजी नरहिरे यांनीशाल, पुष्पगुच्छ देऊन तर सचिव पांडुरंग देडे यांनी त्यांचा गौरवग्रंथ 'संघर्यात्री' हे पुस्तक भेट देऊन सत्कार केला. मराठवाडा जनता विकास परिषद लातूरच्या वतीने लातूर जिल्ह्यातील पोलीस वेल्फेअर व पोलिस निवास हाउसिंग प्रकल्पावर यावेळी चर्चा झाली. नवीन पोलीस स्टेशन व पोलिस स्टेशन बांधकाम प्रलंबित प्रकल्प याची माहिती घेतली या बजेटमध्ये लातूर जिल्ह्यातील पोलिस प्रकल्पाला किती निधी प्राप्त झाला आहे त्यावर चर्चा झाली. मराठवाडा जनता विकास परिषद. या प्रसंगी मराठवाडा जनता विकास परिषदेचे जिल्हाध्यक्ष शिवाजी नरहिरे, सचिव पांडुरंग देडे आदींची उपस्थित होते..





# शिक्षक हे मुलांवर सर्वात जास्त प्रभाव टाकणारे व्यक्तिमत्व : डॉ. भूषण शुक्ल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ मार्च :** सध्यस्थितीत मुले पालकांपेक्षा शिक्षकांसोबत जास्त वेळ असतात. त्यामुळे शिक्षकांकडून जी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजवली जातात त्यांचा त्यांच्या जडणघडणीवर खूप मोठा प्रभाव पडत असतो. कारण शिक्षक हे मुलांवर सर्वात जास्त प्रभाव टाकणारे व्यक्तिमत्व असते, असे प्रतिपादन पुण्याचे ख्यातनाम बालमानसोपचार तज्ज्ञ डॉ. भूषण शुक्ल यांनी केले.

सावली सेंटर फॉर मेंटल हेल्थ अँड रिसर्च हॉप्सिताल व मानसिक आरोग्याच्या क्षेत्रात काम करणारी सेवाभावी संस्था सोसायटी फॉर वेलबेईंग अवेअरनेस अँड रिहॅबिलिटेशन (स्वर) लातूरच्या वतीने येथील श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या कस्तुर-कंचन सभागृहामध्ये लातुरातील विविध शाळांमधील शिक्षकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या 'विद्यार्थ्यांची मानसिकता- शिक्षकांना काय माहिती असायला हवे' या विषयावरील कार्यशाळेत डॉ. शुक्ल मार्गदर्शन करत होते.





कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. अनिल जायभाय हे होते. यावेळी अभिनव मानव विकास संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर, डॉ. दिनेश पाटील, डॉ. मुग्धा पोतदार आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. आजच्या स्पर्धेच्या युगात बदललेली मूल्यव्यवस्था, सामाजिक वातावरण, बदललेल्या पालकत्वाच्या संकल्पना, जागतिकीकरण, सोशल मिडिया व तंत्रज्ञानाचा वाढलेला वापर अशा अनेक कारणांमुळे शालेय विद्यार्थ्यांसमोरील मनोसामाजिक आव्हाने व समस्या वाढत चालल्या आहेत. या आव्हाने व समस्यांचा सामना विद्यार्थ्यांसोबत काम करणाऱ्या शिक्षकांनाही करावा लागतो. विद्यार्थ्यांच्या मानसिक जडणघडणीत शिक्षकांची भूमिका महत्वाची असते. त्यामुळे आजच्या जगातील विद्यार्थ्यांची मानसिकता समजून घेणे अत्यावश्यक असल्याने सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेत डॉ. भूषण शुक्ल यांनी लातूर मधील विविध शाळांच्या प्रतिनिधी शिक्षकांशी संवाद साधला. शिक्षकांनी स्वतःला अजिबात कमी लेखू नये. आपले काम काम करीत असताना शिक्षकांनी आपल्यातील आत्मविश्वास, आपली देहबोली यावर विशेष लक्ष द्यायला हवे असे त्यांनी सांगितले. कारण या गोष्टी मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी आणि शिक्षक मुलांना जे शिकवित असतात ते त्यांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी अत्यंत आवश्यक असतात. शाळेत येणार प्रत्येक मूल हे त्याचे अनेक विषयांबद्दलचे विचार व भावना घेऊन वर्गात येत असते. त्यामुळे शिक्षकांना त्याची जाण असणे, त्याच्या भावनांना समजून उत्तेजित मनाला शांत करता आले तरच त्याला शिकवलेल्या गोष्टी त्याच्यापर्यंत योग्य पद्धतीने पोहोचू शकतात. विद्यार्थ्यांच्या सकारात्मक जडणघडणीमध्ये योगदान देत असताना त्यातून आपण राष्ट्र उभारणीचे कार्य हे खरोखरच करीत असतो याची जाण प्रत्येक शिक्षकाने ठेवायला हवी. तसेच शिक्षकांनी स्वतःला आपण एक महत्त्वपूर्ण काम करीत आहोत, हे बजावायला हवे असे डॉ. शुक्ल म्हणाले. विद्यार्थ्यांचा मेंदू कोणत्या पद्धतीने काम करतो, याचे शास्त्रीय विश्र्लेषण करीत आपल्याला त्याच्यापर्यंत आपले विचार आणि आपला विषय पोहोचवण्यासाठी कशा पद्धतीने वागायला व बोलायला हवे याबद्दल त्यांनी शिक्षकांना विविध क्लुप्त्या सांगितल्या.

सत्राच्या शेवटी शिक्षकांच्या विविध प्रश्र्नांची डॉ. भूषण शुक्ल यांनी समर्पक उत्तरे दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मिलिंद पोतदार यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी या कार्यशाळेच्या आयोजनामागची भूमिका सविस्तरपणे विशद केली. या कार्यक्रमात विविध शाळातील जवळपास १८० शिक्षकांनी सहभाग नोंदवला.

## संत गोरोबा सोसायटी महिल मंडळाकडून स्वामी समर्थ महाराजांची आरती व अन्नदान



**लातूर :** राज्याचे माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त लातुर शहरातील संत गोरोबा सोसायटी महिला मंडळाच्या वतीने श्री स्वामी समर्थ महाराजांची विधिवत पूजन करण्यात आले. तसेच यावेळी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांना निरोगी दीर्घायुष्य,यशस्वी राजकीय कारकीर्द आणि अखंड जनसेवा त्यांच्या हस्ते घडत राहो अशी श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या चरणी मनोभावे प्रार्थना करण्यात आली. दरम्यान या पवित्र प्रसंगी परिसरातील बाल गोपाळ, महिला भगिनी,नागरीक यांच्या समवेत अन्नदान उपक्रम राबवत आमदार अमित देशमुख यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात आणि आनंददायी वातावरणात साजरा करत अभिष्टचिंतन्यात आले.

## कॉईल नगरमधील रस्त्याची दुरवस्था

**लातूर :** शहरातील कॉईल नगर भागातील मुख्य रस्त्यावरील पेव्हर ब्लॉक उघडल्याने दुरवस्था झाली असून, या रस्त्यावरुन वाहनधारकांना जाताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. रस्त्याच्या मधोमध खोदून रस्ता तसाच बुजविण्यात आला आहे. या रस्त्याच्या कडेला पार्किंग असल्याने दुचाकी वाहनांना खोदलेल्या रस्त्यावरुन जावे लागत आहे. त्यामुळे वाहने असंतुलित होऊन घसरून पडत आहेत. पावसाळा सुरू होण्यापूर्वी या रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी होत आहे.

## महामार्गावरील पथदिवे बंद

**लातूर :** शहरातील बाभळगाव नाका ते बाभळगाव या मुख्य महामार्गावर पथदिवे बंद असल्याने वाहनधारक आणि पादचाऱ्यांना जीवघेण्या प्रवासाला सामोरे जावे लागत आहे. बाभळगाव नाका, म्हाडा कॉलनी, आरटीओ ऑफिस, पोलिस ट्रेनिंग सेंटरपर्यंत रात्रीच्या वेळी रस्त्यावर दिवे नसल्यामुळे धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. रस्त्यावरील पथदिवे बंद असल्यामुळे अंधारात अनेक ठिकाणी 'यू-टर्न' घेताना चालकांचा अंदाज चुकत आहे.

## दुचाकी लंपास; अज्ञातावर गुन्हा

**लातूर :** औसा तालुक्यातील मलगा येथे घरासमोर उभी केलेली होंडा युनिकॉर्न (एमएच २४ सीई ६७३३) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. फिर्यादी अभिषेक बालाजी पवार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ११ मार्चच्या रात्री ही चोरी झाली. साधारण १,४०,००० रुपये किमतीची ही दुचाकी चोरट्याने पळवून नेली असून, किल्लारी पोलिस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिस हवालदार साळुंखे या प्रकरणाचा अधिक तपास करीत आहेत.

## सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे ४१ वे वार्षिक अधिवेशनाचे होणार उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ मार्च :** वडवळ ना.येथील अमर ज्योती ग्रंथालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघ आणि अमरज्योती ग्रंथालय वडवळ ना.च्या संयुक्त विद्यमाने,जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे ४१ वे वार्षिक अधिवेशन शनिवार,दि.२८ मार्च २०२६ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळात ग्रंथदिंडी,उद्घाटन समारंभ,पुरस्कार वितरण परिसंवाद,खुलीचर्चा,ठराव वाचन आदि कार्यक्रमांनी तीन सत्रांमध्ये,वटसिध्दनागनाथ मंदिर,वडवळ ना.येथे आयोजित करण्यात आले असून,त्याचे उद्घाटन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते होणार आहे,अशी माहिती अमर ज्योती ग्रंथालयाचे अध्यक्ष तथा अधिवेशन स्वागताध्यक्ष वैजनाथअप्पा नंदागवळे यांनी दिली.



जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाच्या अधिवेशनाचा एक भाग म्हणून सकाळी ८ वाजता आयोजित ग्रंथ दिंडीचे पूजन विश्वासराव पाटील,गंगाधरअप्पा कल्याणे,राम मोतीपवळे,अशोकराव खोडवे यांच्या हस्ते होणार आहे.त्यानंतर ग्रंथदिंडीप्रमुख संतोष आचवले,माणिकराव हालिंगे,सुरेश राजोळे व आनंद कापसे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही गंरथदिंडी ग्रंथालय ते वटसिध्द नागनाथ मंदिरापर्यंत काढण्यात येणारआहे.

सकाळी ११ वाजता या अधिवेशनाचे उद्घाटन राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते,महराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ.गजानन कोटेवार यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या वेळी विशेष अतिथी म्हणून जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, ज्येष्ठ साहित्यिक विचारवंत डॉ.नागोराव कुंभार आणि राज्याचे ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांची उपस्थिती लाभणार आहे.तर प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे,जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर देशमुख,राज्य ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष गुलाबराव पाटील,कोषाध्यक्ष भिमराव पाटील,माजी अध्यक्ष प्राचार्य डॉ. रामेश्वर पवार,मराठवाडा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष खंडेराव सरनाईक,कार्याध्यक्ष प्रभाकर कापसे,प्रमुख कार्यवाह राम मेकले,जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष डॉ. ब्रिजमोहन झंवर, उपाध्यक्ष युवराज जाधव यांची उपस्थिती राहील.

यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते रवींद्र कालेकर यांना कै.ॲड. त्र्यंबकदास झंवर आदर्श ग्रंथालय कार्यकर्ता राज्यस्तरीय पुरस्कार,जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे माजी अध्यक्ष हावगीराव बेरकीळे यांना जीवन गौरव पुरस्कार,किनगावच्या स्वामी विवेकानंद वाचनालयाचे अशोक मुंढे यांना कै.मारोती चिरके आदर्श ग्रंथपाल जिल्हास्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून, शासनाचा ग्रंथमित्र पुरस्कार प्राप्त धनंजय पवार व सूर्यकांत जाधव यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

दुपारी २ वाजता कर्मचारी समस्या व उपाय या विषयावर किरण बोबळसुरे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या दुसऱ्या सत्रात जहांगीर सय्यद व शादुल शेख हे विचार मांडणार आहेत. दुपारी ३ वाजता खुली चर्चा,ठराव वाचन व अधिवेशन समारोप सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे यांच्या अध्यक्षतेखाली होईल.यावेळी जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर याचे प्रमुख मार्गदर्शन होणार आहे.विठ्ठल कटके हे ठरावाचे वाचन करतील.

तरी या अधिवेशनाला ग्रंथालय पदाधिकारी,कर्मचारी व साहित्य प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अमरज्योती ग्रंथालयाचे सचिव वसंत बेरकीळे,उपाध्यक्ष विश्वनाथ भेटे,सहसचिव शिवाजी कल्याणे,कोषाध्यक्ष दिगंबर भेंडे,संचालक विश्वासराव पाटील,सिद्रामप्पा आचवले, संभाजी बेरुळे,मनिषा महाजन,सुवासिनी यमपल्ले,सेवक दत्ता कांबळे, जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे सहकार्यवाह काशीनाथ बोडके,संचालक सूर्यकांत शिरसे,गुप्तलिंग स्वामी,नंदकुमार घोगरे,अनिल पाटील,बाळकृष्ण होळीकर,श्रीधर स्वामी, काशीनाथ साहू,तुकाराम सुगावकर,बालाजी सुर्यवंशी,गोकर्णा जाधव, राजकुमार सोनी,नागनाथ बिरादार,रामचंद्र तिरुके, डॉ.अमित म्हेत्रे व संयोजन समितीचे वैभव पाटील,दयानंद पाटील,दिगंबर भेंडे,संभाजी बेरुळे,ज्ञानेश्वर बेरकीळे,गंगाधर यवंदगे,मुरलीधर सोनकांबळे,बालाजी गंदगे, उमाकांत आचवले,सांगर नवणे, विवेकानंद पाटील,नागनाथ बेंडके,उमाकांत लव्हराळे, माहदेव भेटे, गंगाधर कल्याणे,भरतसिंह ठाकूर,संभाजी रेकुळगे,धनश्री मॅडम,मीना देवकते,प्रकाश बेरुळे,विश्वनाथ बेंडके,काशिनाथ रेड्डी,श्रीधर बेरकीळे,सतीष सांगवे,महादेव खिचडे इत्यादींनी केले आहे.

## जिल्हा स्तरीय बचत गट विक्री व प्रदर्शन हिरकणी हाट चे उद्घाटन उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ मार्च :** जिल्हा स्तरीय बचत गटांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या हिरकणी हाट या विक्री व प्रदर्शनाचे उद्घाटन लातूर जिल्हा परिषद अध्यक्षा उषाताई पाटील याच्या हस्ते मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमास प्रमुख मान्यवर म्हणून जिल्हा परिषद उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, राज्य कृषी मूल्य अध्यक्ष पाशा पटेल तसेच जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सभापती,उपसभापती ,पंचायत समिती सदस्य जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, प्रकल्प संचालक संजय इंगळे , जिल्हा अभियान व्यवस्थापक देवकुमार कांबळे तसेच जिल्हा परिषद विविध विभागाचे विभाग प्रमुख यांची उपस्थिती लाभली.

प्रसंगी जिल्हा परिषद उपाध्यक्ष यांनी उमेदच्या या हिरकणी हाट उपक्रमाचे कौतुक करून महिलाना प्रोत्साहित करूण विक्रीसाठी शुभेछ्या दिल्या.

गावाखेड्यातून आलेल्या या गटाच्या ताईंनी प्रामाणिकपणे आपल्या जिद्दीने तयार केलेले विविध पदार्थ हे नक्कीच नाविन्यपूर्ण असून ते ग्राहकांचे लक्ष वेधून घेणारे आहेत या बचत गटाच्या यशाच्या उत्सवाला सर्व लातूरकरांनी भरभरून प्रतिसाद द्यावा असे आवाहन करून स्टॉल धारक महिलाना राज्य कृषी मूल्य आयोग अध्यक्ष पाशा पटेल यांना शुभेच्छा दिल्या.

मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद राहुल कुमार मीना यांनी हिकारनी हाट मध्ये मिळणाऱ्या विविध वस्तू आणि पदार्थ हे कायमस्वरूपी उपलब्ध होतील यासाठी जिल्हा परिषद परिसरात हिरकणी मॉल ही संकल्पना राबविण्यात येणार असून जिल्ह्यातील सर्व हिरकणीचे उत्पादने एका छताखाली येणार असल्याचे प्रसंगी नमूद करून स्टॉल धारक महिलाना प्रोत्साहित केले.

जिल्हा अभियान व्यवस्थापक देवकुमार कांबळे यांनी उमेद अभियानाच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या फिरता निधी, समुदाय गुंतवणूक निधी, वैयक्तिक व्यवसाय कर्ज विनियोग कशा पद्धतीने महिलांनी करावा याविषयीची सविस्तर माहिती दिली. यावेळी महिलाना विविध कर्ज वितरण धनादेश मान्यवरांचे हस्ते वितरीत करण्यात आले.

प्रसंगी जिल्हाची उमेद अभियानाची सद्यस्थिती तसेच हिरकणी हाट मध्ये लावण्यात आलेल्या विविध स्टॉल तसेच विक्री व प्रदर्शन आयोजनाचा उद्देश याविषयी सविस्तर माहिती प्रास्ताविकातून नमूद केली.

उद्घाटन प्रसंगी मान्यवरांनी बचत गटांनी तयार केलेल्या विविध दर्जेदार व आकर्षक उत्पादनांचे कौतुक केले. स्थानिक पातळीवर तयार होणाऱ्या वस्तूंना प्रोत्साहन मिळावे आणि महिलांना आर्थिक स्वावलंबन साधता यावे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रसंगी सर्व मान्यवरांनी बचत गटाच्या स्टॉलला भेट देऊन स्टॉलवरिल विविध नाविण्यपूर्ण उत्पादनांचे कौतुक करून महिलाना प्रेरित केले.

# माजी कुलगुरु डॉ. जनार्दन वाघमारे यांचे स्मारक लातुरात व्हावे; लातूरच्या श्रद्धांजली सभेत मान्यवरांचा सूर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ मार्च :** महाराष्ट्रातील ज्येष्ठ पुरोगामी विचारवंत, सुप्रसिद्ध साहित्यिक, नांदेडच्या स्वारातीम विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू, माजी खासदार डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या विचारांचा वारसा जतन करण्यासाठी नांदेडच्या नरहर कुरुंदकर स्मारकाच्या धर्तीवर लातूर येथे त्यांचे स्मारक उभे राहिले पाहिजे, त्यासाठी राजकीय इच्छाशक्तीचीही गरज आहे, असा सूर लातूर येथे शुक्रवारी आयोजित डॉ. जनार्दन वाघमारे श्रद्धांजली सभेत अनेक मान्यवर वक्त्यांनी व्यक्त केला.

येथील दयानंद सभागृहात झालेल्या या श्रद्धांजली सभेत मराठवाड्यातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी भावपूर्ण आदरांजली वाहिली. ज्येष्ठ साहित्यिक व नाटककार प्रा. दत्ता भगत आणि ज्येष्ठ विचारवंत डॉ. सूर्यनारायण रणसुभे यांच्या शोक संदेशांचे यावेळी वाचन करण्यात आले.

महाराष्ट्राच्या वैचारिक बांधणीत डॉ. वाघमारे यांचा मोलाचा वाटा असून सामाजिक क्षेत्रातील त्यांचे योगदान दिशादर्शक आहे, असे सांगून डॉ. नागोराव कुंभार यावेळी म्हणाले, सामाजिक न्याय समता या मूल्यांचा आग्रह धरणारे सर्वसमावेशक विचारवंत म्हणून डॉ. वाघमारे यांच्या विचारांची जपणूक झाली पाहिजे त्यामुळे भविष्यात पुरोगामी चळवळीला अधिक बळ आणि दिशा मिळेल. तर, सर्वोदय चळवळीचे नेते व इतिहासाचे अभ्यासक प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे यांनी दलित व ग्रामीण साहित्याचा वारसा, वाचन संस्कृती, संविधान, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान प्रकल्पाचा वारसा आपण पुढे घेऊन जाऊ या, असे सांगितले.

जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे म्हणाले, सामाजिक, शैक्षणिक , राजकीय आणि वैचारिक क्षेत्रात लातूरची ओळख महाराष्ट्राबाहेर निर्माण करणाऱ्या डॉ. वाघमारे यांची वैचारिक ग्रंथसंपदा राज्याला मार्गदर्शक अशीच आहे. लातूरने शैक्षणिक क्षेत्रात पश्र्चिम महाराष्ट्राची मक्तेदारी मोडून काढली आणि लातूर पॅटर्न तयार केला या लातूर पॅटर्न चे सर्व श्रेय डॉ. वाघमारे यांनाच जाते. लातूरमध्ये त्यांचे उचित स्मारक उभे राहिले पाहिजे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. डॉ. शेषराव मोहिते यांनी केले.

भूकंप ही विस्थापतिमानुन आपल्या स्वप्नातील जातीपाती विरहित चलबुर्गा हे गाव डॉ. वाघमारे यांनी उभारले होते.



अतिशय प्रतिकूल परिस्थितीत उच्च शिक्षण घेतलेले डॉ. वाघमारे हे तळागाळापर्यंत शिक्षणाचा विस्तार व्हावा यासाठी कायम प्रयत्नशील राहिले त्यांचा विचार शैक्षणिक कार्य हे पुरोगामी चळवळीला बळ देणारे आणि गती देणारे आहे असा विचारही अनेक मान्यवर व त्यांनी व्यक्त केला.

यावेळी जितेंद्र वाघमारे, लक्ष्मीरमण लाहोटी, डॉ. सुचेता वाघमारे-शास्त्री, आकांक्षा जाधव-शास्त्री, प्राचार्य डॉ. एम. एस .दडगे, ड. धनंजयभाई पाटील, डॉ. राम बोरगावकर, डॉ. रमेश भराटे, ज्येष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे, कवी योगीराज माने, माजी मंत्री विनायकराव पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते राजेश्र्वरराव देशमुख, दत्ता सुरवसे, भारत सातपुते, डॉ. रणजीत जाधव, ड. वसंतराव उगले, प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे, परभणीच्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. अशोक ढवण, अरविंद कांबळे, प्राचार्या कुसुम मोरे, प्रा. दत्ता सोमवंशी, प्राचार्य डॉ, महादेव गव्हाणे, शरद झरे, शेतकरी नेते लक्ष्मण वांगे, विजय चव्हाण, अजित पाटील कव्हेकर, प्रा. नयन राजमाने, बाबासाहेब सीतापुरे, ओमप्रकाश आर्य, शिवदासजी लखादिवे, विद्याधर कांदे-पाटील, रमेश दापके, प्रा. सतीश यादव, प्राचार्य डॉ. संजय वाघमारे, डॉ. जयद्रथ जाधव, बाबा सितापुरे, ओमप्रकाश झुरुळे, आदी मान्यवर वक्त्यांनी डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या शैक्षणिक व वैचारिक प्रवासाचा वेध घेतला. डॉ. वाघमारे यांच्या आठवणींना अनेकांनी उजाळा दिला. सभेच्या आयोजनासाठी प्रा. डॉ. नागोराव कुंभार, डॉ दिगंबर नेटके, प्रा सुधीर साळुंखे, प्रा. डॉ. विनोद चव्हाण आदींनी परिश्रम घेतले. या श्रद्धांजली सभेचे संचलन डॉ. विवेक सौताडेकर यांनी केले.

## संक्षिप्त...

### एलबीएस च्या विद्यार्थ्यांचे सैनिक स्कूल परिक्षेत यश



**निलंगा :** निलंगा येथील लाल बहादूर शास्त्री प्रा विद्यालयातील अथर्व निवृत्तीराव हिंपळेपाटील व सार्थक निवृत्तीराव हिंपळेपाटील या दोन सख्या भावाने सातारा सैनिक स्कुल च्या प्रवेश परीक्षेत घवघवीत यश संपादन करून आपल्या वडिलांचे स्वप्न साकार केले

या यशाबद्दल एल. बी. एस. मिशन चे अध्यक्ष तथा माजी अध्यक्ष जि. प. लातूर श्री पंडितराव धुमाळ साहेब शाळेचे मुख्याध्यापक श्री बिराजदार आर. एस. व शाळेतील शिक्षक यांनी या निवडीबद्दल अथर्व व सार्थक यांचे व पालकांचा शाळेच्या व संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

### माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा



**रेणापूर :** राज्याचे माजी मंत्री तथा माजी पालकमंत्री आ. अमित विलासराव देशमुख साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त रेणापूर शहर व तालुका काँग्रेसच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. येथील ग्रामदैवत रेणुका देवी मंदिरात महापूजा करण्यात आली. तसेच ग्रामीण रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना फळवाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. यावेळी रेणा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अनंतराव देशमुख, व्हा चेअरमन प्रवीण पाटील, संचालक तुकाराम कोल्हे, पंडित माने, कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रमोद कापसे, शहराध्यक्ष तथा नगरसेवक पदमसिंह पाटील, प स सदस्य डॉ तातेराव वाघमारे, बालाजी हाके,कॉंग्रेसचे गटनेते गजेंद्र चव्हाण, माजी सभापती प्रदीप राठोड कृउबाचे सभापती उमाकांत खलंग्रे, उपसभापती ड .शेषेराव हाके, नगरसेवक सचिन मोटेगावकर, संतोष शिंदे, भुषण पनुरे,हनुमंतराव पवार, केशव माने, अमरिश भिसे, रघुनाथ मदने, राज मस्के, शिवाजी अकनगिरे,नितीन मोटेगावकर, सचिन इगे, प्रदिप काळे, सतीश चव्हाण, दगडू पाटील यांच्यासह कॉंग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी माजी मंत्री आ. देशमुख साहेब यांच्या दीर्घायुष्य व उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना केली. युवक कॉंग्रेस व महिला कॉंग्रेसच्या पदाधिकाऱ्यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### गुलालाच्या कीर्तनाने भक्तिरंग; संतसंगाच्या संदेशाने भारावला सप्ताह




**उदगीर :** श्री समर्थ धोंडुतात्या महाराज यांच्या ९४ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात संतपीठात दुपारी २ ते ५ या वेळेत ह.भ.प. विजयानंद महाराज सुपेकर यांचे गुलालाचे कीर्तन अत्यंत भक्तिमय वातावरणात पार पडले. टाळ-मृदुंगाच्या गजरात, हरिनामाच्या अखंड निनादात व गुलालाच्या उधळणीत संपूर्ण परिसर भक्तिरंगात न्हाऊन निघाला. या सप्ताहात पारायण व रामकथेची सांगता पार पडली असून अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता दि. २२/०३/२०२६ रोजी काल्याच्या कीर्तनाने होणार आहे. हे कीर्तन ह.भ.प. जयवंत महाराज बोधले यांच्या वाणीने सादर होणार आहे. गुलालाचे कीर्तन संपल्यानंतर हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. तसेच श्री समर्थ धोंडुतात्या महाराज यांच्या समाधीचे पूजन (अभिषेक) ह.भ.प. विजयानंद महाराज सुपेकर यांच्या हस्ते विधीवत पार पडले. यावेळी सादर करण्यात आलेल्या संत तुकाराम महाराजांच्या अभंगाने संपूर्ण वातावरण अधिकच भक्तिमय झाले–

देशील तरी पाहे पांडुरंगा ।।१।।
या संतासी निरवीं हेचिं मज देई ।
आणिक दुजें कांहीं न मागों देवा ।।२।।
तुका म्हणे आतां उदार तूं होई ।
मज ठेवी पायीं संताचिया ।।३।।

या अभंगाच्या माध्यमातून संतसंगाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. जीवनात धन, मान, सुख यापेक्षा संतांचा सहवास श्रेष्ठ असून त्यांच्या मार्गदर्शनातूनच आत्मशांती व देवप्राप्तीचा मार्ग सापडतो, असा संदेश यावेळी देण्यात आला.

त्यामुळे कीर्तनातून केवळ भक्तीचा आनंदच नव्हे, तर जीवनमूल्यांची जाणीवही भाविकांना झाली. तसेच गावातील सर्व देवतांना नैवेद्य गावचे मानकरी बालाजी पाटील यांनी अर्पण केला. या महाप्रसादाचा हजारो भाविकांनी लाभ घेतला.

# पवित्र रमजान ईद निमित्त माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांच्याकडुन शुभेच्छा

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. २२ मार्च :** पवित्र रमजान महिन्याची सांगता होत असताना साजऱ्या होणाऱ्या रमजान ईदच्या निमित्ताने आमदार संजय बनसोडे यांनी ईदगाह मैदानावर उपस्थित राहून सर्व मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या. रमजान महिना हा संयम, त्याग, दया आणि मानवतेचा संदेश देणारा आहे. या पवित्र महिन्यात उपवास, प्रार्थना आणि दानधर्माच्या माध्यमातून समाजात बंधुभाव व एकोपा वृद्धिंगत होतो. ईदचा सण हा आनंद, शांतता आणि एकमेकांप्रती प्रेम व्यक्त करण्याचा उत्सव असून, तो समाजात एकात्मतेची भावना अधिक दृढ करतो असे माजी आ.संजय बनसोडे यांनी सांगितले.



यावेळी उपस्थित सर्व मुस्लिम बांधवांना गुलाबपुष्प देवून गळाभेट घेवुन पवित्र रमजान ईदच्या आ.संजय बनसोडे यांनी शुभेच्छा दिल्या.

यावेळी मौलाना मुस्ताक खतीब, माजी आ.गोविंदराव केंद्रे, नगरसेवक सचिन हुडे, शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, गटनेते अनिल मुदाळे, जि.प. सदस्य डॉ. दिपक सोमवंशी, जि.प. सदस्य ज्ञानेश्र्वर बिरादार, उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार राम बोरगावकर, मुख्याधिकारी सोमनाथ जाधव, सनाउल्ला खान, नरसिंग शिंदे, माजी उपसभापती बाळासाहेब मरलापल्ले, नगरसेवक राजकुमार भालेराव, सर्जेराव भांगे, प्रा.श्याम डावळे, वसंत पाटील, शशिकांत बनसोडे, शिवकुमार कांबळे, अमर सुर्यवंशी, धिरज कसबे, सय्यद इम्रान, इमरोज हाशमी,फय्याज शेख, इब्राहिम नाना पटेल, राजकुमार चव्हाण, प्रा.शिवाजीराव देवनाळे, शफी हाशमी, संदीप देशमुख, बापू साळुंके, हिफ्जुरहेमान हाशमी, अखिल मोमीन, युसुफ बागवान, बाबासाहेब सुर्यवंशी, सोनु हाशमी, सुलतान मिर्झा, शहेबान शेख, सय्यद वसिम, सय्यद अफरोज पटवेघर, सय्यद इम्रान, अविनाश गायकवाड आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना आ.संजय बनसोडे यांनी सर्व समाजबांधवांना आवाहन केले की, धर्म, जात, पंथ यापलीकडे जाऊन आपण सर्वांनी एकोप्याने राहावे आणि समाजाच्या प्रगतीसाठी हातभार लावावा. ईदच्या या मंगलमय प्रसंगी सर्वांच्या जीवनात सुख, शांती आणि समृद्धी नांदो, अशी प्रार्थना त्यांनी व्यक्त केली.

या शुभेच्छांमुळे परिसरातील मुस्लिम बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यावेळी पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मनुष्याच्या आचरणाचा प्रकाश देणारा ग्रंथ म्हणजे व्यवहार भानू होय– मधुमती नरेंद्र शिंदे

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. २२ मार्च :** आज आधुनिक युगात एकीकडे विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रचंड प्रगती करत आहे. तर दुसरीकडे अज्ञान, स्वार्थ, भ्रष्टाचार, असत्य आणी हिंसा देखील वाढत आहे. मनुष्याचे जीवन केवळ ज्ञानाने नाही तर त्याच्या वर्तन आचरणादी व्यवहाराने महान ठरते. मनुष्याच्या जीवनातील योग्य अशा आचरणाचा प्रकाश देणारा ग्रंथ म्हणजे व्यवहार भानू हा होय. असे मत मधुमती नरेंद्र शिंदे यांनी व्यक्त केले.




जागतिक महिला दिनाच्या पार्श्र्वभूमीवर संपन्न झालेल्या वाचक संवादचे ३५७ वे पुष्प मीनाक्षी स्वामी, पतंजली महिला राज्य प्रभारी, यांच्या अध्यक्षतेखाली सौ मधुमती नरेंद्र शिंदे यांनी महर्षी स्वामी दयानंद सरस्वती लिखित व्यवहार भानू या ग्रंथावर संवाद साधून गुंफले. गेल्या पंधरा वर्षापासून अखंडितपणे चालू असलेल्या चला कवितेच्या बनात उपक्रमांतर्गत चा हा कार्यक्रम जेष्ठ नागरिक संघांचे विरंगुळा केंद्र, अहिल्यादेवी होळकर सभागृह उदगीर येथे संपन्न झाला. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की आळशीपणा हा मनुष्याचा सर्वात मोठा शत्रू आहे. अज्ञानामुळे मनुष्य चुकीचे निर्णय घेतो, वर्तन करतो. समाजातले असत्य बोलणे, चोरी, फसवणूक आणि शिक्षणाकडील दुर्लक्षामुळे मनुष्याच्या नैतिक मूल्यांचा ऱ्हास होत आहे. शिक्षण, ज्ञान, सत्य आणि परिश्रमाशिवाय प्रगती शक्य नाही. त्यासाठी चांगल्याचा सहवास आणि मेहनतीतूनच समाजात शांतता नांदेल. समाजाची प्रगती होऊन आनंद मिळेल. यासाठी योग्य मार्गदर्शक, गुरु, राजा, वैद्य कसा असावा त्याचे गुणदोष आणि आचरणाच्या संदर्भाने छोट्या छोट्या कथांच्या माध्यमातून या ग्रंथात नैतिक जीवनाचे मार्गदर्शन करण्यात आल्याचे सांगितले.

यानंतर झालेल्या चर्चेत अनेकांनी सहभाग नोंदवला. शेवटी अध्यक्षीय समारोपात मीनाक्षी स्वामी म्हणाल्या की सत्य, शिक्षण, परिश्रम आणि परोपकाराच्या आधारावरच उत्तम समाजाची निर्मिती होऊ शकते. त्यासाठी अशा वाचक संवादात येऊन माणसाने माणूसपण जपण्याचे शिकले पाहिजे.

कार्यक्रमाचे संचालन मुरलीधर जाधव यांनी केले तर आभार प्राध्यापक राजपाल पाटील यांनी मांडले. या कार्यक्रमास प्रतापसिंह चव्हाण, दिलीप कंधारे, अशोक नाईक, संभाजी मोहटे, धूळपा, बालाजी, ललिता बिरादार, संध्या बेद्रे, सुमित्रा कोयले, लता नळगिरे, विजया पाटील, डॉ. तन्मयी वैद्य, स्मिता पोद्दार, भगवती टवानी, राजनंदिनी बेंडकुळे, सुमती भातांबरे, पंचफुला जाधव आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## दयानंद विज्ञान महाविद्यालयात युवातरंग वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ मार्च :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.२४ ते २५ मार्च २०२६ रोजी ' युवातरंग ' वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांच्या मार्गदर्शनानुसार करण्यात आलेले आहे.या संमेलनाचे उदघाटन दि.२४ मार्च २०२६ रोजी सुप्रसिद्ध चित्रपट व नाट्य अभिनेते प्रशांत दामले या प्रमुख पाहुण्याच्या हस्ते सकाळी ठीक १०:०० वाजता होणार आहे.

सदरील ' युवातरंग ' वार्षिक स्नेहसंमेलनात आनंद नगरी,गीत गायन व नृत्य स्पर्धा,विविध गुणदर्शन,साधे व संगीत शेलापागोटे इतर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.समारोप व बक्षीस वितरण दि.२५ मार्च २०२६ रोजी होणार आहे. तसेच दि.२० व २३ मार्च २०२६ रोजी साहित्य आणि सांस्कृतिक मंडळाच्या वतीने निबंध, पोस्टर पेंटिंग, वक्तृत्व, गायन, मेहंदी, रांगोळी स्पर्धा, सिनेमॅटिक रिल शुट स्पर्धा, लोगो स्पर्धा आणि क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या आणि बॉलीवूड डे सारखे विविध डे उत्साहात साजरे करण्यात आले.वार्षिक स्नेहसंमेलन यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली.विविध कमिटी तयार करण्यात आलेल्या असून प्रत्येकजण आपापली जबाबदारी कर्तव्यदक्षपणे पार पाडत आहेत.

या उद्घाटन व समारोपप्रसंगी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्र्वर बेल्लाळे,उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,विद्यार्थी विकास मंडळ प्रभारी प्रा.डॉ.युवराज सारणीकर, सांस्कृतिक प्रभारी प्रा.मेघा पंडित, आयक्यूएसी समन्वयक डॉ.जमन अंगुलवार, सेल्फ फायनान्सचे प्राचार्य अनिलकुमार माळी, पर्यवेक्षिका डॉ. संध्या वाडीकर, पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरूडकर,कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव, सदस्य प्रा.भालचंद्र कोयलवार, डॉ.कोमल गोमारे असे आवाहन महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे व संयोजन समितीच्या वतीने करण्यात आलेले आहे.

# ग्राहक समिती महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी जाहीर

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. २२ मार्च :** ग्राहक समिती महाराष्ट्र राज्य एवमं ग्राहक जनजागरण व मार्गदर्शन संस्था महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि.१५ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता श्री हावगीस्वामी कॉलेज महाविद्यालयातील सभागृहात जागतिक ग्राहक हक्क दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. यावेळीच ग्राहक समिती महाराष्ट्र राज्याचे कार्य करणे ही जाहीर करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.ए.ए.काळगापुरे, प्राचार्य श्री.हावगी स्वामी महाविद्यालय, उदगीर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. एन.जी.यमेकर उपप्राचार्य, श्री.हावगी स्वामी महाविद्यालय उदगीर, डॉ. एस.डी.लोहारे, डॉ.ए.आर कवठाळे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख श्री हावगस्वामी महाविद्यालय, उदगीर, प्राध्यापक मनोहर भालके, दत्ता बिरादार, राम राठोड उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे व मुख्य मार्गदर्शक म्हणून ग्राहक समिती महाराष्ट्र राज्याचे संस्थापक राज्याध्यक्ष तथा प्रदेशाध्यक्ष तानाजीराव नरहरीराव गुंड, राज्याचे प्रदेश कार्याध्यक्ष सतीशकुमार बुरगुटे, ग्राहक जनजागरण व मार्गदर्शन संस्थेचे महाराष्ट्र राज्याचे संस्थापक प्रदेशाध्यक्ष तथा राज्याध्यक्ष बी.जी. शिंदे तसेच ग्राहक समिती महाराष्ट्र राज्याचे नवनिर्वाचित राज्य प्रदेश संघटक तथा मराठवाडा अध्यक्ष बालासाहेब शिंदे, प्रा.डॉ.अविनाश प्रभातराव पाटील, प्रा.डॉ.सुनील यशवंतराव ढगे, तालुकाध्यक्ष प्राचार्य व्ही.एस.कणसे, शिरूर अनंतपाळ तालुकाध्यक्ष आर. एन.जाधव, प्रा.विकास पाटील उपस्थित होते. यावेळी विद्यार्थी, विद्यार्थिनी, पालक, महाविद्यालयीन कॉलेजकुमार, युवक, युवती, तरुणी, पदाधिकारी, कर्मचारी, ग्राहक स्वंयसेवक उपस्थित होते.



ग्राहक समिती महाराष्ट्र राज्य व ग्राहक जनजागरण व मार्गदर्शन संस्था महाराष्ट्र राज्य ग्राहकांमध्ये जनजागृती करण्यासाठी कार्यकर्ते कार्यरत असून, संस्थापक राज्याध्यक्ष तानाजीराव नरहरी गुंड, राज्य प्रदेश कार्याध्यक्ष सतीशकुमार बुरगुटे, नवनिर्वाचित बी.जी.शिंदे अतनूरकर राज्य कार्यकारी संघटक तथा मराठवाडा अध्यक्ष हे केंद्रीय कार्यकारिणीत आहेत.

ग्राहक समिती महाराष्ट्र राज्य उदगीर येथील ग्राहक जनजागरण व मार्गदर्शन मेळावा शिबिरात नवीन महाराष्ट्र प्रदेश राज्यसंघटक तथा मराठवाडा अध्यक्ष पदावर बी.जी.शिंदे अतनूरकर यांची निवड करण्यात आली तसेच त्यांना प्राचार्य काळगापुरे, राज्याध्यक्ष तानाजी गुंड, कार्याध्यक्ष सतीशकुमार बुरगुटे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. उदगीर तालुका अध्यक्षपदी प्राचार्य व्यंकटराव कणसे, कार्याध्यक्षपदी प्रा.डॉ.अविनाश प्रभातराव पाटील, तालुका उपाध्यक्षपदी प्रा.डॉ.सुनील यशवंतराव ढगे, तालुकाध्यक्ष प्राचार्य व्ही.एस.कणसे, शिरूर अनंतपाळ तालुकाध्यक्ष आर.एन.जाधव, प्रा.विकास पाटील, व इतर पदाधिकारी निवडले गेले. तसेच पोलीस मित्र व ग्राहक समिती महाराष्ट्र राज्य, ग्राहक जनजागरण व मार्गदर्शन समिती महाराष्ट्र राज्य शासकीय शासननियुक्त नोंदणीकृत ग्राहक व पत्रकार संरक्षण संघटनेची नवीन कार्यकारिणी जाहीर झाली असून, ती ग्राहकांच्या हक्कासाठी सक्रिय राहणार आहे. या ग्राहक संस्थेचे उद्दिष्ट्ये सदोष वस्तू, सेवा आणि सायबर फसवणुकीविरुद्ध ग्राहकांना जागरूक करणे, तसेच तक्रार निवारण मंचाद्वारे न्याय मिळवून देणे हे नवीन कार्यकारिणीचे प्रमुख ध्येय आहे.

### रस्त्यात रिक्षा उभी; चालकावर गुन्हा

**लातूर :** सार्वजनिक रस्त्यावर वाहतुकीस अडथळा निर्माण होईल, अशा पद्धतीने वाहन उभे केल्याप्रकरणी गांधी चौक पोलिसांनी एका रिक्षा चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. ही कारवाई १६ मार्च रोजी 'गंजगोलाई' परिसरात करण्यात आली. पोलिस नाईक निकेतन बिराजदार यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, रिक्षा क्रमांक (एमएच २४ एटी ७५६२) रस्त्याच्या मध्यभागी उभी असल्याचे आढळले. यामुळे सर्वसामान्यांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याने कलम २८५ (बीएनएस) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिस अंमलदार होळंबे पुढील तपास करत आहेत. दरम्यान, प्रवासी घेण्यासाठी रस्त्यामध्ये ऑटो उभा करून अडथळा करण्याच्या घटना वारंवार घडत आहेत.

### रबीची काढणी शेवटच्या टप्प्यात

**लातूर :** जिल्ह्यात रब्बी हंगामातील पिकांची काढणी आता अंतिम टप्प्यात आली असून शेतकरी सध्या काढणीच्या कामात व्यस्त आहेत. सुमारे ३ लाख ५० हजार हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावर रब्बी पिकांचा पेरा करण्यात आला होता. यामध्ये हरभरा पिकाचे क्षेत्र सर्वाधिक असून या पिकाने यंदा शेतकऱ्यांना चांगला दिलासा दिला आहे.हंगामाच्या सुरुवातीला पोषक हवामान आणि उपलब्ध पाण्यामुळे पिकांची वाढ चांगली झाली. त्यामुळे उत्पादनही समाधानकारक मिळत असल्याचे चित्र आहे. मात्र, मध्यंतरी झालेल्या अवकाळी पावसाचा काही भागातील पिकांवर परिणाम झाला असून काही ठिकाणी नुकसानही नोंदवले गेले आहे.

# निलंग्यात रमजान ईद उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. २२ मार्च :** मुस्लीम बांधवांसाठी पवित्र असणारी रमजान ईद निलंगा शहरात शनिवारी मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरी करण्यात आली.

सकाळी १० वाजता शहरातील लातूर रस्त्यावरील ईदगाह मैदानावर एकत्रित नमाज पठण केल्यानंतर सर्व मुस्लीम बांधवांनी एकमेकांना 'ईद मुबारक' करत आलिंगन देऊन शुभेच्छा दिल्या. यानंतर शहरभर सर्वत्र ईदचा उत्साह पाहायला मिळाला. ईद ची नमाज जामा मस्जिद चे शाही इमाम हाफिज महेबूब रशिदी यांनी पाढवली .नमाज नंतर जागतिक शांतता सह देशातील शांतता सलोख्यासाठी दुवा करण्यात आले.



गेल्या महिनाभरापासून सुरू असलेल्या पवित्र रमजान महिन्यानिमित्त मुस्लीम बांधवांच्या रोजाची सांगता शुक्रवारी झाली. १९ फेब्रुवारीला रमजान महिन्याच्या सुरुवात झाली होती. या काळात शहरातील मशिदींमध्ये विद्युत रोषणाई करण्यात आली होती. तर पहाटेची सहेरी झाल्यानंतर दिवसभर नमाज, कुराण पठण करण्यात आल्यानंतर सायंकाळी इफ्तारीचे आयोजन केले जात होते. आज अबालवृद्धांनी नवीन कपडे परिधान करून नमाज पठाण केले. सर्वधर्मीयांकडून मुस्लीम बांधवांना शुभेच्छा देण्यात आल्या. अनेकजणांनी एकमेकांच्या घरी जाऊन शिरकुर्म्याचा आस्वाद घेत ईद साजरी केली. विविध राजकीय पक्षांनीदेखील ईदच्या शुभेच्छा दिल्या. लहान मुलांनीही सणाचा मनसोक्त आनंद लुटला.

रमजान ईद हा मुस्लीम धर्मियांसाठी पवित्र सण मानला जातो. महिन्याभराचे उपवास (रोजे), अल्लाहचे नामस्मरण, प्रेम, त्याग, समर्पण अशा वैशिष्ट्यांसाठी रमजान ईद ओळखली जाते. सामाजिक बंधुभाव, एकात्मता, भाईचारा वाढीस लागण्यात ईद महत्त्वाची ठरते. रमजानच्या निमित्ताने महिनाभर शहरातील वातावरण उत्साहाने भरून गेले होते. प्रत्यक्ष भेटींच्या सोबतच दिवसभर विविध समाजमाध्यमांवर अनेकांनी एकमेकांना ईदच्या 'व्हर्च्युअल' शुभेच्छा दिल्या. ईदच्या मुस्लिम बांधवाना शुभेच्छा देण्यासाठी ईदगाह मैदानावर काँग्रेस जिल्हाध्यक्ष अभय साळुंखे, नगराध्यक्ष संजयराज हलगरकर, डॉ.अरविंद भातांब्रे, अजित माने, विजयकुमार पाटील,पंकज शेळके,विलास लोभे, आदी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.

## फाउंडेशनचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार युवराज हिरवे यांना जाहीर



**तभा. वृत्तसेवा**

**केज (प्रतिनिधी)** | तालुक्यातील कळंबआंबा येथील भूमिपुत्र ,मानेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे प्र मुख्याध्यापक युवराज अभिमन्यू हिरवे यांच्या शैक्षणिक उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन ध्येय एज्युकेशन फाउंडेशनचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

शिक्षण क्षेत्रातील सातत्य पूर्ण कार्य, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कायम धडपड, विविध शैक्षणिक उपक्रमातील नाविन्यता, सामाजिक उपक्रमात सक्रिय योगदान शाळा परिसर व गाव परिसर ५०० च्या वर झाडे लावुन संगोपन केले. लोकसहभागातुन विद्यार्थ्यांना लॅपटॉप संगणक दिले.शाळा परिसर तंबाखूमुक्त केला व तालुक्यातील शाळा परिसर तंबाखुमुक्त करण्यासाठी तालुका समन्वयक म्हणुन कार्य केले. आडस केंद्र तंबाखुमुक्त केले. बालविवाह रोखण्यासाठी केद्रसमन्वयक म्हणुन कार्य केले. पाणी फाऊडेशन वॉटरकप स्पर्धा हिरीरीने सहभाग, गावाला व्दितीय क्रमांकाचे बक्षीस मिळवुन दिले. करोना कालावधीमध्ये वेगवगेळ्या सेवाभावी संस्थेच्या माध्यामातुन गरजू व्यक्तींना अन्नधान्य किट चे वाटप केले. अंधश्रद्धा निर्मूलन, स्वच्छता मोहीम विविध स्पर्धा यांचे आयोजन,अक्षर परिवार समूह कार्य, महापुरुषांच्या जयंती पुण्यतिथि व्याख्याने, कविसंमेलन, पोवाडे, साजरे करून सामाजिक सलोखा अबाधित ठेवण्यासाठी पुढाकार घेतला

## अचिव्हर्स' इंग्रजी मॅगझिन्सच्या कव्हर पेजवर ना.पंकजाताई मुंडे झळकल्या!

### 'इथिकल लिडरशीप' अशा शब्दांत राजकीय, सामाजिक प्रवासाचा मॅगझिनने केला गौरव

**तभा. वृत्तसेवा**

**मुंबई** | राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा महाराष्ट्रातील धडाडीच्या नेत्या ना. पंकजाताई मुंडे यांची एक विशेष मुलाखत 'सोसायटी अचिव्हर्स' या मुंबईतून प्रकाशित होणा-या सुप्रसिद्ध इंग्रजी मॅग्झिनने घेतली असून कव्हर पेजवर त्यांना स्थान दिले आहे. 'देअर इज नो सबस्टिट्यूट फॉर इथिकल लीडरशीप' अशा शब्दांत त्यांच्या आतापर्यंतच्या राजकीय, सामाजिक प्रवासाचा मासिकाने गौरव केला आहे.

'सोसायटी अचिव्हर्स' मॅग्झिनची एक स्पेशल एडिशन या महिन्यात प्रसिद्ध झाली आहे. या इंग्रजी मासिकाचा देश विदेशात मोठा वाचक वर्ग





यशस्वीतांच्या स्टोरीचा भाग झाल्याचा आनंद मॅगझिनच्या संपादिका अॅन्ड्रेया कोस्टबीर, अशोक धामणकर यांनी शनिवारी ना.पंकजाताई मुंडे यांची त्यांच्या रामटेक या शासकीय निवासस्थानी भेट घेऊन या स्पेशल एडिशनचे

आहे. ना. पंकजाताई मुंडे यांनी आपल्या धडाकेबाज कामातून राज्याच्या राजकारणात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे शिवाय काम करण्याची त्यांची एक स्वतःची खास शैली आहे, अतिशय अभ्यासू व तळमळीने काम करणा-या नेत्या म्हणून त्या ओळखल्या जातात. पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री म्हणून काम करत असताना त्यांनी अनेक लोकाभिमुख निर्णय घेतले. एक लोकनेत्या म्हणून त्यांच्या राजकीय व सामाजिक कार्याचा आढावा या मुलाखतीत घेण्यात आला आहे. मॅग्झिनच्या संपादिका अॅन्ड्रेया कोस्टबीर यांनी त्यांची विशेष मुलाखत घेतली आहे. एकूणच त्यांच्या कार्य प्रवासाच्या टप्प्यातील विविध पैलू फोटोच्या माध्यमातूनही उलगडले आहेत. विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांच्या देखील मुलाखती या मासिकात घेतल्या गेल्या आहेत.

## अंबाजोगाईचे सुपुत्र सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमुर्ती सुधाकर कुर्डूकर यांचे निधन

**तभा. वृत्तसेवा**

**अंबाजोगाई** | अंबाजोगाईचे सुपुत्र आणि भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश सुधाकर पंडितराव कुर्डूकर यांचे शनिवारी २१ मार्च २०२६ रोजी मुंबई येथे वृद्धापकाळाने निधन झाले. वयाच्या ९१ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. अंबाजोगाईच्या देशपांडे गल्लीतील मूळ रहिवासी असलेल्या न्यायमूर्ती कुर्डूकर यांनी आपल्या प्रदीर्घ कारकीर्दीत न्यायव्यवस्थेत मोलाचे योगदान दिले. त्यांनी मार्च १९९६ ते जानेवारी २००० या काळात सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून काम पाहिले. त्यापूर्वी त्यांनी पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि मुंबई उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून जबाबदारी सांभाळली होती. विशेष म्हणजे १९९४ मध्ये त्यांनी पंजाबचे प्रभारी राज्यपाल



म्हणूनही पद भूषवले होते. कायदेशीर क्षेत्रासोबतच त्यांनी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष म्हणून शैक्षणिक कार्यातही सहभाग नोंदवला. त्यांच्या पार्थिवावर मुंबईतील चंदनवाडी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाने कायदेतज्ज्ञ आणि अंबाजोगाई परिसरात शोककळा पसरली आहे.

## जमावाकडून तरुणावर प्राणघातक हल्ला

### लोखंडी रॉडने मारहाण डोक्यावर 13 टाके,बरगड्या मोडल्या

**तभा. वृत्तसेवा**

**बीड (प्रतिनिधी)** | गेवराई शहरात किरकोळ कारणावरून एका तरुणावर १५ ते २० जणांच्या टोळक्याने प्राणघातक हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या हल्ल्यात तरुण गंभीर जखमी झाला असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे. या घटनेनंतरही आरोपींवर तात्काळ कारवाई न झाल्याने पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक २० मार्च रोजी सायंकाळी सुमारे सहा वाजण्याच्या सुमारास शेख अरबाज शेख जब्बार (रा. तय्यब गल्ली, गेवराई) हा तरुण उपास सोडण्यासाठी साहित्य



खरेदी करण्यासाठी दुचाकीवरून कुटुंबासोबत घराबाहेर पडला होता. त्यावेळी त्याच्यासोबत त्याची पत्नी आणि एक वर्षाचा मुलगा देखील होता.

दरम्यान, गेवराईतील राजगल्ली परिसरात किरकोळ कारणावरून वाद निर्माण झाला आणि अचानक १५ ते २० जणांच्या टोळक्याने लोखंडी रॉड, लाथा-बुक्क्यांनी त्याच्यावर हल्ला चढवला. या बेदम मारहाणीत त्याच्या छातीला गंभीर दुखापत झाली असून बरगड्या मोडल्या आहेत. तसेच डोक्याला गंभीर मार लागून १३ टाके घालावे लागले आहेत.

जखमी अवस्थेत त्याला प्रथम गेवराई येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी त्याला तात्काळ बीड जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले. डॉक्टरांनी त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगितले आहे.

गेवराई शहरातील मुख्य भागातच गंभीर घटना घडूनही मुलींचा कडून हल्लेखोरांना कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. यामुळे गेवराई पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत असून "पोलिसांचे भय संपले का?" असा सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे.

या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी जखमी तरुणाच्या कुटुंबीयांकडून करण्यात येत आहे.

## बंकटस्वामी महाराज गुणवंतांची खाण होते : महंत तुकाराम महाराज भारती

### किर्तन सोहळ्यास महाराष्ट्रातील गुणिजन मंडळींची उपस्थिती.

**तभा. वृत्तसेवा**

**बीड** | दि-२१ (प्रतिनिधी) | वारकरी संप्रदायात संत बंकटस्वामी महाराज यांचे संपादकीय कार्य मोठे आहे. स्वामी महाराज हे गुणवंताची खान होते. त्यांच्यामुळेच आज महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाचे विस्तारलेले स्वरूप पाहायला मिळते असे प्रतिपादन श्री ह भ प महंत तुकाराम महाराज भारती यांनी केले. बीडच्या श्रीक्षेत्र नेकनूर येथे संत सुदाम देव महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवानिमित्त दुसऱ्या दिवसाचे कीर्तन पुष्पगुच्छ बोलत होते यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, श्री ह भ प श्रीकृष्ण महाराज यादव, श्री ह भ प



अच्युत महाराज घोडके, श्री ह भ प दिनेशानंद शास्त्री, बबन महाराज बहिरावळ, भास्कर महाराज शिंदे यांच्यासह हजारो भावीक भक्तांची उपस्थिती होती..

श्रीक्षेत्र नेकनुर येथे संत सुदाम देव महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सव व राम जन्मोत्सवानिमित्त भव्य अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे यात दुसऱ्या दिवसाची कीर्तन पुष्प श्री ह भ प महंत तुकाराम महाराज भारती यांनी अर्पण केले यावेळी त्यांनी संत नामदेव महाराज यांच्या गाथेतील

ज्ञानदेव म्हणता माया ।
गेलि समूळ विलया । ।
संत महिमा वर्णू किती ।
निर्जीव चालवली भिंती । ।
जड मुळ उद्धरीले ।
रेड्यामुखी वेद बोलवीले । ।
म्हणे नामयाचा नारा ।
नमन माझे ज्ञानेश्वरा । ।

या अभंगावर सुंदर चिंतन मांडले.. 'ज्ञानदेव' या नावाचा उच्चार करताच मनातील सर्व 'माया' अज्ञान आणि सांसारिक मोह मुळासकट नष्ट होते.

संतांचा महिमा शब्दांत सांगणे कठीण आहे. जेव्हा गर्विष्ठ चांगदेवांनी वाघावर बसून दर्शन घ्यायला आले, तेव्हा माऊलींनी त्यांच्या अहंकाराचा नाश करण्यासाठी एका 'निर्जीव भिंतीला' सजीव करून चालवून दाखव

## जयभवानी साखर कारखान्यातील चोरीचा 6 तासांत छडा; जेसीबी ऑपरेटरसह सुरक्षा रक्षक गजाआड

**गेवराई** | गढी येथील जयभवानी सहकारी साखर कारखान्याच्या गोडाऊनमधून झालेल्या साखर चोरीचा गेवराई पोलिसांनी अवघ्या ६ तासांत छडा लावला आहे. या प्रकरणी पोलिसांनी कारखान्यातीलच जेसीबी ऑपरेटर आणि सुरक्षा रक्षकास अटक करून ८ लाख ६९ हजार ५४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गोडाऊन कीपर गोपाळ कल्याण शिंदे यांनी याप्रकरणी फिर्याद दिली होती. २२ मार्च २०२६ रोजी मध्यरात्री २:३० वाजता कारखान्यात जेसीबी ऑपरेटर म्हणून काम करणारा शुभम शिरसाट आणि सुरक्षा रक्षक सोमनाथ सुरवसे (दोघे रा. गढी) यांनी संगनमत करून गोडाऊनचे शटर उचकावून आत प्रवेश केला. त्यांनी गोडाऊनमधील १८३० रुपये प्रति गोणी दराच्या एकूण ३८ साखरेच्या गोण्या (किंमत ६९,५४० रुपये) पिकअपमध्ये भरून चोरून नेल्या.

तपासादरम्यान पोलिसांनी संशयावरून शुभम आणि सोमनाथ यांना ताब्यात घेतले. सुरुवातीला त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली, मात्र सखोल चौकशीत त्यांनी चोरीची कबुली दिली. चोरलेली साखर त्यांनी गढी येथेच विकल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी ६९,५४० रुपयांची साखर आणि चोरीसाठी वापरलेली ८ लाख रुपये किमतीची पिकअप असा एकूण ८ लाख ६९ हजार ५४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांढरकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके, पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि लंके, जंजाळ, पोउपनि ऊदगीरकर, खोत, पारधी आणि पोलीस अंमलदार सांगळे, पाटोळे यांनी केली.

## चारचाकी गाडीतुन अज्ञाताने एक लाख लांबविले; ग्रामीण पोलिसात फिर्याद

**तभा. वृत्तसेवा**

**माजलगाव, प्रतिनिधी** | शहरापासुन जवळच असलेल्या परभणी चौकातील मोरेश्वर हॉटेल समोर लावलेल्या स्विफ्ट डिझायर क्रं. एमएच ०६ एएस ५५५२ यर चारचाकी गाडीतुन ता. २० शुक्रवारी अज्ञात चोरट्याने लांबविले असुन याप्रकरणी ग्रामीण पोलिसात सुमन खंडु झेटे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, शुक्रवारी परभणी चौकातील मोरेश्वर हॉटेलसमोर लावलेल्या स्विफ्ट डिझायर गाडीच्या सिटकव्हरमध्ये कॅरीबॅगमध्ये ठेवलेले नगदी एक लाख रूपये अज्ञात चोरट्याने गाडी लॉक व गाडीत कोणीही नसल्याचा फायदा घेवुन चोरले असुन याप्रकरणी ग्रामीण पोलिसात फिर्यादी सुमन खंडु झेटे रा. मोगरा यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक फौजदार श्री. बळवंते हे करत आहेत. दरम्यान परभणी चौकात असलेल्या सिसीटीव्ही कॅमे-यात सदरील चोरटे कैद झाले असुन पोलिसांनी तपासाची चक्रे फिरविल्यास निश्चीतच चोरटे तात्काळ सापडतील अशी अपेक्षा फिर्यादी व त्यांच्या नातेवाईकांनी व्यक्त केली.

## बीड पोलीस दलाचे 'हायटेक' पाऊल; पाचेगावची चैतन्य कानिफनाथ यात्रा सीसीटीव्ही व्हॅनच्या निगराणीत शांततेत संपन्न

**बीड** | कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी बीड जिल्हा पोलीस दलाने आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर सुरू केला आहे. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांच्या संकल्पनेतून तयार करण्यात आलेल्या अत्याधुनिक 'सी.सी.टी.व्ही. मोबाईल कंट्रोल व्हॅन'चा यशस्वी वापर करून मौजे पाचेगाव येथील चैतन्य कानिफनाथ यात्रा उत्सव अत्यंत शांततेत पार पडला.




या अत्याधुनिक मोबाईल व्हॅनमध्ये एकूण २५ सीसीटीव्ही कॅमेरे असून ते सर्व 'एआय' (AI Based) प्रणालीवर आधारित आहेत. यामध्ये १ पीटीझेड कॅमेरा, ६ फेस रिकग्निशन कॅमेरे (जे प्रत्येक व्यक्तीचा स्वतंत्र फोटो जतन करतात) आणि ४ एएनपीआर कॅमेरे (जे वाहनांच्या नंबर प्लेटचा फोटो जतन करतात) यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, हे सर्व कॅमेरे कोणत्याही केबलशिवाय २० किलोमीटर अंतरापर्यंत व्हॅनमध्ये 'लाईव्ह' पाहता येतात. या व्हॅनला स्वतंत्र लाईटची व्यवस्था असून त्याचा बॅकअप ६ तासांपर्यंत मिळतो.

मागील वर्षी पाचेगाव येथील यात्रेत दोन समाजांमध्ये जातीय तेढ निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर, पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांढरकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराईचे पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी चोख नियोजन केले होते. या हायटेक व्हॅनचे कामकाज ऑपरेटर अमोल ससाणे यांनी पाहिले. गेवराई पोलीस ठाण्यातील सर्व अधिकारी व अंमलदारांनी सलग तीन दिवस सातत्याने बंदोबस्त ठेवून ही यात्रा शांततामय वातावरणात यशस्वी केली.

## गाळतो, भरण्या जगाचे पोटं उभा संसार जाळतो; कळंबआंबा येथे कवीसंमेलन रंगले

**तभा. वृत्तसेवा**

**केज दि २१(प्रतिनिधी)** | तालुक्यातील कळंबआंबा येथे शहावली दर्गा उरूस व गुढीपाडवा निमित्त यात्रा महोत्सव संपन्न झाला.

शुक्रवार रोजी कविसंमेलन संपन्न झाले.कवी गोरख शेंद्रे,कवी जनार्धन सोनवणे,कवी राजेश रेवले,, कवी विक्रम डोईफोडे, कवी पवन खरात,कवी डॉ हनुमंत सौदागर,कवी विशरद पठाण आदी कवींनी बहारदार कविता सादर केल्या. शेतीमतीच्या,निसर्ग,समाज, विविध विषयांवरील कवितांना रसिकांनी दाद दिली.

गोरख शेंद्रे यांनी समाजभान जागवणारी

"वाचितजाय पुस्तक वाचीत जाय समाज,
निळ्या भगव्या बरोबर पाडीत जा नमाज
रंगाच्या रंगाच्या भेदामध्येच
बरबाद झाल्या पिढ्या उगाच
कुणाच्या भानगडीत पडू नको येड्या"

ही कविता सादर केली

डॉ हनुमंत सौदागर यांनी शेती मातीची कविता सादर



करून

उभ्या जगाचा पोशिंदा
थेंब घामाचे गाळतो,
भरण्या जगाचे पोटं
उभा संसार जाळतो"

शेतकऱ्यांचे कष्ट डोळसपणे उभा केले

तर तिर्रकस मधून सध्या बुवा बाबांकडून होत असलेले शोषण मांडताना

ज्योतिषी,भोंदूबाबा कडून
भक्तीचे सूत जुळले जाते,
जाळ्यात ओढून महिलांना
रात्रंदिवस छळले जाते

हे सादर करून सामाजिक भाष्य केले.

कवी राजेश रेवले यांनी माय कवितेतून

"माय घराचा उंबरा
माय अंगणी तुळस,
बापाच्या मांदीराची
माय असते कळस "

ही कविता सादर आईची महती उभा केली.

पवन खरात यांनी गझल सादर करताना

"काय करावे जगताना मी, तेच नेमके समजत नाही
स्वप्न बघू की जिम्मेदारी, तेच नेमके समजत नाही
सांडून जा ढगा रे, थोड्या तरी सरी तू
उरलाय काळजाचा कोराच सातबारा"

शेतकरी जीवनाच्या व्यथा उभा केल्या.

विक्रम डोईफोडे यांनी शेतकरी जीवनावर भाष्य करणारी

'आम्हा कुनब्याच्या भाळी लिहीलस काय,
अजब तुझा न्याय नभा अजब तुझा न्याय"

ही कविता सादर केली

कवी जनार्धन सोनवण

## बीड शहराजवळील खजाना विहिर जवळ अपघातात तरुण जागीच ठार

**तभा. वृत्तसेवा**

**बीड (प्रतिनिधी)** | सोलापूर–धुळे महामार्गावरील वडगाव फाट्याजवळ आज दिनांक २४ मार्च शनिवार रोजी रात्री सुमारे १०:३० वाजता भीषण अपघात घडला. दुचाकीवरून बीड कडे येणाऱ्या तरुणाला मागून येणाऱ्या चारचाकी वाहनाने जोरदार धडक दिल्याने दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. दुचाकी स्वराला धडक दिल्यानंतर चार चाकी गाडी चालकाने घटनास्थळावरून पोवारा केला.

युवा नेते प्रेम कांबळे यांनी तातडीने १०८ क्रमांकावर कॉल करून ॲम्बुलन्सला माहिती दिली. मात्र, ॲम्बुलन्स वेळेवर न पोहोचल्याने ऑटो रिक्षामध्ये अपघात ग्रस्त तरुणाला उपचारासाठी दाखल करण्यात आले परंतु अति रक्तस्राव व वेळेवर उपचार न मिळाल्याने तरुणाचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे.

घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. अपघातातील मृत तरुणाची ओळख अद्याप पटलेली नसून, घटनास्थळी बीड ग्रामीण पोलीस दाखल झाले असून अधिक तपास करत आहेत.

## वेश्या व्यवसायावर छापा;दोन महिलांची सुटका

**तभा. वृत्तसेवा**

**बीड**| प्रतिनिधी (दि. २१ मार्च २०२६)अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष (AHTU) बीड आणि माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या संयुक्त कारवाईत वारोळा (ता. माजलगाव) येथे राहत्या घरात सुरू असलेल्या वेश्या व्यवसायावर छापा टाकण्यात आला. या कारवाईत दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली असून दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, AHTUच्या पोलीस उपनिरीक्षक पल्लवी जाधव यांना २० मार्च रोजी गुप्त माहिती मिळाली होती की, वारोळा गावात बाहेर जिल्ह्यातील महिलांना बोलावून वेश्या व्यवसाय चालवला जात आहे. ही माहिती वरिष्ठांना कळविल्यानंतर सहाय्यक पोलीस अधीक्षक राहुलकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली छाप्याचे आदेश देण्यात आले.

त्यानुसार AHTU पथक व माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी डमी ग्राहक व पंचांच्या उपस्थितीत सापळा रचला. डमी ग्राहकाने संबंधित ठिकाणी जाऊन खात्री केली असता, तेथील एजंट महिलेने वेश्या गमनासाठी ५०० रुपयांची मागणी केली. ठरल्याप्रमाणे



रक्कम दिल्यानंतर इशारा मिळताच पोलीस पथकाने तत्काळ छापा टाकला.

यावेळी अलका हडागाळे (रा. वारोळा) हिच्याकडून डमी ग्राहकाने दिलेली ५०० रुपयांची नोट जप्त करण्यात आली. तसेच ठिकाणी दोन पीडित महिला आढळून आल्या. चौकशीत एक महिला परभणी येथील असून तिला रामा गायकवाड (रा. वारोळा) याने फोन करून बोलावल्याचे समोर आले, तर दुसरी महिला छत्रपती संभाजीनगर येथील असल्याचे निष्पन्न झाले. ग्राहकाकडून ५०० रुपये घेतले जात असून त्यापैकी ३०० रुपये महिलांना दिले जात असल्याची माहितीही पुढे आली.

पोलीसांनी घटनास्थळाची झडती घेतली असता १२ न वापरलेले निरोध जप्त करण्यात आले. आरोपी अलका हडागाळे व रामा गायकवाड हे महिलांना बोलावून घेऊन त्यांच्याकडून वेश्या व्यवसाय करून घेत असल्याचे निष्पन्न झाले.

या प्रकरणी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ अंतर्गत कलम ३, ४, ५, ६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही पीडित महिलांची सुटका करण्यात आली आहे.

ही कारवाई बीड पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, सहाय्यक पोलीस अधीक्षक राहुलकुमार प्रभारी अधिकारी माजलगांव ग्रामीण, पोलीस उपनिरीक्षक पल्लवी जाधव, सहायक पोलीस उप निरीक्षक मीरा रेडेकर, महीला पोलीस हवालदार शोभा जाधव, पोलीस हवालदार अशोक शिंदे, प्रदीप येवले. संजय राठोड, पोलीस शिपाई आकाश कारले. विकास वाघमारे विठ्ठल चव्हाण, सर्व नेमणूक व अ. मा. वा. प्र. कक्ष व पोठा माजलगांव ग्रामीण यांनी केली.

